ग्राममंगल

# शिक्षणवेध

शिक्षणातील प्रश्नांकडून उत्तरांकडे जाण्याचा एक मासिक प्रयत्न

शिक्षणात मूलगामी परिवर्तनाची वाट शोधणारा एक मासिक प्रकल्प

शिक्षणाकडे सर्व दिशांनी पाहणारा एक मासिक दृष्टिक्षेप



**मुलाला स्वतःहून शिकण्याची नुसती क्षमताच प्राप्त झालेली असते असे नाही, तर त्याची ऊर्मीही असते. स्वयंस्फूर्तीने मूल शिकत असते, शिकत राहते.**

ग्राममंगल

# शिक्षणवेध

शिक्षणातील परिवर्तनासाठी

**वर्ष : तिसरे । अंक चौथा**
**ऑक्टोबर २०१२**

**संपादक**
रमेश पानसे

**कार्यकारी संपादक**
डॉ. वैखरी वैद्य

**संपादन साहाय्य**
मुग्धा नलावडे

**व्यवस्थापकीय संपादक**
प्रसाद मणेरीकर

**संपादक मंडळ**
डॉ. द. ना. धनागरे । डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत । आशिष पेंडसे

**सल्लागार मंडळ**
डॉ. राम ताकवले । डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर । प्रमोद लेले । दीपक घैसास । डॉ. चंद्रहास देशपांडे
अच्युत गोडबोले

**संचालक**
अदिती नातू

**कार्यकारी संचालक**
अजित मंडलिक

**कायदेतज्ज्ञ आणि सल्लागार**
हेमांगी जोशी

**मुखपृष्ठ**
राजू देशपांडे

**आतील चित्रे**
अपर्णा कुलकर्णी
सुचिता कुलकर्णी

---

**संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार**
**ग्राममंगल शिक्षणवेध** : 'सृष्टी' अपार्टमेंट,फ्लॅट नं.१०६, सिंहगड रोड,पुणे-३०.
संवाद -०२०-२४२५२१५१

**पुणे कार्यालय**
गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
Email : shikshanvedh@grammangal.org, संवाद : ०२० २५३८६६८७

**प्रसिद्धी आणि जाहिरात संपर्क**
**अजित मंडलिक :** २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७.
संवाद : ०९८६९०४९८४९
**बँकर्स :** दि ठाणे जनता सह. बँक लि.

---

हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.



## अनुक्रमणिका


संपादकीय / रमेश पानसे / ६

साहित्य सहवास / अनिल जोशी / ८

महाराष्ट्रातील शिक्षण-वास्तव आणि दिशा/रमेश पानसे/ १४

असे आंदोलन - असे शासन/अरूण रंधे / २२

लेखाजोखा 'चिल्लर'पार्टीचा/पंकज मीठभाकरे /२६

प्रासंगिक/अनिल जोशी/२९

निळे आकाश-हिरवी झाडे-काळी मातीच्या निमित्ताने/वीणा सानेकर/३२

शैक्षणिक कृतींचे सार/मिलिंद बोकील/३५

भाषाशिक्षणाचे प्रयोग पुस्तक/मुकुंद कुळे/३७

प्रतिक्रिया/मिलींद उपाध्ये/३९

प्रगत भाषिक विश्वाच्या प्रांतातील प्रवेश/रमेश पानसे/ ४१

अनुभवातून भाषाशिक्षण/डॉ.सुप्रिया अत्रे/४४

विश्ववृत्त/४९

ग्राममंगलवार्ता/५२

इजिप्तमधील प्राचीन शिक्षणपद्धती/सुनित पोतनीस/५४

औपचारिक कलाशिक्षण/ऐश्वर्या सोमण/५६

उपक्रमशील शाळा/भाऊसाहेब चासकर/५८

कवाडे उघडताच/अपर्णा कुलकर्णी/६२

पालकत्वाचा विकास/आसावरी गुपचूप/६४

## || संपादकीय ||

# भाषासमृध्दी आनंदी जीवनासाठी

भाषेची, त्यातही आपण जी पहिली भाषा आत्मसात करतो त्या भाषेची, दोन प्रमुख कार्ये असतात. एक आहे ते, आपण ज्या समाजात वावरतो त्या समाजातील परस्पर संवादाचे साधन म्हणून. व्यक्तिच्या बाबतीतील हे भाषेचे 'बाह्य कार्य' म्हणून आपण संबोधू शकतो. भाषा जन्माला आली तीच मुळी असे कार्य होण्याच्या माणसाच्या गरजेतून. भाषेचे दुसरे कार्य आहे ते म्हणजे, दुसऱ्याशी नव्हे, तर स्वत:शीच संवाद साधण्याचे साधन म्हणून. व्यक्तिच्या बाबतीत याला आपण भाषेचे 'अंतर्गत कार्य' असे म्हणू शकतो. माणसाच्या मनाशी संबंधित असलेले असे हे कार्य असते. भाषेच्या या अंतर्गत कार्याच्या क्षेत्रात, माणूस भाषेच्या साहाय्याने, विचारांच्या वावटळी उठवतो, कल्पनांच्या वारूवरती स्वार होतो आणि भाव-भावनांच्या अनुभूतीची अभिव्यक्ती करतो. माणसाच्या अंतर्गत विश्वात भाषा ही अशी वेगवेगळ्या वेषांत वावरत असते. बाह्य जगातील आपले व्यवहार व आपला संचार ह्या गोष्टी भाषिक आधारावरच घडून येत असतात. त्याची प्रत ही आपल्या भाषेच्या तयारीने ठरते. भाषेची तयारी ही आपल्या अंतर्गत भाषेने केली जाते. म्हणून माणसाची अंतर्गत भाषा ही माणसाचे व्यक्तिमत्व ठरवीत असते असे म्हणावयास हरकत नाही.

माणूस जन्माला आल्यापासून जगाची ओळख करून घेत असतो. ही त्याच्या अंतर्गत घडून येणारी, शिकत जाण्याची नैसर्गिक प्रक्रिया असते. ही प्रक्रिया ज्यावेळी माणसाला भाषा अवगत नव्हती त्यावेळीही घडत होती. परंतु त्यावेळी तिची गती मंद होती. भाषेमुळे या प्रक्रियेला वेग येत गेला. माणूस संस्कृतीच्या वरच्या वरच्या टप्प्यांवर जात राहिला. भाषा ही अशी माणसाच्या प्रगत संस्कृतीचे कारण आहे. भाषेमुळे माणूस वेगाने विचार करू लागला, विचारांतून त्याचा व्यवहार वाढत गेला. त्याची प्रश्न आकलन करून घेण्याची आणि समस्या निवारणाची ताकद वाढत गेली. त्याची कल्पना करण्याची नि शोध घेण्याची ताकदही वाढत गेली. हे सर्व एकीकडे घडून येत असतानाच दुसरीकडे माणसाची भाषा, गरजेनुसार विस्तार पावली, अधिक व्यामिश्र झाली. त्याने त्याच्या विचार करण्याच्या क्षमतेलाही अधिक बळकटी येत गेली. स्वतंत्रपणे विचार करता येणे, कल्पनांच्या प्रांगणात विहरता येणे, आपल्या भाव-भावनांची प्रकट अभिव्यक्ती करता येणे आणि वेळोवेळी येत जाणाऱ्या समस्यांचे निवारण करता येणे ही जर का शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे असतील तर तिला भाषेच्या साहाय्याशिवाय दुसरा पर्याय नाही. ही भाषासुध्दा अर्थातच माणसाने आपसूकपणे आत्मसात केलेली त्याची पहिली भाषा होय.

भाषा आत्मसात होण्याची पहिली पायरी ही सहजतेने घडून येणारी गोष्ट आहे. ती ऐकून आणि बोलून येते; ती इतरांच्या सहवासांतून येते आणि ऐकण्या–बोलण्याच्या संधी मोठ्या संख्येने मिळाल्यास ती अधिक चांगली येते. ही सारी प्रक्रिया अत्यंत अनौपचारिक अशी असते. माणसाचे भाषेचे होणारे हे 'सहज शिक्षण' आहे, असे या प्रक्रियेचे वर्णन आपण करू शकू. मुले शाळेत गेल्यावर औपचारिक पध्दतीने जेव्हा लिहा–वाचायला लागतात, तेव्हा आधीच आत्मसात झालेल्या पहिल्या भाषेच्या तयारीने, भाषेची वरची पायरी चढू लागतात. लेखन–वाचनाच्या कौशल्यप्राप्तीमुळे मुलांना आपली भाषा समृद्ध करीत जाण्याची मोठी संधी मिळते. त्यामुळे ती त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची संधी असते. भाषेची समृद्धी ही, औपचारिक शिक्षण अधिक बळकट करणारी बाब असते. व्यक्तिमत्त्वाला, आपल्या उपजत क्षमतांनुसार आकार देणारी गोष्ट असते. मानवी व्यवहार अधिक प्रगल्भतेने करता येण्यासाठीची ती तयारी असते. आणि आपल्यातील कलात्मकता, आपल्यातील नवनिर्मितीची क्षमता जागविणारी ती बाब असते. भाषेची समृध्दी ही अशी जीवनाला आनंदी करणारी गोष्ट असते!

## शहाणपणाची गोष्ट १

### शिक्षक

एकदा एक आयोग आला. त्याने शिक्षकांचे पगार वाढवले. शिक्षकांची परिस्थिती सुधारली. दुसरा एक आयोग आला. त्याने शिक्षकांचे पगार वाढवले. शिक्षकांची स्थिती अधिक बरी झाली. तिसरा एक आयोग आला. त्याने शिक्षकांचे पगार वाढवले. शिक्षकांची स्थिती चांगली झाली. चौथा एक आयोग आला. त्याने शिक्षकांचे पगार वाढवले. शिक्षकांची स्थिती उत्तम झाली. आता शिक्षक पुढच्या आयोगांची वाट पाहत आहेत.

शिक्षकांचे नाते आयोगांशी असते; विद्यार्थ्यांशी नसते. शहाणपण म्हणाले!

## शहाणपणाची गोष्ट २

### इंग्रजी

शासनाने सातवीपासून इंग्रजी सुरू केले. पण मुलांना इंग्रजी आले नाही. मग शासनाने पाचवीपासून इंग्रजी सुरू केले. पण मुलांना इंग्रजी आलेच नाही. मग, अर्थातच शासनाने पहिलीपासून इंग्रजी सुरू केले. तरीही मुलांना इंग्रजी आलेच नाही. मग शासनाने सेमी इंग्रजीला मान्यता दिली. त्यानेही मुलांना इंग्रजी आलेच नाही. मग शासनाने चक्क इंग्रजी माध्यमाच्याच शाळा धडाधड वाढवल्या. अखेरीस, मुलांना इंग्रजी आले पण मुलांना शिक्षण मिळालेच नाही, असे शासनाला दिसले!

'गड आला, पण सिंह गेला!' शहाणपण म्हणाले!

**सदा शहाणे**

## || व्यक्तिविशेष ||

**१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते यशवंतराव चव्हाण, २०१२-१३ हे यशवंतरावांचे जन्मशताब्दी वर्ष ! आरंभीच्या काळात यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्राची अत्यंत द्रष्टेपणाने आखणी केली. त्या अनुषंगाने योजना तयार केल्या, सामान्य माणूस विकासाच्या केंद्रस्थानी ठेवला. समाजविकास हा शिक्षणविकासाखेरीज शक्य नाही हे सूत्र यशवंतरावांनी जाणले, आणि प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणाची विविध दालने खुली केली. शिक्षणामध्ये सर्वार्थाने आधुनिकता आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या शताब्दीनिमित्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्रातील शिक्षणविकास यावर आधारित काही विचारांचा या लेखमालेद्वारे परिचय करून देण्याचा हा प्रयत्न. या मालिकेतील हा सातवा लेख.......**

# साहित्य सहवास

**अनिल जोशी**



माता, मातृभाषा आणि मातृभूमी यांच्याबद्दलचे अपार प्रेम आणि श्रद्धा यातूनच आपले व्यक्तिमत्व विकसित होत गेले याची स्पष्ट कबुली यशवंतरावांनी अनेक ठिकाणच्या भाषणातून-सभा संमेलनातून दिली आहे. किंबहुना देवराष्ट्रे या गावाच्या नावाशीच आपल्या निष्ठा आणि श्रद्धा यांचे निरंतरचे नाते जडले आणि या गावाच्या वातावरणाने आपल्या भावी जीवनाची बैठक तयार केली, याचेही स्मरण त्यांच्या बोलण्यातून वारंवार येत राहिले. देवराष्ट्रे या गावाच्या नावातच हे देवाचे गाव, भूमी असल्याचा अभिमान त्यांना होताच आणि जाणतेपणात त्यांनी आपली निष्ठा या भारतभूमीशी घट्ट बांधली. त्यांनी राष्ट्रासच देव मानले. यशवंतराव वारकरी संप्रदायाच्या वातावरणातच लहानाचे मोठे झाले आणि त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्यात रुजलेला भक्तिभाव होता. त्यामुळे श्रद्धा, भक्ती, निष्ठा, बांधिलकी या मूल्यांना त्यांनी अखेरपर्यंत जोपासले. अशा मूल्यांनी समृद्ध असणाऱ्या ग्रंथांच्या वाचनाने आणि त्या ग्रंथकर्त्यांच्या सहवासाने यशवंतराव विकसित होत गेल्याचे स्पष्ट झाले आहे. विठाई म्हणजे आपली जन्मदात्री आई ही लौकिक अर्थाने शिकलेली नाही पण तिच्या मनाची आणि भावनेची उंची ही अमर्याद असल्याने तिचे बोलणे, स्वतःशीच ओव्यांची भाषा गुंफत राहणे आणि लोकभाषेतील असंख्य दाखल्यांनी आपले बोलणे अधिक अर्थपूर्ण करणे याचा परिणाम यशवंतरावांच्या आवडी-निवडींना दिशा देणारा

ठरला. आपली आई हीच महान साहित्यिक असल्याचा अनुभव त्यांनी आरंभापासून घेतला होता. असा आपल्या जन्मदात्या आईमध्ये रुजलेला भाव साहित्यिक आपल्या मनाची आणि स्वभावाची साहित्यिक घडण करण्यास साहाय्यभूत ठरल्याची अनेक उदाहरणे यशवंतरावांनी अनेक ठिकाणी पेरली आहेत. मूल्याधिष्ठित भावगर्भ ओव्यांची रचना करणाऱ्या आपल्या आईच्या व्यक्तिमत्वात स्थिरावलेला महान साहित्यिक, त्याचा सहवास ही आपल्या आयुष्याची अविरत वृद्धींगत होत राहिलेली पुंजी होती याची जाणीव यशवंतरावांना पूर्णत्वाने होती, म्हणूनच आईच्या मुखातून स्वरचित ओव्यांचे गायन आणि त्यांतून झालेले संस्कार हा त्यांचा पहिला साहित्यसहवास ठरला.

साहित्यिकांच्या सहवासाचे जे आपल्या जडण–घडणीतले स्थान आहे त्याचा आदरयुक्त उच्चार यशवंतरावांनी अनेक ठिकाणी केला आहे. ऐन तारुण्यात म्हणजे वयाच्या विशीच्या आसपास त्यांना झालेला कारावास, ही शिक्षा न ठरता अनौपचारिक शिक्षणाचे विद्यापीठ ते वास्तविक होते. येरवड्याच्या तुरुंगात असताना यशवंतरावांना वैचारिक आणि प्रबोधनात्मक साहित्य निर्मात्यांचा लाभलेला सहवास आणि त्यातून त्यांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विकासाबाबतची निश्चित झालेली दिशा महाराष्ट्राचे शिल्प घडविण्यास साहाय्यभूत ठरलेली आहे. येरवड्याच्या कारावासाच्या कालावधीत त्यांना ज्या विचारवंतांचा सहवास लाभला त्यामध्ये आचार्य भागवत यांच्याबद्दल यशवंतरावांनी कृतज्ञतेने ओथंबलेले भावपूर्ण स्मरण अनेक प्रसंगी नोंदविलेले आहे. 'मी घडलो असे म्हणण्यापेक्षा मला अनेकांनी घडविले' असा स्मरणयुक्त भाव व्यक्त करताना त्यांनी आचार्य भागवत आणि ह. रा. महाजनी यांचे श्रेय मोकळेपणाने मान्य केले आहे.

येरवड्याच्या कारावासांतील तरुणांना संघटित करताना विद्रोहाची भाषा न वापरता विधायक विचारांनी भारलेले लेखन या तरुणांनी वाचावे, त्यावर चिन्तन करावे, चर्चा कराव्यात आणि आपल्या भावी आयुष्याच्या वैचारिक वाटचालीची दिशा ठरवावी याबद्दल आचार्य भागवत यांचा कटाक्ष होता. त्यांचे या तरुणांना जे मार्गदर्शन झाले ते एका कृतीशील विचारवंताचे होते, नव्हे विचारप्रधान साहित्य निर्मात्याचे होते, 'तुम्ही तुमचा येथील वेळ, बुद्धी आणि मन संस्कारित करण्याच्या प्रयत्नात घालवा. जेव्हा केव्हा बळ मिळेल, वेळ मिळेल, तेव्हा येथे असलेल्या माणसांची ओळख करून घेऊन त्यांच्या सहवासाचा लाभ घ्या. तसेच, येथे उपलब्ध होणारी पुस्तके वाचून त्यांचाही उपयोग करून घ्या.' यशवंतराव आणि त्यांच्यासारख्या तरुणांच्या समोर आचार्य भागवतांचे हे मतप्रदर्शन म्हणजे त्यांच्यात उपजत स्थिरावलेल्या एका साहित्यिकाशी केलेले हितगुजच ठरले.

वारकरी संप्रदायाच्या विचारांचा वारसा आणि ऐन तारूण्यात अभिजात साहित्यकृतींचे वाचन याचा संकलित परिणाम यशवंतरावांच्या वैचारिक वाटचालीचे आरंभस्थान ठरले. येरवड्याच्या तुरुंगात ह. रा. महाजनी यांच्यासारख्या संस्कृत पंडिताचा सहवास आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले संस्कृत साहित्यकृतींचे वाचन, मनन आणि रसग्रहण याच गोष्टी यशवंतरावांच्या ऐन तारुण्यातील घडणीच्या महत्त्वाच्या बाबी ठरल्या. शाकुंतलचे वाचन ह. रा. महाजनी यांच्या मुखातून ऐकणे ही त्यांना लाभलेली पर्वणी ठरली. मेघदूतचे वाचन या अगोदरच पूर्ण झाले होते. 'महाजनींसारखा पटाईत संस्कृतज्ज्ञ आणि उत्तम शिक्षक 'शाकुंतल' शिकवू लागल्यामुळे हा वाचनवर्ग बराच लोकप्रिय झाला.'

हा कारावासातील अनौपचारिक शिक्षणाचा काळ

म्हणजे यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वास आकार देण्याचा काळ ठरला. संस्कृतीबद्दलचे प्रेम अतीव होते हे खरे, पण ज्ञानसंग्रहासाठी केवळ मायदेशीच्या साहित्याचेच मोलाचे स्थान आहे असे न मानता यशवंतरावांनी स्वभाषेबरोबरच विश्वसाहित्याच्या निर्मात्यांच्या विचारांशी आपले वाचननाते जोडले होते. खुद्द आचार्य भागवतांच्या मुखातून शेक्सपीअरच्या 'ज्युलिअस सिझर' या साहित्यकृतींचे वाचन ऐकणे हा अविस्मरणीय अनुभव होता. वास्तविक गांधीवादाचे पुरस्कर्ते असणारे आचार्य भागवत परभाषेतील अभिजात साहित्याचा या तरुणांना परिचय करून देत होते याचाच अर्थ आपल्या विचारविश्वास कोणत्याही भाषेच्या आणि भूभागाच्या, इतिहासाच्या, संस्कृतीच्या मर्यादा येणार नाहीत याबद्दलची दक्षता त्यांनी घेतली होती. अशा विश्वविख्यात साहित्यकृतींचे ऐन तारुण्यातील वाचन त्यांना अनेक दिशांनी समृद्ध करीत राहिले. साहित्य आणि त्या साहित्याचे निर्माते यांचा प्रत्यक्ष आणि वैचारिक सहवास हे आपल्या अनुभव समृद्धीचे खरे रूप आहे हे यशवंतरावांना मान्य होते. ऐन तारुण्यात विविध राजकीय मतप्रणालींचे सैद्धांतिक ग्रंथवाचन आणि त्यासंबंधातील मतमतांतरे यांचा प्रत्यक्ष लाभ यशवंतराव यांना झाल्याने 'कोणत्याही प्रकारचे साहित्य वाचन हे सैद्धांतिक अंगाने झाले पाहिजे' ही अत्यंत मौलिक बैठक तयार झाली. येरवड्याच्या तुरुंगात ज्येष्ठ कम्युनिस्ट वि. म. भुस्कुटे यांच्याकडून त्यांनी मार्क्सवाद समजावून घेतला पण त्याचबरोबर 'कम्युनिस्ट मैनिफेस्टो' या पुस्तिकेचे वाचन आणि त्यावरची चर्चा यातून यशवंतराव ऐन तारुण्यातच अनेक वैचारिक साहित्यकृतींचे भोक्ते झाले. त्याच काळात, त्यांनी आचार्य भागवतांकडून रवींद्रनाथांची 'गीतांजली' समजावून घेतली, विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांची साहित्यिक कृती समजावून घेण्याची संधी यशवंतरावांना ज्या वयात लाभली आणि ही संधी आपल्या भावी वैचारिक घडणीस उपयुक्त ठरणारी आहे याची जाणीव त्यांच्यात निर्माण होणे या सर्व बाबींचे प्रकटीकरण म्हणजेच खुद्द यशवंतरावांच्या वक्तृत्वास, लेखनास, चर्चांना आणि संभाषणांना लाभलेली व्यापक विचारांची बैठकच म्हणावी लागेल. विविध भाषिक ग्रंथांच्या वाचनाने त्यांच्या विचारकक्षा अमर्याद अशा रितीने रूंदावतच गेल्या. बट्रॉंड रसेल यांचे 'गेटस् टू फ्रीडम' त्याचबरोबर मार्क्सवादी साहित्यामध्ये जॉन रीड यांचे 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड' या ग्रंथाचे वाचन म्हणजे साम्यवादी विचारांचे, सिद्धांतांचे आणि त्यातील उणिवांचे ऐन तारुण्यात चिन्तन करण्याची संधी यशवंतरावांना लाभली. यातून त्यांच्यातील राजकीय मतप्रणालींचा समीक्षक जन्मास आला. हिंदुत्ववादाचे पुरस्कर्ते वि. दा. सावरकर यांच्या राजकीय विचारांशी यशवंतरावांनी कधीच सख्य राखले नाही. पण साहित्यिक सावरकरांशी त्यांचे भावनिक धागे जुळत राहिले. आचार्य भागवतांच्या मुखातूनच सावरकरांच्या 'कमला' आणि 'गोमंतक' या काव्यांचे ऐकण्यास मिळालेले प्रकट वाचन ह्या सर्वातून यशवंतरावांचे साहित्यप्रेम सातत्याने वृद्धींगत होत राहिले.

शब्दांचे सामर्थ्य ग्रंथद्वारा समजावून घेण्यामध्ये यशवंतरावांना विशेष रुची राहिल्यानेच महाराष्ट्राची नव्याने घडी बसविताना संस्कृतीप्रेम आणि साहित्यप्रेम यांना प्रकट होण्याची संधी लाभली. साहित्याचे वाचन आणि अभिरुची संपन्नता ही यशवंतरावांच्यातील स्वतंत्र अशी ओळख करून देणारी मूल्ये आहेत. आपला मराठी माणूस हा आर्थिक गर्तेतून बाहेर येण्यासाठी विविध विकास योजनांची आखणी, शैक्षणिक संस्थांची उभारणी, कला, साहित्य, क्रीडा आदी जीवनांगांना प्राधान्य

याकडे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी दिलेले विशेष लक्ष या राज्याचे रूप पालटण्यास साहाय्यभूत ठरले.

यशवंतरावांना वाचन–चिंतनात जी अवीट गोडी निर्माण झाली त्यातून समाजास विविध अंगांनी सजविणाऱ्या, समृद्ध करणाऱ्या साहित्य–कलांना उत्तेजन देणे त्यांनी अग्रभागी ठेवले. आपण राजसत्तेत आहोत याचे सतत भान सांभाळणारा हा लोकनेता मराठी माणसाच्या सांस्कृतिक उत्थानासाठी प्रयत्नशील राहिला होता. समाजास विविध अंगांनी उन्नत करताना आपणही उन्नत होणे गरजेचे आहे याचे पुरेपूर भान त्यांना होतेच. एका अर्थाने साहित्याची अभिरुची समृद्ध करण्याने आपल्यामध्ये असणाऱ्या साहित्यिकास यशवंतरावांनी अनेक अंगांनी सजविले आहे. साहित्य सहवास हा त्यांच्यातच असणाऱ्या साहित्यिकास घडवीत राहिला. विचार आणि लालित्य यांचा सुंदर गोफ गुंफण्याचे कौशल्य यातूनच यशवंतरावांना विकसित करता आले.

आपल्या आयुष्यातील विविध स्मृतींना शब्दांमध्ये गुंफण्याचा त्यांना विशेष आनंद होता. 'आता तीस–चाळीस वर्षानंतर मी माझ्या आठवणींच्या फुलांची ओंजळ भरत आहे. त्यावेळी त्यातील अनेक रंगांची आणि मधुर व कडवट वासांची फुलं अजूनही ताजी टवटवीत दिसतात. स्मृति पुष्पं म्हणावीत, फार तर; पण त्यांचा रंग आणि सुगंध ताजा असल्यासारखा वाटतो. तळाला काही फुलं कोमेजलेली असतील, पण निसर्गाची करणी, नियतीची इच्छा. काही फुलं कोमेजलेली असली तरी सुगंध परिचयाचा आहे. वाळा वाळलेला असला तरी सुगंध देतोच. ओलाव्याचा शिडकावा केला, तर सुगंध अधिकच दरवळतो. आता आठवणींना उजाळा देत असताना, ज्यांनी अलोट प्रेम दिलं त्यांच्या त्या प्रेमाचा ओलावा मनातून पाझरत पाझरत ओंजळीपर्यंत पोहचत आहे. आणि त्या ओलाव्याचा स्पर्श झाल्यामुळे की काय, ओंजळीतील आठवणींची फुलं अधिकच सुगंध देत आहेत.' यशवंतरावांच्यातील साहित्यिकाचे हे मनोगत अत्यंत मोहक आणि मनोहर असेच आहे.

साहित्यिकांचा सहवास हा यशवंतरावांच्या अत्यंत आवडीचा भाग होता. समाजाचे दैनंदिन व्यवहार अखंडपणे सुरू असतातच पण या धकाधकीमध्ये या सामाजिक मनाचे काही काळ का होईना रंजन होणे ही बाब समाजाचे आरोग्य ठेवण्यासाठी आवश्यक आहे, याची जाण आणि भान असणारा हा लोकनेता राजकीय कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात जितका रमायचा तितकाच किंबहुना काकणभर अधिक, विचारवंत, विद्वान, साहित्यिक, कलावंत यांच्यातही रमायचा. या साहित्यिकांच्या मेळाव्यात रमताना यशवंतरावांनी आपल्यातील राजसत्ता, सत्तेची सर्व बिरूदे यांना नेहमीच दूर ठेवले होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा सुवर्ण महोत्सवी सोहळा इचलकरंजी येथे पु. ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. राजकारण्यांना साहित्य संमेलनाचे व्यासपीठ उपलब्ध करून द्यायचे की नाही, या संबंधात खूपच भवति न भवति महाराष्ट्रात झाली. यशवंतराव हा चाणाक्ष नेता असल्याने या चर्चेचा सूर त्यांनी वेळीच ओळखला आणि आपण या सुवर्ण महोत्सवी साहित्य संमेलनामध्ये राजकारणी नेता म्हणून उपस्थित न राहता एक मराठी साहित्याचा चाहता आणि रसिक या भूमिकेतून सहभागी होण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. ही घटना म्हणजे यशवंतरावांनी जोपासलेल्या मुत्सद्दी राजकारण्याचे दर्शन घडविणारी होती. यशवंतराव या संमेलनात चक्क एक भाषाप्रेमी आणि रसिक म्हणूनच सहभागी झाले. त्यानंतर त्यांनी उपस्थित सर्व ज्येष्ठ साहित्यिकांशी स्वतंत्र अशा गप्पांचा कार्यक्रम आयोजित करून आपल्यातील

रसिकत्व अधिकच संपन्न केले.

संत साहित्याचा आणि आपला बालपणापासूनचा अतूट संबंध राहिला याचा ते साभिमानाने उल्लेख करीत असत. या संतसाहित्याने मराठी मनाचे केलेले भावनिक पोषण ही बाब या मराठी संस्कृतीची एक सुशोभित बाजू असल्याचे यशवंतरावांना मान्य होते. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, चोखामेळा यांच्या साहित्याने मराठी संस्कृती पोसली आहे आणि त्यावरच आपण आपला समाज उभा करीत आहोत हे सूत्र यशवंतरावांनी अचूकपणे पकडले होते. संत-साहित्यामधल्या अध्यात्मिक बाजूंवर अधिक भर न देता सामाजिक फलश्रुतीसच यशवंतरावांनी अधिक महत्त्व दिलेले आहे. नामदेव पुण्यतिथीच्या एका कार्यक्रमात साहित्यिक यशवंतराव बोलून गेले, 'संतांच्या कार्यामुळे पाचशे वर्षांचा काळ भक्तीमार्गाच्या व सारस्वताच्या क्षेत्रात अधिक बहरलेला वाटतो. या काळाने कैवल्यवृक्षाचे अनेक बहर पाहिले. ज्ञानेश्वर-नामदेव ही याच कैवल्यवृक्षावरची उमललेली फुले होती.'

'नामदेवाच्या वाङ्मयात भक्तिवेड्या मनाचे उसासे, उद्रेक आहेत. ज्ञानदेवानीच; परि नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व। हा रस अद्भूत निरूपम।' असे त्यांच्याविषयी म्हटले होते. त्यांची शब्दकळा मनोहर होती, नामदेवाची ही वाङ्मयमूर्ती गोजिरी आहे. आपल्या अभंगवाणीने व टाळ मृदुंगांनी परमार्थक्षेत्रात सातशे वर्षापूर्वी मुलूखगिरी करणाऱ्या, नामामृताचा हा मेघ उत्तरेपर्यंत नेऊन, तेथे सहस्त्रधारांनी भक्तीरसाचा वर्षाव करणाऱ्या नामदेवाची आठवण आता महाराष्ट्रच नव्हे तर सारा भारत करीत आहे.

यशवंतराव या संत-साहित्यातील सामाजिक ऐक्य विचारांशी नाते सांगत राहिले. या संत-साहित्याचा त्यांना झालेला सहवास यशवंतरावांच्यातील सुजाण आणि समाजाभिमुख साहित्यिकाचे पोषणच करणारा ठरला आहे. आपली प्रत्येक कृती आणि त्यामागील विचार समाजाभिमुख असला पाहिजे आणि त्यासाठी समाजाशी आपली कायमची मैत्री असली पाहिजे असे सांगणारे साहित्य यशवंतरावांना अधिक प्रिय होते. 'आपली वैचारिक जडण-घडण अत्यंत समृद्धतेकडे वाटचाल करणारी आहे याचे कारण, आपण केलेले सामाजिक प्रश्नांची उकल करणारे साहित्यवाचन अधिक प्रमाणात आहे' अशी स्पष्टता ते देत असत. कोणाकडून कोणते गुण घेतले याचा उलगडा करताना त्यांनी याचे सारे श्रेय ज्या साहित्यिकांनी आपणास सहवास दिला, विचारांचे आदान-प्रदान केले त्यांनाच आहे असे सांगताना त्यांचा अभिमान उफाळून येत असे. 'राजकारणात मूलभूत विचार कसा करावा, हे मी रॉयपासून शिकलो.' या त्यांच्या विधानाने यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वात स्थिर झालेले विचार आणि साहित्यप्रेम व्यक्त होते.

विचारगर्भित साहित्य आणि अशा साहित्याचे निर्माते हे आपल्या परिवारातीलच आहेत असे सांगण्यात यशवंतराव आनंद घेत असत. थोर विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशी, त्यांच्या साहित्याशी, त्यांच्या विचारमंथनाशी आपले अधिक जवळचे नाते कसे जडले याची हकीकत यशवंतरावांनी नोंदविली आहे.

'गेल्या पन्नास वर्षांच्या या काळात त्यांच्याशी (तर्कतीर्थ जोशी यांचेशी) माझा निव्वळ राजकीय संबंध आला, असे नव्हे तर त्यांच्या साहित्यिक, सांस्कृतिक कार्याशीही माझा संबंध येत गेला. शास्त्रीबुवांचे व्यक्तिमत्व हे एक स्वतंत्र शैलीचे आकर्षक व्यक्तिमत्व आहे. त्यांचा जसा भारतीय संस्कृती, इतिहास, साहित्य व तत्त्वज्ञान यांचा गाढा व्यासंग आहे तसाच मार्क्सवाद व इतर पाश्चिमात्य

तत्त्वज्ञान व इतिहासाचा खोल अभ्यास आहे. या सर्व व्यासंगातून जे व्यक्तिमत्व उभे राहते; ते एक प्रकारचे अपूर्व व्यक्तिमत्व आहे. त्या व्यक्तिमत्वाला तीक्ष्ण बुद्धिमत्तेची व समतोल विचारशक्तीची झालर आहे'.

'शास्त्रीजींशी झालेले संभाषण म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच असते, म्हणून अशी संधी उपलब्ध करण्याचा मी वारंवार प्रयत्न करतो,' आपली राजकीय मैत्री ही प्रासंगिक स्वरूपाची राहते पण वैचारिक आणि साहित्यिक मैत्री अतूट राहिली पाहिजे यावर यशवंतराव ठाम होते.

त्यांच्या व्यासंगामध्ये चरित्र साहित्यास त्यांनी वेगळे स्थान दिले होते. आणि हे चरित्र वाचन मायमराठीतील आहे याचा त्यांना सार्थ अभिमान देखील होता.

'चरित्र वाचनाची आवड मला मराठीने लावली, अगदी लहानपणापासून! ती कायम राहिली असे नव्हे, तर वाढतच गेली आहे. जिज्ञासेची ही क्षेत्रे जशी वाढत गेली तशी त्या क्षेत्राशी संबंधित स्त्री–पुरुषांच्या जीवनाविषयी औत्सुक्य वाढले आणि चरित्रग्रंथांची, त्यात आत्मचरित्रे व आठवणीही (मेमॉयर्स) आल्या, आवड कायम राहिली. या वर्षी मी वाचलेल्या चरित्रग्रंथात मुद्दाम उल्लेख करण्यासारखा ग्रंथ म्हणजे श्री. निरद चौधरी यांनी सुप्रसिद्ध जर्मन पंडित मॅक्समुलर यांचे 'स्कॉलर एक्स्टॉ ऑर्डीनरी' या नावाने प्रसिद्ध केलेले चरित्र.

यशवंतराव चव्हाण यांच्या वाचनामध्ये विविधता होती. केवळ इतिहास आणि संस्कृती प्रेम याचा साचेबंद प्रभाव अशा वातावरणात ते कधीच रमले नाहीत. विश्वसंस्कृती प्रेम हे मूल्य व्यक्तिमत्वात रुजले आणि कालपरत्वे अधिकाधिक विकसित होत राहिले याचे मुख्य कारण म्हणजे स्वदेशी साहित्याबरोबरच विदेशी साहित्यरचनांचे त्यांनी केलेले वाचन होय. यशवंतरावांचे बहुभाषिक साहित्यप्रेम आणि अशा साहित्यकृतींच्या निर्मात्यांशी त्यांनी जपलेले, वृद्धींगत केलेले कधी प्रत्यक्ष तर कधी वैचारिक आणि भावनिक नाते ही त्यांच्या व्यासंगवृत्तीची बैठक राहिली.

❑

## जोशूचा पाऊस

*जोशूने धुवांधार पावसाचा नाद ऐकला*
*तेव्हा त्याला पावसाची भीतीच वाटली.*
*पाऊस खिडकीतून पाहिला तेव्हा*
*त्याच्या अंगावर चक्क शहारे उमटले!*
*जोशूने उघड्या दारातून पाऊस पाहिला*
*तेव्हा तर त्याचे डोळे विस्फारले गेले*
*पाऊस दणदण अंगावर झेलला तेव्हा*
*तो थेट त्याच्या मनामध्येच भिनला!*
*आता पाऊस नसला तरीही*
*जोशू केव्हाही पावसात शिरतो*
*जोशूची आणि पावसाची*
*आता घट्ट मैत्री झाली आहे!*

**रमेश पानसे**

# महाराष्ट्रातील शिक्षण : वास्तव आणि दिशा

**रमेश पानसे**

शिक्षण हा मानवी जीवनाचा अविभाज्य व आवश्यक घटक आहे. निसर्गाने माणसाला शिकणारा मेंदू दिला आहे, आणि त्याने शिकता शिकता, आणखी शिकण्यासारखे असे कितीतरी `संस्कृती' च्या रूपाने योगदान माणसाला दिले आहे. संस्कृती ही सतत विकसित होत जाणारी अशी प्रवाही गोष्ट असते. तंत्रज्ञान, शास्त्रज्ञान आणि त्यांच्या बरोबरीने भाषा या गोष्टी जसजशा प्रगत होत जातात तसतशा `शिकण्या'च्या वृक्षाला नवनवीन फांद्या फुटत जातात. मानवी शिक्षणाची परिमाणे नुसतीच वाढतातच असे नाही तर ती कालाबारोबर बदलतही जातात: कारण, या बदलांना कारणीभूत ठरणाऱ्या माणसाच्या गरजा बदलत जात असतात. या बदलांचा वेध घेत घेत शिक्षणाला सतत बदलत जावे लागते. परिवर्तनशीलता हा शिक्षणाचा पायाभूत गुण आहे.

**शिक्षण भावी काळासाठी**

शिक्षणाला, मानवी जीवनाचा अविभाज्य व आवश्यक घटक बनविणारी आणखी एक गोष्ट आहे. मानवी मेंदूला भविष्याचा वेध घेण्याची, भावीकालाचे अंदाज घेण्याची व भावीकालासाठी नियोजन करण्याची ताकद असते. त्यामुळे माणूस एकीकडे भावीकाळाची स्वप्ने रेखाटू शकतो तर दुसरीकडे, त्यासाठी मानवी क्षमतांच्या विकासाची तरतूद करू शकतो: आणि शिक्षण हे याची जवाबदारी घेत असते. अशा तऱ्हेने, अर्थातच, माणसांचा वर्तमानकाळ व त्यांचा भविष्यकाळ याच्यामधील पूल बांधण्याचे काम शिक्षण करीत असते. जेव्हा भविष्यकालीन समाजाच्या स्वरूपाविषयीचे काही स्वप्न, काही भूमिका, काही अपेक्षा किंवा काही ठोस चित्र आजच्या समाजापुढे असेल तर त्या दिशेने पुलाची बांधणी करणे शक्य होते. परंतु असे काही डोळ्यांपुढे नसेल, तर पूल बांधणीला दिशा देणे शक्य होत नाही. त्यामुळे शिक्षण दिशाहीन अथवा भरकटलेले असे राहते: किंवा ते स्थितीबद्ध नि गतिहीन राहण्यात धन्यता मानते.

**भावीकाल समाजस्थितीचे स्वप्न**

मार्क्स आणि गांधीजी ही थोर माणसे होती. त्यांनी समाजापुढे भावीकाल–समाज स्थितीचे स्वप्न ठेवले होते. मार्क्सला शोषणविरहीत, समताधिष्ठीत आणि शासनविहीन असा समाजचित्र अभिप्रेत होते, आणि त्यासाठीचा मार्ग सांगण्याचा प्रयत्न त्याने केला. गांधीजींना, स्वयंपूर्ण खेड्यांच्या समूहांच्या समाजाचे स्वप्न पडले होते. त्यासाठी रचनात्मक कार्यक्रमांची उभारणी करण्याचा प्रयत्न त्यांना केला.

त्या दिशेने माणसे घडवण्यासाठी 'नयी तालीम'च्या तत्त्वज्ञानाची व व्यवहारांची मांडणी त्यांनी केली. शिक्षणाच्या या पुलावरून गेल्यास नव्या समाजरचनेकडे वाटचाल करता येईल अशी त्यांची धारणा होती. आज मात्र, असे कुठलेच भावीकालाचे समाजचित्र, भारतीय समाजापुढे नाही, त्यामुळे त्यासाठी असावा असा रचनात्मक कार्यक्रम आपल्यापुढे नाही; आणि मग, शिक्षण हे दिशाहीन झाल्यास नवल नाही !

आज आपल्याला भावीकाल समाजचित्राचा, वास्तवाधारित पण नव्याने विचार करायचा झाल्यास मला तरी दोनच पर्याय दिसून येतात. एक, भारतातील (विशेषत: शिक्षणक्षेत्राशी संबंधित) प्रचलित समाजवादी विचारसरणीनुसार शिक्षणाची मालकी व नियंत्रण जास्तीत जास्त सरकारकडे ठेऊ इच्छिणारी, सरकारची समान शिक्षण सार्वत्रिक करू इच्छिणारी विचारधारा व तिने समोर ठेवलेले, समान शिक्षणाकरवी समाजवादी समाजरचना घडवू पहाणारे स्वप्न. दुसरा पर्याय आढळून येतो तो म्हणजे, भारतातील प्रचलित मुक्त अर्थव्यवस्थेच्या विचारसरणीनुसार, शिक्षणात खाजगी क्षेत्राला प्राधान्य देणारी विचारधारा व तिने समोर ठेवलेले, व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित, आजच्या जागतिकीकरणाच्या वैश्विक वातावरणाशी जुळवून घेणारी विचारधारा व तिने समोर ठेवलेले लोकशाही समाजरचनेचे चित्र. विचारकांच्यात या दोन विरुद्ध दिशांच्या विचारधारांबाबत हमरीतुमरीने वाद घडवत आहेत; आणि शासन दोन्हीकडे झुकण्याचा प्रयत्न करते आहे.

**आज मात्र, असे कुठलेच भावीकालाचे समाजचित्र, भारतीय समाजापुढे नाही, त्यामुळे त्यासाठी असावा असा रचनात्मक कार्यक्रम आपल्यापुढे नाही; आणि मग, शिक्षण हे दिशाहीन झाल्यास नवल नाही !**

### मिश्र अर्थव्यवस्था

या दोन्हींमध्ये एक सुवर्णमध्य आहे आणि तो भारतीय वास्तवाशी अन् भारतीय राज्यघटनेशी मिळताजुळता आहे, असे मला वाटते. भारतीय राज्यघटनेने लोकशाही समाजरचनेचा स्वीकार केला आहे; त्याचबरोबर मिश्र अर्थव्यवस्थेचाही स्वीकार केला आहे. विविध वस्तू व सेवानिर्मितीच्या क्षेत्रांमध्ये, एकाचवेळी, खाजगी उपक्रम व सरकारी उपक्रम असावेत, अशी राज्यघटनेने दिलेली धोरणविषयक दिशा आहे. त्यातही एक भूमिका अशी आहे, की ज्या बाबी (संरक्षण इत्यादी) खाजगी क्षेत्राकडे सोपवणे इष्ट नाही, ज्या बाबी (नफ्या-तोट्याच्या विचारामुळे) खाजगी क्षेत्र करू शकत नाही वा इच्छित नाही, आणि ज्या बाबी करणे सरकारलाच आवश्यक आहे अशा बाबी, यांची जबाबदारी सरकारवर असेल. एरवी, खाजगी क्षेत्राला मुक्तद्वार असावे असेच सूचन घटनेत आहे; वत्याला मान्य अशा व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचा आधार आहे.

राज्यघटनेचा आधार असलेली अशा प्रकारची स्वातंत्र्योत्तर काळातील आपली परंपरा अशी आहे की वस्तुनिर्मितीच्या क्षेत्रात, सामान्यत: खाजगी क्षेत्र व विशेष बाबतींत सरकारी क्षेत्र अस्तित्वात आहे. सेवानिर्मितीच्या क्षेत्रातही खाजगी-सरकारी अशी वर्गवारी अस्तित्वात आहे. मग ते वाहतुकीचे क्षेत्र असो की आरोग्याचे. खाजगी दवाखाने काढण्याची मुक्त मुभा आहेच. तरीही आरोग्यसेवा सर्वांपर्यंत पोचेलच असे नाही; मग येथे सरकार आपल्या सर्व शक्तीनिशी प्रवेश करते; आरोग्यसेवा

सर्वांपर्यंत पोचवू पहाते. हेच योग्य आहे. शिक्षणात असेच घडले पाहिजे. सर्वत्र खाजगी शाळा निघायला हव्यात. सरकारनेही खाजगी शाळांना मुक्तता देण्याचे धोरण अंगिकारले पाहिजे, कारण शिक्षणाची जबाबदारी समाजानेच घेणे योग्य. गरजानुसारी शिक्षण, विविधता जोपासणारे, प्रयोगशीलतेला वाव देणारे असे दर्जात्मक शिक्षण व्यक्ती, स्वेच्छासंस्था, उद्योग-व्यापार क्षेत्र प्रकर्षाने देऊ शकतात, असे आजवर दिसून आले आहे.

**सरकारची शिक्षण मक्तेदारी**

याउलट सरकारी मक्तेदारीखाली असलेले शिक्षण, आजवर तरी दोन तऱ्हेच्या भ्रष्टाचारांनी ग्रासलेले आहे. एक आहे तो पैशांचा भ्रष्टाचार. सरकारने अंदाजपत्रकात शिक्षणासाठी योजलेला पैसा आणि प्रत्यक्षपणे विद्यार्थ्यांच्या स्तरावर पोचणारा पैसा यात महदंतर असते. पैसा हा पाण्यासारखा सापडेल त्या फटींतून उताराकडे वाहत असतो. पूर्वी सरकारी योजना, कार्यक्रम, प्रकल्प यामधून पैसे खाल्ले जात असत; पण आता तर पैसे खाण्याची अंगभूत सोय असेल अशाच योजना, कार्यक्रम, प्रकल्प आखले जातात असा माझा कयास आहे. मग ते, सर्वशिक्षण अभियान असो वा विद्यार्थी संख्येनुसारचे अनुदान असो, विद्यार्थिनींच्या हजेरीसाठीचा दैनंदिन रुपया असो वा दुपारचे भोजन असो, ही सर्व मुळातच गळतीच्या अपेक्षेने घेतलेली फुटकी भांडी असतात असा संशय येतो. शाळांमध्ये स्वयंपाक करून विद्यार्थ्यांना जेवण देण्याचा घाट घालणे हा तर केवढा तरी मोठा सामाजिक अपव्यय आहे. आपण काहीतरी वैचारिक गल्लत करत आहोत असे वाटते. शाळेचे काम शिक्षण देण्याचे आहे; जेवण देण्याचे नाही. शाळांनी कसून शिक्षण द्यावे, बसून जेवण देऊ नये. जेवण देण्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांची आहे. सरकार गरीब पालकांना त्यांच्या पाल्यांच्या जेवणासाठी मदत करू इच्छित असेल तर त्यांची सोय अन्य घरांतून वा खाणावळींतून करावी, शाळा खरकटी करू नये.

**कर्तव्य-भ्रष्टाचार**

सरकारी मक्तेदारीखाली अनुभवात येणारा आणखी एक भ्रष्टाचार हा शिक्षकांचा अनेकदा दिसून येणारा कर्तव्यातील भ्रष्टाचार होय. आता शिक्षकांना बऱ्यापैकी आर्थिक सुरक्षितता, कायम स्वरूपाची नोकरी आणि तीही पूर्ण पगाराची पण अर्धवेळची अशी, शिक्षकी पेशाला आवश्यक अशी स्थिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे हा असा शिक्षकवर्ग आपल्या सर्व शक्तींनिशी विद्यार्थांचे भवितव्य उज्ज्वल करू शकतो. पण सरकारी नियम, निरर्थक कामे, सततची निरूपयोगी प्रशिक्षणे आणि प्रत्यक्ष वर्गातील शिक्षणातही उतरवले जाणारे शिक्षक-विद्यार्थी-शिक्षणप्रक्रिया यातील मोकळेपण घालवणारे नियम या सगळ्यांचा जाच शिक्षकवर्ग सततचा सोसत असतो. त्यातून शिक्षणाचा दर्जा तर घसरतोच पण शिक्षकांचीही उमेद नाहीशी होऊन त्यांचाही दर्जा घसरतो. सरकारी अधिकाऱ्यांची शिक्षक आणि शिक्षण यांवरील पकड ढिली करणे हा एक उपाय आहे; पण तो तात्पुरता उपाय आहे.सरकारची एकूण शिक्षणावरचीच मक्तेदारी टप्प्या-टप्प्याने सैल करत जाणे हाच एकमेव दीर्घकालीन उपाय मला दिसतो. भारतीय अर्थव्यवस्थेचा अलीकडचा अनुभव असा आहे की, जेव्हा उद्योगक्षेत्राला बांधून ठेवणारे परवानाराज सैल झाले तेव्हाच उद्योगविश्व विस्तारले आणि फोफावले. तसेच शिक्षणाविषयी होणे निकडीचे आहे.

**शिक्षणातील गुंतवणूक**

शिक्षणक्षेत्रातील आर्थिक गुंतवणुकीचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. आज शिक्षणक्षेत्राची गरज मोठी

आहे. बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा (२००९) केल्यापासून तर शिक्षणक्षेत्राची आर्थिक गरज कितीतरी पटींनी वाढली आहे. अशावेळी सरकार ही वाढती गुंतवणूक पेलण्यास समर्थ नाही, हे वर्षानुवर्षेचे चित्र आहे. मिश्र अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेत सरकारी व खाजगी अशी एकूण गुंतवणूक असणे हिताचे मानले आहे. त्यामुळे शिक्षणक्षेत्रातील अधिकाधिक जबाबदाऱ्या खाजगी क्षेत्राकडे सुपूर्त केल्यास, पुरेशी गुंतवणूक शिक्षणक्षेत्राला प्राप्त होऊ शकेल.

**शिक्षणव्यवहारातील प्रश्न**

धोरणविषयक बाबींकडून आपण जेव्हा प्रत्यक्ष शिक्षणव्यवहाराच्या प्रांगणात शिरतो तेव्हा अनेक प्रश्न लाल दिव्यांसारखे उपस्थित होतात. साठ–पासष्ठ वर्षे झाली, पण सरकार अजूनही, मुलांना शाळेत येती करण्याच्या आणि पटावर आल्यावर टिकती करण्याच्या प्रयत्नांवर अडकले आहे. त्यामुळे त्यांना वयोमानानुसार शिकती करण्याचा फार महत्त्वाचा प्रश्न कायम दुर्लक्षित राहिलेला आहे. वास्तविक जो प्राधान्याने हाती घ्यायचा विषय होता तो, सरकारच्या मक्तेदारी धोरणामुळे कायम मागेच राहिला. सर्व मुले लहान वयातच उत्तम रितीने शिकू शकतात, हे अनेक खाजगी प्रयोगशील शाळांनी कितीतरी वेळा सरकारच्या निदर्शनास आणले आहे. पण सरकार अशा शाळांना आपल्याच प्रयोगशाळा आहेत असे कधी मानतच नाही. त्यामुळे अशा प्रयोगातील शाळांतील शैक्षणिक उपक्रमांचे, साधनांचे, साहित्याचे आणि पध्दतींचे सार्वत्रिकीकरण कधी होऊच शकले नाही. शालेय शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्नही असाच सरकारच्या आततायी धोरणांमुळे अनिर्णित राहिला आहे.

**खाजगी शिक्षणसंस्थांची शिक्षणसमज**

खाजगी शिक्षणसस्थांचे मालक–चालक–व्यवस्थापक यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि त्यांची शिक्षणविषयक कोती समज हा एक, विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या संदर्भातील आजचा एक जागता प्रश्न आहे. आपण व्यावसायिक जीवनात यशस्वी झालो, आपण राजकारणात मोठे झालो, आपण उद्योगांत मोठी धनप्राप्ती केली किंवा एकूण समाजात आपल्याला स्थान–मान आहे म्हणजे आपण आपसूकच शिक्षणसंस्था चालविण्यास सक्षम झालो आहोत असे मानणे किंवा असा भ्रम जोपासणे हे चक्क अडाणीपणाचे लक्षण आहे. शिक्षणाचे क्षेत्र हे ज्ञान, समज आणि कौशल्ये यांचे एक विशेष तज्ज्ञतेचे क्षेत्र आहे. शिक्षणसंस्था चालविण्यासाठी शिक्षण समजावे लागते. शिक्षण समजण्यासाठी विद्यार्थी समजावा लागतो. विद्यार्थी समजण्यासाठी मानसशास्त्र व मज्जाशास्त्र यांची निदान तोंडओळख होण्यासाठी सुध्दा खास काही शिकण्याची–वाचण्याची, अभ्यास करण्याची गरज असते. आपण या ना त्या क्षेत्रात, समाजात मोठे आहोत म्हणजे आपल्याला शिक्षण कळतेच, असे मानणाऱ्यांनी काढलेल्या शिक्षणसंस्था विद्यार्थांचे भले करू शकत नाहीत. वरवरच्या श्रीमंती देखाव्यांनी आणि इंग्रजी भाषेच्या धूसर पडद्याआड आपले उणे लपवून पालकांची फसवणूक करणे आजच्या पालकांच्या संभ्रमित अवस्थेत फारसे कठीण नसते. धनप्राप्तीचा नि सत्ताप्राप्तीचा हेतू ठेवून शिक्षणसंस्था उभ्या राहतात, पण त्या विद्यार्थ्यांना आयुष्यात दमदारपणे उभ्या करतीलच याची खात्री देता येत नाही.

**विद्यार्थ्यांची गुलामी**

शिक्षणात पालकांच्या इच्छा–अपेक्षा, शिक्षकांच्या पठडीबद्ध संवेदना, संस्थाचालकांच्या आढ्यताखोर कल्पना आणि सरकारच्या शिक्षण बंदिस्त करणाऱ्या

नियमावल्या या साऱ्यांचे ओझे अंतिमत: शिकणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींवर पडत असते. आपल्या आजच्या शिक्षणव्यवस्थेत, बिचाऱ्या विद्यार्थांना शेवटचे स्थान असते. व्यवस्था कायम त्यांना गृहीत धरत असते. त्यामुळे विलक्षण दुर्लक्षाचे, दबावाचे ते धनी बनतात. शिक्षणाच्या दैनंदिन व्यवहारात शिक्षक हे एकीकडे संस्थाचालक व दुसरीकडे शासन यांचे गुलाम म्हणून वावरतात. आणि अशा शिक्षकांचे गुलाम म्हणून विद्यार्थी वावरत असतात. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य नाही. स्वयंप्रेरणेने काही करण्या–वागण्या–बोलण्याची मुभा नाही; स्वतंत्रपणे विचार करण्याची, ते मांडण्याची सोय नाही. आपल्याला सुचणाऱ्या कल्पना कृतीत उतरवण्यास वाव नाही. सारे शालेय जीवन परीक्षांच्या नाडीने घट्ट बांधून ठेवलेले अशा परिस्थितीत आणि तणावपूर्ण वातावरणात मुले शिकू पाहतात. तरीही ती शालेय व्यवस्थेत टिकतात, काही ना काही शिकतात हेच आश्चर्यजनक आहे; त्यांची शिकण्याची ऊर्मी शिकण्याची स्वयंप्रेरणा, इतरांनी विझवायचा आटोकाट प्रयत्न करूनही, तेवती आहे हाच याचा अर्थ. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात उद्‌घोष केलेले स्वातंत्र्याचे तत्त्व आणि विद्यार्थ्यांची व्यावहारिक गुलामगिरी या परस्पर विसंगत गोष्टी आहेत. या वातावरणात विद्यार्थी भारताचे स्वतंत्र नागरिक म्हणून नव्हे तर भारताचे गुलाम नागरिक म्हणून घडतील याचीच भीती वाटते. तसेच ते घडताहेत असा अनुभवही, आजच्या समाजाच्या सार्वत्रिक उदासिनतेतून आपण घेऊ लागलो आहोत.

**जीवनातून शिक्षण**

नको असलेले वास्तव बदलणे हे खरे तर शिक्षणाचेच काम आहे. कालौघाच्या एका टोकाला विशिष्ट समाजनिर्मितीचे ध्येय आणि दुसऱ्या टोकाला,

**आपल्या आजच्या शिक्षणव्यवस्थेत, बिचाऱ्या विद्यार्थांना शेवटचे स्थान असते. व्यवस्था कायम त्यांना गृहीत धरत असते. त्यामुळे विलक्षण दुर्लक्षाचे, दबावाचे ते धनी बनतात.**

म्हणजे या दिशेने जाण्याच्या पहिल्या टप्प्याला बालशिक्षण आणि प्राथमिक शिक्षण. शिक्षणाची दिशा ठरली की रचना ठरते. रचनेनुसार व्यवस्था ठरते. व्यवस्थामांडणीसाठी धोरणे–कायदे–नियमावली यांची चौकट उभारली जाते. समाज गतीनुसार शिक्षण आणि शिक्षणातून समाज–गतिमानता ही एक मानवी विकासाची नैसर्गिक पद्धत आहे. त्यामुळे समाजगती हेरून शिक्षण बेतावे लागते व तेच शिक्षण समाजाला अपेक्षित गती देऊ शकते. शिक्षण हे नेहमीच भावीकालाला अभिमुख असे असावे लागते; कारण, आजचे शिक्षण हे माणसाचे उद्याचे जीवन ठरवीत असते. अशी शिक्षण आणि जीवन यांची परस्पर जोडणी असते. सारे शिक्षण हे अंतिमत: जीवनासाठीच असते. किंबहुना, म्हणूनच, शिक्षण हे जीवनातूनच घडावे लागते. केवळ पुस्तकांतून होते ते भ्रामक शिक्षण होय! जीवनातून शिक्षण ही शिक्षणपध्दती त्यातून अपरिहार्यपणे उभी राहते. ही अतिशय प्रभावी पध्दती असते.

**रचनावादी शिक्षणप्रणाली**

अलीकडे, शिक्षणसंबंधित अशा विविध शास्त्रांच्या संशोधनातून जीवनातून शिक्षण घेण्याची, जीवनातील विविध वास्तव अनुभवांतून स्वत:चे शिक्षण करण्याची एक नवी विचारप्रणाली, शिक्षणक्षेत्रात, आग्रहपूर्वक अवलंबिली जात आहे. हिला 'ज्ञानरचनावादी शिक्षणप्रणाली' म्हणून ओळखले जाते. भारतात,

केंद्र सरकारने २००५ साली दिलेल्या राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखड्यात ही पध्दत वर्गशिक्षणात, विषयशिक्षणात कशी आणायची याचे दिग्दर्शन केले आहे. १ एप्रिल २०१० पासून राष्ट्रभर लागू केलेल्या बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण कायद्यात याचा समावेश करून, देशभराच्या शिक्षणास हा रचनावादी तत्त्वाधार देण्याचा मानस व्यक्त केला आहे. देशभराच्या शिक्षणातील परिवर्तनाची वाट येथून सुरू होत आहे.

रचनावादी शिक्षणपध्दती ही आजवरच्या आपल्याला परिचित असलेल्या पठडीबध्द शिक्षणापेक्षा मूलत: वेगळी आहे. त्यामुळे ती पूर्णत: अंगिकारायला, आणि त्यातूनही संबंधिताच्या पचनी पडायला वेळ लागणार आहे. तरीही कमी वेळात हे साध्य करायचे तर ते आव्हान खूप मोठे आहे. तीन पायऱ्यांनी ते साध्य करता येईल. अजूनही शासनच जर शिक्षणाची दिशा देत असेल तर त्याने प्रथमत: शासकीय शिक्षणखात्याच्या पायरीवर हा रचनावाद आपलासा करायला हवा. शिक्षणखात्यातील महत्त्वाचे विभाग, प्रशिक्षण व संशोधनविभाग यामधील सर्व स्तरांवरील अधिकाऱ्यांना रचनावाद कळला पाहिजे.त्याचबरोबर, डी. एड्. बी.एड्. नि एम्.एड्.चे सर्व अभ्यासक्रम मूलत: बदलले पाहिजेत. एकीकडे असे भावी शिक्षकांना नव्याने प्रशिक्षण देताना रचनावादी स्वरूपाच्याच शिक्षणाचे दिले जाईल, तेव्हा दुसऱ्या बाजूला, आजच्या शाळातील शिक्षकांचे प्रशिक्षण चालू ठेवावे लागेल. यानंतरच्या टप्प्याला शाळांमधून रचनावादी शिक्षण, चालू वर्तनवादी शिक्षणाच्या जागी वर्गावर्गातून उतरवले जावे. त्याच्याबरोबरीने त्याच्याशी सुसंगत अशा मूल्यमापन पद्धती शिक्षकांनी सरावाच्या कराव्यात. ही, नवे तत्त्वज्ञान दैनंदिन व्यवहारांतून उतरवण्याची तर्कशुध्द पध्दती होऊ शकते. परंतु सरकार तिरपाकडे चालतेय असा अनुभव येतोय. सरकारने शिक्षणहक्क कायदा व्यवहारात आणताना या शिक्षणआशयाकडे दुर्लक्ष करून प्रथमत: कोणती गोष्ट केली असेल तर ती म्हणजे मराठी शाळांच्या मुसक्या बांधून त्या बंद होतील आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांना पायघड्या घालून त्यांचीच सद्दी होईल यासाठी परिपत्रक काढले (१९ जून २०१०). ज्यांना आपल्या मुलांनी मराठी शाळांमधून दाखल करायचे आहे त्यांचाही हा मूलभूत हक्क डावलण्याचे कृष्णकृत्य सरकार बेकायदेशीररित्या करीत आहे.

**शिक्षक प्रशिक्षण**

रचनावादाच्या स्वीकारसाठी आधी शासकीय पातळीवरील प्रबोधन सरकाराला मुळीच महत्त्वाचे वाटत नसावे. ही पायरी न घेताच सरकारने अल्पप्रमाणात शिक्षण प्रशिक्षणाकडे मोहरा वळविला. आणि त्यांच्याकडून काहीही तयारी न होता, वर्गामधून रचनावादी पध्दती न आणताही थेट मूल्यमापनाच्या रचनावादी पध्दती सक्तीच्या केल्या. वास्तविक उद्याच्या वर्गबदलांसाठी उद्याच्या शिक्षकांचे थेट नव्या पध्दतीचे प्रशिक्षण व्हायला हवे त्यासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम बदलायला हवेत, पण हे सरकार तातडीने का करीत नाही हे कळत नाही. त्यात तार्किक चूक अशी या वार्षिक–व्दैवार्षिक प्रशिक्षणांमधे आता जे शिकायचे नाही, जे बाजूला सारायचे आहे तेच शिकवायचे आणि नंतर नोकरीच्या काळात, याची वजावट करणारे नवे शिक्षण–प्रशिक्षण पुन्हा द्यायचे. यात वेळेचा नि पैशांचा अपव्यय मोठा आहे.

**नवे शिक्षण**

प्रचलित शिक्षण हे शतकापूर्वीच्या मानसशास्त्रातील वर्तनवादी विचारसरणीवर

प्रामुख्याने आधारलेले आहे. नवे शिक्षण हे मज्जामानसशास्त्रीय आधुनिक अशा रचनावादी विचारसरणीवर आधारलेले आहे. वर्तनवादातून रचनावादाकडे हा केवळ मोठा प्रवास नाही तर तो पायाभूत असा बदल आहे. वर्तनवादामध्ये `शिकविण्याला' प्राधान्य होते, म्हणून शिक्षकाचे स्थान मध्यवर्ती होते. याउलट, रचनावादात `शिकणे, आपणहून शिकणे' याला प्राधान्य आहे; येथे शिक्षणात विद्यार्थी केंद्रस्थानी आहे. येथे सर्वस्वी पुस्तकांमधून शिकायचे नाही तर पुस्तकी शिक्षणाला जीवनातील वास्तवाची जोड देऊन शिकायचे आहे. विद्यार्थी, शिक्षकांकरवी – पुस्तकांकरवी मिळणारी माहिती प्रत्यक्ष



अनुभवांद्वारे पक्की करतील अशी येथे योजना आहे. येथे `स्वयंअध्ययना'वर भर आहे. शक्य तेथे येथे `करून शिकण्या'वर भर आहे. विद्यालयीन व्यवस्थेत अशा अनुभवांच्या, स्वयंअध्ययनाच्या, करून शिकण्याच्या संधी विद्यार्थ्यांना पुरवणे अभिप्रेत आहे. विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार, विविध बुद्धिमत्तांनुसार आवडी–निवडींना प्राधान्य देत शिकता येईल अशा वातावरण निर्मितीला या पद्धतीत महत्त्वाचे स्थान आहे.

**विद्यार्थी केंद्रस्थानी**

शालेय–महाविद्यालयीन शिक्षण हे नेहमीच विद्यार्थ्यांसाठी असते, हे अतिशय साधे आणि सत्य आपल्याला स्वीकारले पाहिजे, म्हणजे सारी शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी धरून आखली जाईल. विद्यार्थी समजावून घेणे हे शिक्षकाचे आद्य कर्तव्य ठरेल; आपल्या मुलांच्या विद्यार्थी म्हणून असणाऱ्या गरजा समजावून घेऊन त्यांची पूर्ती करणे हे पालकांचे नित्य कर्तव्य ठरेल. असे घडले की शिक्षणाचा आशयच बदलून जाईल. शिक्षण आता केवळ माहितीचा, घोकंपट्टीद्वारे साठा करणारे नसेल तर ते एका बाजूला विद्यार्थ्यांच्या पूर्वीच्या अनुभवांशी जोडलेले असे असेल. अशाप्रकारे माहितीचे रूपांतर ज्ञानामध्ये करण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होईल.

**शिक्षणाची उद्दिष्टे**

मानवी शिक्षणाला, नेहमीच, काहीतरी हेतू असतो, काही उद्दिष्ट असते. मानवी मनाला निसर्गत:च मिळालेल्या विविध क्षमतांना योग्य वयात, योग्य प्रकारे विकसनाच्या संधी प्रप्त करून देणे, यालाच प्रामुख्याने, लहान मुलांचे शिक्षण असे म्हणता येईल. उपजत विचारशक्तीचा सामाजिक संकेतांनी विकास साधणे आणि

कल्पनाशक्तीला फुलण्याची मुभा देणे या दोन पायांवर शिक्षणाचे बस्तान बसवावे लागते. समाजजीवन हा व्यक्तिजीवनाचा जसा एक अविभाज्य भाग असतो, तद्वतच, व्यक्तिजीवन हा नेहमीच समाजजीवनाचा एक अंश असतो. त्यामुळे शिक्षण हे `व्यक्ती'चे होत असले तरी ते केवळ `व्यक्तिगत' कधीच रहात नाही. व्यक्तिने समाजजीवनाच्या अंगाने विकसित होणे हेच अंतिमत: शिक्षणातून घडत जावे लागते. समाजसातत्याच्या आणि समाजकल्याणाच्या दृष्टीने, व्यक्तिला समाजाशी, समाजातील अन्य लोकांशी, सामाजिक व नैसर्गिक पर्यावरणाशी मिळून-मिसळून



राहता येईल असे मानस व्यक्तिच्या शिक्षणाकरवी घडले पाहिजे: त्यासाठी, अर्थातच व्यक्तिला स्वनियंत्रणाची बाधा झाली पाहिजे. आयुष्यात आवश्यक तेथे, आवश्यक तेव्हा, आवश्यक त्या पद्धतीने स्वत;चे स्वत:ला नियंत्रण करता आले पाहिजे. व्यक्तिचे सामाजिक स्थान हे गुणावर अवलंबून असते.

**स्वभाषेचे स्थान**

जेवढे मानवी जीवनात, तेवढेच शिक्षणात भाषेचे म्हणजे स्वभाषेचे मातृभाषेचे किंवा पहिल्या शिकलेल्या भाषेचे स्थान अनिवार्य असते; महत्त्वाचे असते. भाषेची समृद्धी हाच व्यक्तिविकासाचा पाया असतो. जीवन आपण भाषेकरवीच व्यक्त करत असतो, तसेच शिक्षणही भाषेकरवीच घेत असतो. हे शिक्षणसाधन जेवढे पक्के तेवढे शिक्षण चांगले होते. स्वभाषा हेच आपले विचारांचे नि कल्पनांचे माध्यम असते त्यामुळे सहाजिकच भाषाशिक्षण हा शिक्षणाचा मध्यवर्ती महत्त्वाचा भाग असतो.

**परिशीलन**

हेतुपूर्ण शिक्षणाचे हे नवरूप समोर ठेवून, शिक्षण परिवर्तनाची वाट चालायची आहे. बदल नित्यनूतनता हा जीवनाचा स्थायिभाव आहे; आणि शिक्षण हे जर जीवनासाठी आहे तर तेही बदलते असणार, परिवर्तनशील असणार हे सत्य स्वीकारून ,डोळसपणे शिक्षणाचे सातत्याने परिशीलन होत राहिले पाहिजे.

अशा, आजच्या घडीच्या परिशीलनाचा हा एक प्रयत्न होय !

❑

लहान मुलांच्या भाषा-शिक्षणात एक गमतीची पण प्रभावीपणे घडून येणारी गोष्ट आढळते. ती म्हणजे, लेखन-वाचनाला बऱ्यापैकी भिडलेली आणि जराशी सरावलेली मुले, फारच लवकर आपले विचार, आपल्या भावना व कृती यांच्या मौखिक व लिखित अभिव्यक्तीकडे आपसूकपणे वळतात, मुले वाङ्मयकर्ती होऊ लागतात. आमच्या सर्वच शाळांतल्या प्राथमिकच्या वर्गांमधून हा आनंदमय अनुभव येतो.

**निळे आकाश-हिरवी झाडे-काळी माती...मधून**

|| जागर ||

# असे आंदोलन–असे शासन

**अरूण रंधे**




१६ जुलै २०१२ पासून पुण्यातील मध्यवर्ती इमारतीसमोर एक आंदोलन, एक बैठा सत्याग्रह चालू होता. शिक्षणहक्क समन्वय समितीच्या वतीने प्रा. रमेश पानसे हे या आंदोलनाचे नेतृत्व करीत होते. या आंदोलनाची मागणी अगदी साधी होती. ‘मराठी शाळा टिकू द्या, मराठीतून शिकू द्या!

राज्यातील मराठी शाळांच्या व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, शिक्षक, पालक व विद्यार्थी हा बैठा सत्याग्रह चालवीत होते.

लोकशाही व्यवस्थेला सत्याग्रह, आंदोलने नवीन नसतात. यातूनच लोकशाही विकसित होत असते. पण अशाही विषयावर आंदोलन करावे लागते, हे पाहून आपली लोकशाही व्यवस्था नेमकी कोणाच्या हाती आहे? त्यांना लोकांचे कल्याण नेमके कशात आहे? लोकांचे नैसर्गिक हक्क नेमके कोणते आहेत! याचे त्यांना ज्ञान आहे का, असा संशय आल्यावाचून राहात नाही.

देशातील लहान मुलांनी समजा असे आंदोलन केले की, आम्हाला अमूल कितीही चांगले दूध असेल तरी ते नको आहे. आम्हाला हवे आहे आमच्या आईचे दूध! तर असे आंदोलन ज्या समाजात होईल तो समाज समंजस म्हणून गणला जाईल का? बालकाला आईचे दूध मिळालेच पाहिजे. तो त्याचा नैसर्गिक हक्क आहे. सर्व आयुष्याची उभारणी करणारी जीवनसत्वे व प्रतिकारक्षमता या दूधातून त्याला मिळणार असतात. जी गोष्ट आईच्या दुधाची तीच

गोष्ट नेमकी आईच्या भाषेचीही असते! जगातील माणसांपासून तो सर्व प्राणीमात्रांपर्यंत सर्वजण आपल्या नव्या पिढीला मातृभाषेतूनच ज्ञान देत असतात. माणसाचेही मूल शिकते ते मातृभाषेतूनच. अर्थातच, मातृभाषा याचा अर्थ बालकाला जन्म देणाऱ्या आईची भाषा हा जसा होतो तसात पुढे तो परिसर भाषा म्हणून बालकाच्या विकासात महत्त्वाचा घटक ठरतो. बालकांची पहिली शिक्षिका ही जशी आई असते तसेच नंतरच्या शिक्षकांच्या भूमिकेत त्याचे कुटुंब असते, त्याचा परिसर असतो. म्हणूनच परिसर भाषा म्हणजेच मातृभाषा; ही बालकाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असते. मूल दैनंदिन जीवनात हसते, रडते, कधी कोमेजते, कधी नाराज होते. ते असे वागते कारण परिसरातील क्रिया, प्रतिक्रियांचे त्याला आकलन झालेले असते. त्याची आंतरक्रिया म्हणून ते वेगवेगळ्या भावनांमध्ये आपला आविष्कार दाखवीत असते. पुढे औपचारिक शिक्षणातील शिकणे देखील आकलन प्रक्रियेशीच संबंधित असते व आकलनप्रक्रिया ही बालपणी तरी मातृभाषेशीच संबंधित असते. आधुनिक मेंदूसंशोधनानेही ही बाब मान्य केली आहे. तरीही महाराष्ट्रात 'मराठी शाळा शिकू द्या, मराठीतून शिकू द्या' असे आंदोलन करावे लागते ही बाब लाजिरवाणी नाही का? मराठी माणसांनीच निवडून दिलेले सरकार सत्तेवर आहे. मराठी घरातच जन्माला आलेली, मराठी शाळातून शिकलेली मुले अधिकारी म्हणून प्रशासनात स्थानापन्न झाली आहे. तरीही आमच्यावर अशी पाळी आली आहे, ही बाब प्रगतीशील महाराष्ट्राला शोभणारी आहे का? अगदी तालुका पातळीपर्यंत किंवा त्यापेक्षाही खाली इंग्रजी शाळांचे लोण जाऊन पोचले आहे. इंग्रजी भाषेचे महत्त्व मान्य केले तरी अगदी लहान वयात इंग्रजी माध्यमातून शिकावे का? इंग्रजी भाषा म्हणून शिकणे वेगळे व इंग्रजीचा माध्यम म्हणून, ज्ञानभाषा म्हणून वापर करणे वेगळे. इंग्रजी भाषा म्हणून शिकणे केव्हाही चांगले पण मराठी ही परिसरभाषा लाभलेल्या मुलांनी इंग्रजीचा वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षापासून ज्ञानभाषा म्हणून वापर करणे अतिशय घातक ठरू शकते. तथापि, या मुद्यावर या ठिकाणी टिप्पणी न करता ज्यांना इंग्रजी भाषेतून शिकायचे आहे, त्यांना इंग्रजीतून शिकू द्या. तसा अधिकार त्यांना आपल्या घटनेने दिला आहे. परंतु ज्यांना मराठी शाळांमधून शिकायचे आहे, त्यांच्यासाठी सकस मराठी शाळा उपलब्ध करून देणे शासनाचे कर्तव्य नाही का? शासनाला स्वत:ला चांगले सकस शिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या शाळा काढता येत नसतील तरी चालेल. शासन नावाच्या व्यवस्थेची ही मर्यादा असू शकते. पण अशाप्रकारच्या शाळा जे काढू इच्छितात, त्यांना मान्यता देणे मात्र शासनाला सहज शक्य आहे. तरीही शासन अशी मान्यता देत नाही व पर्यायाने मराठी राज्यातच मराठी शिक्षणाची गळचेपी होते आहे. यामुळे मराठीतून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची क्षमता असणाऱ्या शाळांवर अन्याय होईल. मराठीतूनच शिकू इच्छिणाऱ्या बालकांना शिकण्याची संधीच नाकारली जाईल. मराठी माणसामध्येही न्यूनगंड तयार होईल. महाराष्ट्राची पिछेहाट होईल. शासनाने दि.१मे २०१२ रोजी बहुचर्चित व बहुप्रतिक्षित बृहद आराखडा जाहीर करताना २३७२ नवीन मराठी शाळा सुरू करण्याची घोषणा केली. तेव्हा सर्व महाराष्ट्राला आनंद झाला. पण बारकाईने बातमी वाचली तेव्हा यातील २२४८ शाळा महापालिका व जिल्हा परिषदांमार्फत निघणार होत्या. एकेकाळी या शाळांनी महाराष्ट्राचे शिक्षण सांभाळले हे खरे असले, तरी आज या शाळेत शिकविणारे

शिक्षक असोत किंवा महापालिकेचे, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी असोत, ते आपली मुले या शाळेत टाकत नाहीत. कारणे काहीही असोत, आज या शाळांची इतकी दैना झाली आहे. मग अशा शाळांना जीवदान देऊन शिक्षकांना भरपूर पगार देता येतील, राज्य शासन शिक्षणावर भरपूर खर्च करीत असल्याचे भासमान चित्र निर्माण करता येईल पण महाराष्ट्राचे भविष्य ज्या बालकांच्या हाती आहे त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे देता येईल? या शाळांचे पुर्नवसन करणे म्हणजे शिक्षणप्रक्रियेतून बहुजन समाजातील गरीब विद्यार्थाची कायमची हकालपट्टी केल्यासारखे होईल. अनेक सूज्ञ पालकांना आपली मुले इंग्रजी माध्यमातून शिकवायची नाहीत. एवढ्या लहान वयात परभाषेतून शिकणे किती भयावह असू शकते हे त्यांनी अनुभवले आहे. पण सभोवार अगदी दूरवर नजर टाकली तरी मराठी माध्यमातून सकस शिक्षण देणारी शाळाच दृष्टिपथात येत नाही आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळातून मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता लक्षात घेतली तर या शाळेत मूल टाकायला ते धजावत नाहीत. २००५ पासून एकाही नवीन मराठी शाळेला महाराष्ट्रात परवानगी देण्यात आलेली नाही. यातून मराठीतून शिकू इच्छिणाऱ्यांची किती गळचेपी होते आहे याची कल्पना येईल. २००५ मधे वसंत पुरके शिक्षणमंत्री असताना मराठी माध्यमातून कायम विना–अनुदानित तत्त्वावर प्रस्ताव मागविण्यात आले होते. हजारो शाळांनी हजारो रूपयांचे प्रक्रिया शुल्क भरून प्रस्ताव सादर केले. पण पुरके साहेबांनी आपल्या वडिलांच्या नावे विदर्भात तीन शाळांना विना अनुदान मान्यता दिल्याने सारे प्रकरण कज्जे दलालीत अडकले. कोर्टात गेलेल्या काही शाळांना परवानगी मिळाली. पण बाकी सर्व प्रस्ताव सरकारने बासनात बांधून ठेवले. या शाळांचे नेमके काय झाले तेही सरकारने या शाळांना कळविण्याचीही तसदी घेतली नाही. याच वेळी, २००५ साली कोर्टाने बृहद आराखडा तयार करण्याची सूचना केली होती. तो सुध्दा केला गेला नाही. यातून सरकार अचानक जागे झाले आणि २००८ साली परत कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळांकडून प्रस्ताव मागविण्यात आले. या प्रस्तावासोबत वाढीव दराने हजारो रूपयांचे प्रक्रिया शुल्क पुन्हा भरले गेले. ज्या संस्थांनी प्रस्ताव दाखल केले त्यांनी आपल्या शाळा सुरू केल्या, कारण प्रस्ताव दाखल करण्यापूर्वी तीन महिने शाळा सुरू असली पाहिजे असा संबंधित परिपत्रकात स्पष्ट उल्लेख होता. त्या शाळा आजही चालू आहेत. या शाळांचे चालू असणे हे पूर्णत: कायदेशीर व नियमानुसार आहे. शासनाने प्रस्ताव नाकारल्यास कारणे दिली पाहिजेत असेही राजपत्रात म्हटले आहे. त्यावर ४५ दिवसात अपील करण्याची व पुन्हा प्रस्ताव दाखल करण्याची संधीही संबंधित संस्थेला राजपत्राने दिली आहे. तथापि, २००५ व २००८ मध्ये प्रस्ताव दाखल केलेल्या संस्थांना शासनाने कोणतीही लेखी कारणे दिली नाहीत. प्रत्येक प्रस्तावाची छाननी करताना शिक्षण अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शाळेत जाऊन तपासणी करायला हवी होती. यापैकी शासनाने काहीही केले नाही. १६ जून २००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठी माध्यमाचे प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव रद्द करण्यात आल्याचा निर्णय मात्र घेण्यात आला. कोणतेही कारण नाही, कोणताही खुलासा नाही. आले मंत्रिमंडळाच्या मना, केली मराठी शाळांची दैना! असा हा तुघलकी निर्णय आहे. एवढ्याने भागले नाही की काय, १९ जून २०१० रोजी एका परिपत्रकान्वये या शाळा ताबडतोब बंद करण्याचे फर्मानही काढले. शाळा बंद न केल्यास

पहिल्या दिवशी एक लाख रूपये दंड व दुसऱ्या दिवसापासून प्रतिदिन १0हजार रूपये दंड करण्यात येईल व शिवाय फौजदारी कायद्याच्या ४२० व ४०६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल, अशा नोटिसाही जारी करण्यात आल्या मराठी शाळा चालवतो म्हणून काही संस्थाचालकांना तुरूंगातही डांबण्यात आले. शेवटी महाराष्ट्रातील अन्यायग्रस्त शाळांनी एकत्र येऊन शिक्षण हक्क समिती स्थापन केली व लढ्याचा निर्धार केला. यात मराठी अभ्यास केंद्रही सामील झाले. ४ एप्रिल २०१0 पासून ठिकठिकाणी हा लढा सुरू झाला. ६ एप्रिल २०११ ला शिक्षणमंत्री राजेन्द्र दर्डा यांनी मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले. पण दुर्दैवाने कुठल्याच आश्वासनाची पूर्तता झाली नाही. उलट नोकरशाहीच्या लहरीनुसार दंडात्मक व फौजदारी कारवाईच्या धमक्या देणे सुरूच राहिले. यामुळे आंदोलनाला 'पुनश्च हरिओम' करणे भाग पडले. २६ जानेवारी २०१२ रोजी मराठी शाळांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा पुढीलप्रमाणे घोषित केला. ''महाराष्ट्र सरकार स्वातंत्र्याच्या मूलभूत धोरणाच्याच विरोधी वागत असल्याने आम्ही मराठी शाळांचे समर्थक असे घोषित करीत आहोत की आजपासून आम्ही महाराष्ट्र शासनाचे सर्व घटनाद्रोही व बेकायदेशीर आरोप नाकारीत आहोत. महाराष्ट्रातील मराठी मुलांसाठी मराठी शाळा चालविण्याचा आम्हाला पूर्ण कायदेशीर अधिकार असून आम्ही सरकारी जुलमाला विरोध करीत आमच्या मराठी शाळा चालवीतच राहू. आज दिनांक २६ जानेवारी २०१२ रोजी आम्ही घटनेच्या मूलभूत मांडणीस स्मरून मराठी शाळांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचा निर्धारपूर्वक संकल्प करीत आहोत. मराठीतून शिकण्याचा अधिकार हा बालकाचा निसर्गदत्त, घटनादत्त, अधिकार आहे. सकस व गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळणे हे समाजाच्या विकासासाठी गरजेचे आहे, याबाबी कोणालाही नाकारता येणार नाही. तरीही आपल्याच शासनाविरूध्द आपल्याला हे लाजिरवाणे लढे लढावे लागतात. याची शासनाला ना खंत वाटत, ना खेद. आपल्याला खंत वाटते आहे, खेदही होतो आहे. पण नाईलाज म्हणून का होईना, आपल्याच शासनाविरुद्ध हा लढा आपल्याला लढावाच लागेल. घराघरात हा नारा उठला पाहिजे. मराठी शाळा टिकू द्या, मराठीतून शिकू द्या!''

## शिक्षणवेधसाठी आपण हे करू शकता.




- वार्षिक वर्गणीदार
- एखाद्या कुटुंबाला अंक भेट
- कल्पक सूचना
- विविध शैक्षणिक संदर्भ किंवा माहिती
- आपलं कसदार लेखन
- वर्षभर किमान एखादी जाहिरात
- उपक्रमांसाठी प्रायोजक
- परीक्षणार्थ पुस्तके
- प्रतिक्रिया आणि शुभेच्छा

## || विशेष लेख ||



# लेखाजोखा 'चिल्लर' पार्टीचा

पंकज मिठभाकरे

"चिल्लर पार्टी हो गई, लेकीन टेन्शन अभी बाकी है" 'पार्टी आयोजकांना पोलिस कोठडी', 'मुले आत्महत्या का करतात?', 'व्यसनांचा विळखा आणि पोलिसांची काठी', 'विद्यार्थ्यांसाठी पोलिस देणार पार्टी', 'गृहमंत्र्यांनी दिल्या सूचना,' पोलिसांनो, स्वतःची कामे करा.' , 'आता हॉटेलचे परवानेही तपासणार' 'पार्ट्या कराल तर खबरदार ! उपमुख्यमंत्र्यांचा इशारा. 'डॉक्टरही घेणार पालकांचा तास !, 'टल्ली गिर गए, लेकिन पार्टी अभी बाकी है !

गेल्या महिन्या-दीड महिन्यामधे अनेकविध माध्यमांनी या विषयावर ऊहापोह केला आहे. पालक, शिक्षक, शाळा, शासनयंत्रणा ज्वालामुखी झाल्याप्रमाणे हादरले आहेत. लाव्हारस वाहून गेला, थंड झाला, झालं संपलं! परत एकदा जाग येण्यासाठी एका चिल्लर पार्टीचं वास्तव सामोरं यावं लागेल.

मला एक प्रश्न, माणूस म्हणून, नेहमीच पडतो. प्रश्नाच्या 'का?' पर्यंत जाणं हे परवडत नाही, जमत नाही, शक्य होत नाही, अशक्य आहे. यापैकी नेमकं आहे तरी काय ?

वय वर्ष ९ ते १६ हा कालावधी कुमारावस्था व पौगंडावस्था म्हणून ओळखला जातो. सर्वार्थाने जीवन यशस्वी होण्यास भावनिक बुद्धिमत्तेचा वाटा ८०% असतो असे तज्ज्ञांचे मत आहे. बुद्धिमत्ता ही आनुवंशिक आहे आणि भावनिक बुद्धिमत्तेसाठी कुटुंब, शाळा, समाज, स्वप्रयत्न, परिस्थिती या गोष्टी परिणामकारक ठरतात. मुलांकडे भावनिक बुद्धिमत्ता नसेल तर न्यूनगंड, स्व-नकार, एकटेपणा, दिवास्वप्न असे प्रश्न सातत्याने या वयातील मुलं अनुभवतात. याच काळात परस्परविरोधी विचारांचा संघर्ष सुरू होतो. निर्णय अक्षमता असते. वैचारिक गोंधळ असतो. स्वयंपूर्ण आणि स्वैराचारी जगून पाहायची तीव्र इच्छा असते मात्र समाजव्यवस्था, संस्कार आणि नीतीमूल्य या गोष्टींमुळे शंका आणि लाज दोन्ही गोष्टी वैचारिक पातळीवर काम करत असतात. परिणामी, या सर्व गोष्टींना काही काळ विसरता यावं आणि असा एक काळ अनुभवावा ज्यात अस्थिर झालेली सर्व परिस्थिती स्थिर होईल. तात्पुरता का होईना, जोश, उत्साह, स्वैराचार जगून पाहाता येईल, याकडे कल वाढतो आणि आयोजित होते 'चिल्लर पार्टी'.

या सर्व गोष्टींसाठी प्रत्येक वेळेस पालकांवर खापर फोडलं जात. पालक शासनव्यवस्थेवर ओरडतात. शासनव्यवस्था, शिक्षकांवर ओरडते.

शिक्षक, शाळा परत पालकांच्या नावाने ओरडतात आणि आरडओरड करण्याचं हे वर्तुळ पूर्ण होते. म्हणून म्हणावसं वाटतं, चर्चा झाली, वादविवाद झाले, पण 'प्रॉब्लेम अभी बाकी है' चला तर आपण प्रश्नाच्या मुळाशी जाऊयात. खरं तर माणूस आणि समाज यांच्या सुसमायोजनाच्या मुळाशी भावनिक सुरक्षितता काम करत असते. वय ९ ते १६ हे अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण वय आहे. या काळात परिणाम करणारे काही घटक म्हणजे. *कुटुंब *शाळा *शिक्षक *मित्र परिवार

* **कुटुंब –** अगदी लहानपणापासूनच भावनिक सुरक्षितता मिळण्याचं हक्काचं ठिकाण म्हणजे कुटुंब. आई, बाबा, आजी, आजोबा, ताई, दादा, काका, काकू, मामा, मामी, आत्या, मावशी अशी अनेकविध नाती कुटुंब या संकल्पनेत येतात. आता ही नाती नावापुरतीच उरली आहेत. दुर्दैवाने माणूस संकुचित होत गेला. एकत्र कुटुंब पद्धती लोप पावली आणि विभक्त कुटुंब उदयास आले. भावनिक स्थिरता आणि सुरक्षितता देणारे नात्यांचे झरे लुप्त झाले. आर्थिक प्रबलीकरण ही कुटुंबाची अत्यावश्यक गरज होऊ लागली. या मुलांना हवं असणारं कुटुंब, नातीगोती, परस्पर विनिमय सगळंच दुरापास्त झालं. मग समाजसंपर्क म्हणून 'फेसबुक' सुरू झालं. मुलं तासनतास संगणकासमोर बसू लागली. या 'थोबाडपुस्तक'ाने थोबाडासमोरील पुस्तक हटवलं, मुलं अभ्यास करेनाशी झाली. आई-वडील आरडाओरड करू लगले, शाळा जबाबदारी टाळून मोकळी झाली, आलेल्या अपयशावर उपाय तरी काय? **''चिल्लर पार्टी''**

* **शाळा –** शाळेत फक्त अभ्यासासाठी जायचं असतं, साचेबध्द पद्धतीने शिकायचं असतं, सर्वांगीण विकासाच्या नावाखाली वाटटेल ते खपवायचं, भरमसाट फी लाटायची आणि आठवीपर्यंत हमखास पास करायचं. रिझल्ट वर परिणाम होणार असेल तर दहावीत बाहेरून बसवायचं. हे सध्याचं चित्र.

शाळा म्हटलं की असं ठिकाण, ''जिथं सृजनशील, आनंददायी, प्रेरणादायी, मनसोक्त बागडायला मिळणारं, ज्ञानाची मुक्त कवाडं उघडणारं.'' अशी खरं तर कल्पना आहे. जिथे मित्र मिळतील, जिथे जीवनाचा मार्ग मिळेल, जिथे व्यक्तिमत्त्व घडेल. हे सगळं मिळत नाही, मग उपाय काय? = **''चिल्लर पार्टी.''**

* **शिक्षक –** आपला विद्यार्थी, नैराश्याकडे वाटचाल करू नये म्हणून शिक्षकाने स्वत:लाच काही प्रश्न विचारत आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

मूल त्याच्या पध्दतीने शिकतं आहे की मी त्याला माझ्या पद्धतीने जबरदस्ती शिकवंत आहे.? किती शिकवतो यापेक्षा कसं शिकवतो आहे? मुलांनी माझ्याशी भावनिक नातं ठेवावं अशी अपेक्षा करत असताना मी मुलांची भावनिकता समजावून घेतो आहे का? कुठला विषय आणि कसा शिकावा याचं स्वातंत्र्य खरंच मुलांना दिलं जातंय का? केवळ परीक्षेत मिळणाऱ्या गुणांचे मूल्यमापन करून त्याला 'हुशार' किंवा 'मठ्ठ' ठरविलं जातंय का? प्रत्येक मुलाला त्याच्या भाषेत, त्याच्या पद्धतीने, त्याच्या भावना, निदान विचारांच्या पातळीवर तरी मांडू दिल्या जातात का? असे प्रश्न त्याने स्वतःला विचारले पाहिजेत.

पौगंडावस्थेत मुलांचे 'आदर्श' ठरत असतात. शिक्षकांनी खरंच या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरं देत बदल घडवायचा ठरविला तर 'सिंघम' चित्रपटातील अजय देवगणपेक्षाही जास्त प्रमाणात मुलांना त्यांचे शिक्षक आवडू लागतील. अर्थात, शिक्षक नावाचं

'होकायंत्र' नसेल तर चांगल्या आयुष्यांची दिशा कशी सापडणार? मग चुकीचे आदर्श ठरविले जातात. परिणाम – **"चिल्लर पार्टी."**

* **मित्र परिवार –** मला कुणीतरी स्वीकारतंय, माझ्यातील गुणवैशिष्ट्ये कुणाला तरी आवडतात, माझ्याकडे लोक आकर्षित होतात मी एका गटाचा महत्त्वपूर्ण सदस्य आहे कुणीतरी माझे मित्र मैत्रिणी आहेत हा विचार सामाजिक विकास आणि स्व–आदराला वाढवणारा असतो. या काळातील चांगली मैत्री आयुष्यभर मैत्री असण्याइतपत पक्की असते.

स्पर्धात्मक युगात टिकून राहाण्यासाठी या सर्वच गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात. चुकीचे मित्र मिळाले तर फक्त आयोजित हेते **"चिल्लर पार्टी."**

"चिल्लर पार्टी"ला त्यांचे वास्तविक प्रश्न समजावून सांगणे, ते सोडविण्यासाठी त्यांच्या सोबत असणं, यासाठी खालील सप्तसूत्री महत्त्वपूर्ण वाटते.

* प्रतिसादी (Responding)
* जबाबदार (Responsible)
* व्यक्तिगत जाणीव असणारा (Realisation)
* संभाषण (Communication)
* आकलन (Understanding )
* हेतू (Purpose)
* आपलेपणा (Attachment)

* **प्रतिसादी –** व्यक्तिने संवेदनशील असणे आवश्यक आहे. सामाजिक त्याचप्रमाणे वैयक्तिक आयुष्यातही त्याने प्रतिसाद दिला पाहिजे. त्याच्या या सजगपणामुळे तो इतरांनाही प्रतिसादी (प्रतिक्रिया देणारा) बनवू शकतो.

* **जबाबदार –** व्यक्ती, स्वत:चे विचार, वागणे आणि भावना यांच्यामधल्या संतुलनाची जबाबदारी घेणारा असला तर अविवेकी विचार होत नाही.

* **व्यक्तिगत जाणीव असणारा –** प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे विचार, वागणे आणि भावना याची वास्तविक जाणीव झाली तर ते विवेकनिष्ठ वर्तनास प्रेरणा देते.

* **संभाषण –** स्वत:ला योग्य पद्धतीने सादर करणं आणि इतरांबरोबर आरोग्यपूर्ण नातं निर्माण करण्यासाठी संभाषण ही अत्यंत महत्त्वाची कला आत्मसात करणे गरजेचे आहे.

* **आकलन –** किशोरवयीन मुलांचे भावविश्व,त्यांची मानसिकता तसेच त्यांची सामाजिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेणे गरजेचे आहे. हे लक्षात घेत असताना त्या अनुषंगाने या मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधणे गरजेचे आहे.

* **हेतू –** या वयातील मुलांना मार्गदर्शन करत असताना अत्यंत वास्तववादी आणि नेमका हेतू मुलांपर्यंत पोहचवून मार्गदर्शन केल्याचा फायदा निश्चितपणे अधिक होतो.

* **आपलेपणा –** मार्गदर्शन करूनही या वयातील मुलं वारंवार त्याच त्या चुका करत राहातात, विरोध करतात, नाकारतात अशा परिस्थितीत मोठ्यांनी मुलांविषयीचा आपलेपणा हीच सुसंवाद साधण्याची गुरुकिल्ली आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

या सप्तसूत्रीचा विचार केल्यास "चिल्लर पार्टी"ला चिल्लर पार्टी आयोजित करण्याची गरज पडणार नाही. या बरोबरच काय करायला हवं आणि कसं, हे या मुलांबरोबर संलग्न असणाऱ्या कुटुंब, शाळा, शिक्षक आणि मित्र परिवार यानांही वर सांगितलेल्या गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. मुलांसाठी भावनिक सुरक्षितता ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. बाकी सब "चिल्लर" है ।

❑

# निळे आकाश हिरवी झाडे काळी माती

**अनिल जोशी**



दिनांक १ सप्टेंबर, २०१२, शनिवार. वाई येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयाचा परिसर. बालशिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणारे हे केंद्र. निसर्गरम्य वातावरणाने अक्षरशः संपूर्ण परिसर व्यापलेला. नुकताच पावसाचा शिडकावा सरलेला! वातावरणात उत्साह, चैतन्य, रसरशीतपणा तुडुंब भरलेला! असे हे वातावरण आणि दिवसाचा दुसरा प्रहर सुरू झालेला. एका नवीन व आवश्यक अशा उपक्रमाचे जनता शिक्षण संस्थेने आयोजन केले होते. बालशिक्षणाच्या क्षेत्रास नवनवीन दिशा देणारे, मूलभूत शैक्षणिक सिद्धांतांना शिक्षणप्रेमींच्या समोर मांडणारे आणि कृतीशील शिक्षणतज्ज्ञ म्हणून ख्याती प्राप्त केलेले प्रा. रमेश पानसे यांच्या चिन्तनातून साकार झालेले 'निळे आकाश–हिरवी झाडे–काळी माती– ग्राममंगलचे शालेय स्तरावरचे भाषा शिक्षण' हे पुस्तक आज प्रकाशित करण्याचे निश्‍चित झाले होते. राज्य प्रशिक्षण आणि संशोधन या शासकीय संस्थेत शिक्षण सहसंचालक पदावर कृतीने कार्यरत असणारे श्री. दिनकर पाटील यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती. प्रख्यात कादंबरी लेखक मिलिंद बोकील यांचे या निमित्ताने भाषा शिक्षणासंबंधातील प्रकट चिन्तन ऐकण्यास उत्सुक असणाऱ्या वाई शहर व तालुक्यातील सुमारे ३०० प्राथमिक शिक्षकांची सभागृहात गर्दी झालेली. महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे कार्यवाह व जनता शिक्षण संस्थेचे सचिव अनिल जोशी यांनी या कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट करतानाच उपस्थित मान्यवरांचा अत्यंत अनौपचारिक रीतीने

परिचय करून दिला. नारायण चौधरी यांनी उपस्थित अतिथींचे स्वागत केले आणि अनिल जोशी यांनी भाषा शिक्षण या विषयावर मान्यवरांचे चिन्तनाधारित विचार ऐकण्याची संधी उपस्थितांना लाभली याचा आनंद व्यक्त केला. प्रसाद मणेरीकर ग्राममंगलचे उमदे आणि उत्साही कार्यकर्ते! रमेश पानसे यांच्या शिक्षण विचारांशी सहमत असलेले आणि बालशिक्षणात शास्त्रीय पद्धतीने नवनवीन कृतीद्वारा प्रयोग करणारे शिक्षक-लेखक. गोष्टीरूप भाषाशिक्षण या पुस्तिकांना प्रकाशात आणण्याच्या निमित्ताने या कार्यक्रमात सहभागी झाले आणि या पुस्तिकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या भाषाशिक्षणातील विविध टप्प्यांना चित्रांचा आधार का दिला यांचे अत्यंत मोजक्या शब्दातील आपले मनोगत त्यांनी व्यक्त केले.

मिलिंद बोकील यांनी आणि दिनकर पाटील यांनी पुस्तक प्रकाशनाचा औपचारिक कार्यक्रम पूर्ण केला, प्रकाशन झाल्याची घोषणा केली.

प्रा. रमेश पानसे यांच्या शैक्षणिक विचारांना शास्त्र आणि सिद्धांत यांचा नेहमीच भक्कम असा आधार राहिलेला आहे. आपल्या पुस्तक प्रकाशनाचे औचित्य लक्षात घेऊन भाषा शिक्षणाकडे आजपर्यंत झालेले दुर्लक्ष, त्यातून निर्माण झालेल्या समस्या याकडे जेवढे लक्ष दिले जाणे आवश्यक होते ते न घडल्याने प्रश्नमालिकाच समोर येते असे मत नोंदवताना प्रा. पानसे यांनी भाषाशिक्षण हेच सर्व विषयशिक्षणाचा आधार आहे हे मत अधोरेखित केले.

मुळातच शिक्षण ही नैसर्गिक प्रक्रिया असल्याने ती नैसर्गिकरित्याच सुरू राहणे गरजेचे आहे. भाषा आणि प्रत्यक्ष जीवन यांचा अतूट संबंध स्पष्ट करताना प्रा. पानसे म्हणाले, संवादासाठी भाषा आवश्यक आहे आणि आपले पूर्ण आयुष्यच संवादावर आधारलेले आहे. संवाद माणसांना जोडतो हे खरे पण तो दोन प्रकारचा कसा असतो यांचे स्पष्टीकरण सांगताना प्रा. रमेश पानसे यांनी बाह्य संवाद आणि अंतर्गत संवाद अशी विभागणी पुढे मांडली. बाह्य संवादाचा संबंध व्यवहाराशी असतो. चिन्तन-मनन भाषेकरवीच सुरू असते. ही अंतर्गत भाषा असते. संवाद या दोन प्रकारचे असल्याने या दोन्ही संवादांची संधी मुलांना अधिकाधिक मिळाली पाहिजे. दुर्दैवाने यांच्याशी निगडित घटकांना याचे महत्त्व न समजल्याने भाषेचे शिक्षणच अपूर्ण राहते. नवीन शैक्षणिक आराखड्यात भाषाशिक्षण लक्षात घेतले गेले असून भाषाशिक्षण हे बाहेरच्या वातावरणाशी जोडण्याकडे लक्ष दिले आहे ही बाब उल्लेखनीय आहे. आपण प्रत्येक मुलाला बाह्य संवादाची संधी दिली पाहिजे, त्याचबरोबर त्याला चिन्तन-मनन प्रक्रियेपासून अलग ठेवता कामा नये. त्यासाठीच्या भरपूर संधी कशा देता येतील याचेही नियोजन होणे आवश्यक आहे अशी सूचना प्रा. पानसे यांनी यावेळी केली.

या प्रसंगी मिलिंद बोकील यांनी पुस्तकाच्या संबंधात आपले चिन्तन व्यक्त केले. 'अत्यंत मौल्यवान आणि मननीय पुस्तक' हा त्यांचा पहिला अभिप्राय! या पुस्तकाची रचना करणारे रमेश पानसे यांच्या शैक्षणिक विचारांनी, प्रयोगांनी, साहित्याने प्रभावीत झालेले बोकील यांनी पानसे यांच्याबाबतचा आदर व्यक्त करताना सांगितले, 'रमेश पानसे हे शिक्षणकर्मी आहेत!'

मिलिंद बोकील यांनी मनोगताच्या प्रस्तावनेतच आजची शिक्षण व्यवस्था अधोरेखित केली खरी पण केवळ याचे वारंवार भजन करण्याने स्थिती बदलणार नसल्याचेही मत नोंदविले. उपायांचा शोध घ्यावाच लागेल. त्यामध्ये रमेश पानसे यांचे शैक्षणिक प्रयोग आणि नवीन शैक्षणिक सिद्धांत लेखन ठोस दिशा

देण्यास साहाय्यभूत ठरतात असा विश्वास व्यक्त केला.

शिक्षणक्षेत्रात प्रशासकीय अधिकारी अशी मर्यादित भूमिका न वठविता शिक्षणाचा मुख्य भाग म्हणजे गुणवत्ता विकास याचे भान असणारे आणि त्याकरिता पोषक आणि पूरक असे असंख्य उपक्रम प्रत्यक्षात राबविणारे दिनकर पाटील यांनी मांडलेले विचार त्यांची शिक्षण विकासाची, गुणवत्ता विकासाची कळकळ व्यक्त करणारे होते. त्यांनी प्रकाशित पुस्तकाचे अत्यंत मनापासून वाचन केल्याचे त्यांच्या मांडणीतून स्पष्ट होत होते. शरीरशास्त्र, भाषाशास्त्र आणि मानसशास्त्र यांचा आधार घेऊन शालेय स्तरावरील भाषाशिक्षण या पुस्तकाची रचना प्रा. रमेश पानसे यांनी केल्याचे स्पष्ट होते आहे असे मत नोंदवताना दिनकर पाटील म्हणाले, 'यामध्ये केवळ लेखन नाही तर आधाराला कृती आहे.' भाषा समृद्धीची आणि आकलनाची अलगता होतच नाही हे लक्षात घेतले तर आठव्या वर्षापर्यंतचे भाषा शिक्षण अधिक जागृतपणे व शास्त्रशुद्ध पद्धतीनेच झाले पाहिजे. शासकीय पातळीवर शिक्षण क्षेत्रातील विविध स्तरांसाठी करण्यात येणारी आर्थिक तरतूद ही अनेक विसंगतींनी व्यापलेली आहे अशी खंत व्यक्त करताना दिनकर पाटील यांनी उच्च शिक्षणासाठी होणारा खर्च हा लक्षात घेतला तर त्यामागचा हेतू लक्षात येत नाही. वास्तविक आर्थिक खर्चाचा भर प्राथमिक शिक्षणासाठीच हवा. तेथील अशी गुंतवणूकच फायदेशीर ठरणारी आहे. भाषाशिक्षणाचा विचार करता, मातृभाषेचा परिणाम मौलिक असतो त्यामुळे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतच हवे असे स्पष्ट मत नोंदविले. आज शालेय स्तरावरचे भाषाशिक्षण हे क्रमिक पुस्तकांतील आशयावरच स्थिरावले असल्याने अपेक्षित भाषाशिक्षणाची प्रक्रिया गतीशील राहतच नाही. त्यामुळे भाषा विकासाच्या विचारांस फाटा मिळतो. अर्थात या सर्व प्रक्रियेशी अतूटपणे जोडला गेलेला शिक्षक हा घटक अत्यंत जागृत आणि प्रयोगशील असणे गरजेचे आहे. त्याला शिक्षणाचे तत्त्वज्ञान समजले पाहिजे ते तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरविण्याची क्षमता त्याने विकसित केली पाहिजे आणि अशी स्थिती निर्माण झाली तर परिवर्तनाची प्रक्रिया गतीशील होण्यात साहाय्यच होईल. प्रा. पानसे यांनी या परिवर्तनाच्या प्रक्रियेत आपल्या चिन्तनातून आणि कृतीतून दिशा द्यावी याकरिता शिक्षणखाते त्यांचे स्वागतच करेल, असे आश्वासन दिनकर पाटील यांनी दिल्याने उपस्थित असणाऱ्या शिक्षकांना आणि संयोजकांना नवा विचार मिळाल्याचे समाधान मिळाले. किसन वीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. येवले यांनी 'हा पुस्तक प्रकाशन समारंभ म्हणजे नवदिशादर्शक उपक्रम ठरला' असे मत व्यक्त केले आणि वाई नगरपरिषदेचे शिक्षणाधिकारी श्री. प्रदीप शिंदे आणि वाई पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी श्री. जाधव यांच्या सक्रिय सहकार्याबद्दल आनंद व्यक्त केला.

❑

## साभार पोच

- माझी समृध्द शाळा– संपा. दिनकर पाटील– महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
- आठवणीतील पाऊले– डॉ. बापूसाहेब रेगे– ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
- साहित्य मिथ्य साहित्य– विश्वनाथ खैरे–संमत प्रकाशन पुणे.

## || स्वागत ||

# निळे आकाश हिरवी झाडे काळी माती *च्या निमित्ताने*

**वीणा सानेकर**

मी महाविद्यालयीन अध्यापनक्षेत्रात गेल्या वीस वर्षांच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या भाषा-अध्ययनासंदर्भात विविध समस्या अनुभवते आहे. अलीकडच्या काही वर्षात या समस्यांमध्ये वेगाने भर पडते आहे. या समस्यांचे अनुभव हे सूचित करतात की, त्यांची मुळे लहानपणापासूनच्या जडणघडणीशी जोडलेली आहेत.

कवितेतील शब्दांच्या रिकाम्या जागांशी संवाद साधता न येणे, शब्दांची क्रीडा न उमगणे, साहित्यकृतीचे आवाहन मनापर्यंत न पोहोचणे, विनोदाच्या जागा न कळणे, व्यावहारिक पातळीवर आणि अभ्यासक्रमाशी निगडित उपक्रमांमधून भाषेचा आनंद न घेता येणे, स्वत:ला व्यक्त करताना शब्द न सापडणे वा ते अपुरे भासणे अशा समस्या भाषाविषयक अध्ययनात विद्यार्थ्यांना का भेडसावतात? मुळात माणसाची भाषा प्राण्यांच्या संदेशन पध्दतीपेक्षा खूप वेगळी आहे. प्राणी एकमेकांना जे संदेश पाठवतात त्यांची संख्या, त्यांच्या ध्वनीइतकीच असते एक संदेश आणि एक ध्वनीघटक अशी एकात्तरीय रचना प्राण्यांच्या भाषेत आढळते. तर मानवी भाषेत ध्वनीघटकांची अनंत प्रकारे जुळणी करण्याची क्षमता असते. अगणित शब्दरूपे निर्माण करता येण्याची मानवी भाषेची अपार ताकद हे मानवी भाषेविषयीचे मूलभूत सत्य आहे परंतु बंदिस्त अभ्यासक्रमाच्या बाहेर न पडणे घोकंपट्टी करून उत्तरे पाठ करणे, शिक्षकांनी निबंधाचे नमुने विद्यार्थांना देऊन त्यांना ते करायला लावणे, गाईडप्रणित एकसाची उत्तरांच्या आहारी जाणे या सरधोपट सवयी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीचे पंख कातरू लागतात.त्यांचा भाषिक विकास खुंटवून टाकतात मानवी भाषेची संरचना यांत्रिक नसते. त्यामुळे यांत्रिक पध्दतीने भाषाशिक्षण होऊ शकणार नाही. मग भाषाशिक्षणाचा योग्य मार्ग कोणता? भाषा नामक अभौतिक संचिताचा ठेवा समृध्द करण्याची वाट विद्यार्थ्यांनी कशी चालावी आणि शिक्षकांनी-शाळांनी या वाटेवरील वाटाड्या कसे व्हावे याची अत्यंत डोळस जाणीव करून देण्याचे काम रमेश पानसे यांचे 'निळे आकाश, हिरवी झाडे, काळी माती' याने केले आहे.

बालशाळेतील भाषाशिक्षण, औपचारिक भाषाशिक्षण, अभिव्यक्तीस्वातंत्र्य, वाटचाल वाङ्मयाकडे, आंतरशाखीय भाषाशिक्षण अशा पाच प्रकरणांमधून पानसे यांनी विद्यार्थ्यांच्या भाषाविकासपथाची मांडणी केली आहे. या प्रकरणांमधून मेंदूतील भाषातयारी, भाषा शिकण्याची पायाभूत सूत्रे, शालेय जीवनातील अभिव्यक्तीस्वातंत्र्य, वाक्यरचना व वाक्यनिर्मितीच्या संधी, वाचनाच्या संधी, शैक्षणिक साधनांची उपयुक्तता इत्यादी

विषयांचा ऊहापोह या पुस्तकात केला गेला आहे. मात्र या पुस्तकाचे वैशिष्ट्य असे की तो करताना, केवळ तात्त्विक विवेचन न करता या विवेचनाला ग्राममंगलच्या माध्यमातून केल्या गेलेल्या भाषाविषयक प्रयोगांची जोड दिली गेली आहे. किंबहुना या पुस्तकातील तात्त्विक भागाची उभारणी प्रत्यक्ष भाषिक अनुभवांच्या भक्कम बैठकीवर उभी आहे. विद्यार्थ्यांचे वाङ्मयीन वा अन्य विषयांवरील लेखन, त्यांच्या पद्यांचे, निबंधांचे नमुने, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भाषाशिक्षणासंदर्भात केलेले प्रयोग या सर्वांना या पुस्तकाच्या रचनेत तात्त्विक विवेचनाइतकेच महत्त्व आहे.

१९८२ सालापासून ग्राममंगल ही संस्था ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागात व अलीकडे शहरी–निमशहरी भागातही शिक्षण प्रशिक्षणाचे काम करते आहे. ऐना, दाभोळ, विक्रमगड, पुणे, चंद्रपूर, यवतमाळ, वाशी, नंदुरबार, सगरोळी, वाई इत्यादी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी ग्राममंगलने जे भाषाशिक्षणाचे प्रयोग केले त्या प्रयोगांचे अनेक संदर्भ या पुस्तकात येतात. हे प्रयोग वाचकांच्या भाषाविषयक जिज्ञासेला खतपाणी घालतात आणि दुसरीकडे शिक्षकांसमोर प्रयोगशील भाषाशिक्षणाच्या दिशा ठेवतात.

शिक्षण हे विद्यार्थीकेंद्री आहे हे सर्वश्रुत आणि सर्वमान्य असले तरी शिक्षणव्यवहारात कायम शिकवण्यावर भर राहिला आहे. शिकवण्यावरचा भार कमी व्हावा. आणि त्याची जागा शिकण्याने घ्यावी या उद्देशाने ग्राममंगलने विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास उपयुक्त शैक्षणिक साधने निर्माण केली. साधनाधारित शिक्षण एकूण शिक्षणव्यवस्थेत तर महत्त्वाचे आहेच परंतु भाषाशिक्षणात तर त्याचे महत्त्व अधिकच आहे. ही साधने कशाप्रकारे निर्माण करता येतील? त्यांचे प्रकार कोणते? त्यांचा वापर नेमका कसा व कशासाठी करता येईल आणि फलनिष्पत्तीच्या अंगाने त्यांचे मूल्य काय? असा शैक्षणिक साधनांचा सांगोपांग विचार या पुस्तकात आला आहे. या पार्श्वभूमीवर लेखक विविध शिक्षणतज्ज्ञाच्या भरीव कामगिरीची आवर्जून नोंद घेतात. गिजूबाई बधेका, ताराबाई मोडक, अनुताई वाघ, सरलाताई देवधर,सिंधुताई अंबिके यांच्या शैक्षणिक बालवाङ्.मय निर्मितीतील योगदानाकडे लक्ष वेधून लेखकाने शिक्षणाच्या दीर्घ परंपरेतील प्रयोगशीलतेची वाटच उलगडत नेली आहे.

भाषाशिक्षण हा सामान्यत: दुर्लक्षित असा विषय बालशिक्षणाचा अविभाज्य भाग म्हणून समाजजाणिवेत येण्याची गरज आहे, हा या पुस्तकातील गाभाभूत विचार आहे. यादृष्टीने गेल्या काही वर्षात विकसित झालेल्या मेंदू–आधारित शिक्षणाचे, मानसशास्त्राच्या अभ्यासाचे तसेच भाषाभ्यासाचे विविध पैलू लेखकाने या पुस्तकाद्वारे सूचित केले आहेत. या विविध पैलूंसकट विद्यार्थ्यांच्या भाषाशिक्षणांची क्रांतिकारक दृष्टी हे पुस्तक समोर ठेवते. यादृष्टीने रमेश पानसे यांनी मांडलेले खालील मुद्दे चिंतनीय ठरतात.

* सामान्यपणे बालवाडीत प्राथमिक शिक्षणाची पूर्वतयारी करवून घेण्यासाठी म्हणून शाळांकडून व पालकांकडून मुलांवर लिहण्या–वाचण्याची सक्ती केली जाते. ती मुलांवर शारीरिक व बौध्दिक ताण निर्माण करणारी ठरते.

* वास्तविक भाषा शिकण्यासाठी विद्यार्थ्यांकरता क्रमिक पुस्तके असू नयेत. इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित असे विषय शिकवताना त्यातील आशयच आत्मसात करायचा असतो पण भाषा शिकताना प्रत्यक्ष भाषाच आत्मसात करायची असते.

* केवळ वाङ्मयाकरवी भाषाशिक्षण करण्याचा घाट घातला तर भाषेच्या शिक्षणात एकारलेपणा येतो. शिक्षणासाठी वाङ्.मयाचा उपयोग जरूर करावा पण तो एकमेव मार्ग मानू नये.

वरील मुद्दे मुलांच्या सातत्यपूर्ण भाषाशिक्षणावर भर देतात. या दिशेने भाषाशिक्षणाचा विचार न करता साचेबध्द पध्दतीने ते घडवून आणण्याकडे शाळांचा कल असल्यामुळेच मुलांच्या भाषेची जडणघडण परिपूर्ण होत नाही. याचे दूरगामी परिणाम त्यांना पुढील आयुष्यात सोसावे लागतात.पानसे सरांचे पुस्तक भाषेच्या सहज शिक्षणाचा विचार मांडते. भाषा शिकवण्यावर भर न देता भाषा आत्मसात होण्याचे महत्त्व अधोरेखित करते, खेरीज शिक्षणव्यवस्थेतील आंतरशाखीय भाषाशिक्षणाची आवश्यकताही नमूद करते. ९४ पृष्ठांतून या सर्व पैलूंची पानसे सर मांडणी करतात. त्यानंतरची परिशिष्टे देखील पुस्तकातील भाषाविचाराला पूरक ठरतात. ही परिशिष्टे प्रामुख्याने शिक्षणातील मातृभाषेचे स्थान स्पष्ट करतात. इंग्रजी शाळांचे आणि सेमी इंग्रजीचे वाढते फॅड महाराष्ट्रातील मुलांची त्यांच्या भाषिक संस्कृतीतील संबंधापासून फारकत करत आहे, हा मुद्दा इथे पानसे सर गंभीरपणे तपासतात. बालकांच्या भाषाशिक्षणाचा विकासपथ कसा असावा याचा सुस्पष्ट वेध हे पुस्तक घेते. प्रत्येक शाळेत आणि प्रत्येक घरात ते पोहोचायला हवे तरच समाजजाणीवेत भाषाशिक्षणाचा विचार यथार्थपणे रुजेल.

❑


वार्षिक वर्गणी रुपये ४००/–

त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/–

किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या. ‘८० जी’ कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि दरमहा ‘शिक्षणवेध’चा अंकही मिळवा.

वर्गणी / रोख / चेक / ड्राफ्टने ‘ग्राममंगल’ या नावाने पाठवू शकता.

मुंबई–पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/– वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**

ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी,

कोथरुड, पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७

ग्राममंगल

शिक्षणवेध

निळे आकाश
हिरवी झाडे
काळी माती

# शैक्षणिक कृतींचे सार

**मिलिंद बोकील**

प्रा. रमेश पानसे यांचे 'निळे आकाश, हिरवी झाडे, काळी माती' हे भाषाशिक्षणावरचे अत्यंत मौल्यवान आणि मननीय पुस्तक आहे. प्रा. पानसे हे एक नामवंत शिक्षणशास्त्री आणि शिक्षणकर्मी आहेत. त्यांच्या अनेक वर्षांच्या वाचनाचे, संशोधनाचे, स्वत:च्या शिक्षणाचे आणि त्यावर आधारित केलेल्या प्रत्यक्ष कृतीचे सार या पुस्तकातून प्रकटले आहे.

आपण आजमितीस आपल्या शिक्षणाचा, विशेषत: भाषाशिक्षणाचा कसा विचका केलेला आहे हे सर्वांना माहीत आहेच. हे असे व्हायची खरे तर काही गरज नव्हती. परंतु आपली ब्रिटिशांच्या काळात निर्माण झालेली गुलामी मनोवृत्ती, भाषिक न्यूनगंड, शिक्षण–प्रक्रियेविषयीचे अज्ञान आणि मानसिक असुरक्षितता यांच्यापोटी तसे घडते आहे. एक समाज म्हणून आपण भ्यायलेलो आहोत आणि या भयग्रस्ततेतून चुकीच्या पध्दतीचे शिक्षण आपल्या मुलांना देत आहोत.

या पुस्तकाचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यात सिध्दांतन (थियरी) आणि कृती (प्रॅक्टीस) यांचा मनोहारी संगम तर आहेच पण शास्त्रीय सिध्दांतांच्या आधारावर प्रत्यक्ष शिकण्याचे आणि शिकवण्याचे काम करून जे कृति–ज्ञान (प्रॅक्टीस) तयार होते, ते त्यात वर्णन केलेले आहे. प्रा. पानसे आणि त्यांच्या ग्राममगंल या संस्थेमधल्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्रातल्या आदिवासी, ग्रामीण, शहरी अशा विविध भागातल्या शाळांमधून जे काम केले आहे त्या प्रत्यक्ष अनुभवाचा त्याला आधार आहे. अशा पध्दतीने माणूस काम करतो तेव्हा ज्ञान–कृती–ज्ञान–कृती अशी साखळीच त्यातून तयार होते आणि ही साखळी एखाद्या चक्राकार जिन्यासारखी असल्याने ती प्रत्येक पायरीवर आपल्या उंच उंच नेत राहते.

प्रा. पानसे हे गेली अनेक वर्षे मेंदूविज्ञानाचा आढावा घेत आले आहेत. या विषयावर त्यांनी स्वतंत्रपणे मुबलक लेखनही केले आहे. मेंदूविज्ञानात जे नवीन संशोधन होते आहे त्यामधून लहानपणी आपल्या मेंदूत कशा घडामोडी होतात आणि त्यातून आपण कसे शिकत जातो यावर उत्तम प्रकाश पडतो आहे. मात्र या शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून आपली शिक्षणाची पध्द्त मात्र आपण अजून सुधारलेली

नाही. हे कसे करता येईल याचे सुंदर मार्गदर्शन या पुस्तकाच्या पाना-पानावर होते. या मार्गदर्शनाचे वैशिष्ट्य असे की ते अत्यंत स्पष्ट आणि निसंदिग्ध शब्दात केलेले आहे; एरवी भाषाशास्त्रज्ञ अत्यंत गुळमुळीत भाषेत बोलून आपला गोंधळ वाढवत असतात. यातले प्रमुख निष्कर्ष असे आहेत:

❊ परिसरातली भाषा हेच मुलांच्या शिक्षणाचे सर्वोत्कृष्ट माध्यम आहे.

❊ शाळेत जाण्यापूर्वी अंगणवाडी-शिशुवाडी-बालवाडी या माध्यमांतून मुलांना भाषिक अनुभव मिळणे अत्यावश्यक आहे.

❊ पहिलीत भाषाशिक्षण देताना अक्षरांपासून किंवा बाराखडीपासून सुरूवात केली तर मेंदूवरचा बोजा वाढतो; म्हणून शब्दांपासून सुरूवात करावी व शब्दोच्चार, शब्दानुभव यातून अर्थपूर्ण वाक्यांकडे जावे.

❊ वयाच्या पाच-साडेपाच वर्षापर्यत लेखन नाही आणि पुढे दहा वर्षापर्यत लेखनाचा भरपूर सराव या पध्दतीने मुलांचे हस्ताक्षर तर सुंदर होतेच पण लिहिण्याचीही आवड वाढते.

❊ अशी भाषा शिकल्यास मुले चांगली वाचक तर होतातच पण चांगले साहित्यही निर्माण करायला लागतात; उत्तम कविता करतात, सुंदर गोष्टी रचतात.

❊ पहिली भाषा (उदा. मराठी) चांगली शिकली की दुसरी भाषा (उदा. इंग्रजी) चांगली शिकता येते. म्हणून इंग्रजी माध्यमातून शिकवण्याचा आग्रह धरण्याऐवजी परिसर-भाषेतून शिकत, लहानपणापासून इंग्रजी बोलायला शिकवावे.

❊ भाषा चांगली शिकलेली असली की मग विज्ञान, गणित, सामाजिकशास्त्रे शिकणे सोपे जाते.

या पध्दतीने शिकवलेल्या मुलांनी भाषाशिक्षणाच्या बाबतीत जी प्रगती केली आहे तिचे नमुने, त्यांच्या लिखाणाच्या फोटोप्रती काढून, या पुस्तकात छापलेले आहेत. इंग्रजी शब्द वापरायचा तर ते निव्वळ फॅन्टॅस्टीक असे आहेत. ज्या काळात एम.ए. झालेल्या मुलाला साधा अर्ज लिहिता येत नाही त्या काळात दुसरीतल्या मुलींनी केलेल्या कविता आणि चौथीतल्या मुलांनी लिहिलेले निबंध (आणि त्यांचे मोत्यासारखे हस्ताक्षर) तोंडात बोट घालून बघत राहावे असे आहे. मुलांना वाचनाचे वेड लागते हे समजण्यासारखे आहे पण लिहिण्याचेही वेड लागते ही केवढी अद्भूत गोष्ट आहे! ते वाचताना मनात आले की आम्हालासुध्दा अशी भाषा शिकवली असती तर....

या पुस्तकाची सर्वात मोठी उपयुक्तता म्हणजे बहुजन किंवा वंचित घटकातील मुलांच्या शिक्षणामध्ये ते फार मोठी भूमिका बजावेल. जर चांगल्या पध्दतीने भाषा शिकवली तर या घटकांतील मुले आपली वंचितावस्था झुगारून फार झपाट्याने शैक्षणिक प्रगती करू शकतात हे यात सप्रमाण दाखवलेले आहे.

शास्त्रीय ज्ञानाच्या दणकट पायावर उभे असलेले आणि कृतीचा भक्कम पुरावा देत असलेले हे पुस्तक शिक्षणक्षेत्रालाच नाही तर मराठी भाषेलाही समृध्द करणारे आहे. प्रत्येक शिक्षक आणि पालकाने (म्हणजे सगळ्यांनीच) ते वाचले पाहिजे. त्यामुळे आपल्या मनातला संभ्रम तर दूर होईलच, पण आज शिक्षणाच्या प्रक्रियेत जो तणाव आणि हिंसा निर्माण झाली आहे ती दूर होउन मुलांना चांगले नागरिक बनवण्याचा मार्गही मोकळा होईल. त्या अर्थाने या पुस्तकाचे शीर्षक अतिशय अन्वर्थक आहे. ते निसर्गाचे वर्णन नाही तर मानवी मनात चालणाऱ्या शिक्षणप्रक्रियेचे आणि त्यातून उन्नत होणाऱ्या समाजाचेच रूपक आहे.

❑

निळे आकाश
हिरवी झाडे
काळी माती

# भाषाशिक्षणाचे प्रयोग पुस्तक

**मुकुंद कुळे**

भाषाशिक्षणाचे पायाभूत महत्त्व पटल्याने भाषा शिक्षणासंबंधी ग्राममंगल  ही नावाजलेली संस्था सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत असते. प्रत्येक शाळांमधे विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. या सर्व उपक्रमांचा आणि त्यामागील सैध्दांतिक विचारांचा वेध 'निळे आकाश, हिरवी झाडे, काळी माती' या रमेश पानसे यांनी लिहिलेल्या पुस्तकामधे घेण्यात आला आहे.

बालशाळेतील भाषाशिक्षण, औपचारिक भाषाशिक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वाटचाल वाङ्मयाकडे, आंतरशाखीय भाषाशिक्षण अशा टप्प्यांमधे भाषाशिक्षण विकासाची नेमकी माहिती देण्यात आली आहे. संकल्पनेचे स्पष्टीकरण, सरावाची साधने, मूल्यमापन या तीनही गोष्टींचा वापर करणे, कसे गरजेचे आहे याची नेमकी जाणीव हे पुस्तक करून देते. भाषाशिक्षणाची पायाभूत सूत्रेही पानसे यांनी सोप्या भाषेमधे दिली आहेत. भाषाशिक्षण नेहमी आधी शब्दांची ओळख, मग स्पष्ट शब्दोच्चार अशा क्रमाने होते. शब्दोच्चार नेमके आणि स्पष्ट असणे हे भाषेच्या वरील तीनही कौशल्यांबाबत आवश्यक आहे. भाषाशिक्षणाची सुरूवात कशी करावी, शब्दोच्चार कसे असावेत, याबाबत विस्तृत विवेचन उदाहरणासह देण्यात आले आहे.

मुलांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल, तर काय घडू शकते याचे उदाहरण, पुस्तकामध्ये देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या लेखनामधून पदोपदी दिसते. मुलांना लिहिणे आवडते....ते लिहिण्याचे वेड लागते, इथपर्यंत मुले पोहोचतात, हे विधान मनोमन आपल्याला पटते. मुलांना बोलीभाषेच्या वापराकडून प्रमाणभाषेच्या लिखाणाकडे नेण्यासाठी नेमके काय करावे, याचेही छानसे विवेचन या पुस्तकात आहे.

भाषा बोलणे, ऐकणे आणि ऐकून समजणे या नैसर्गिक क्षमता पुरेशा विकसित झाल्याशिवाय लेखन-वाचनाचा आग्रह धरणे ही अशास्त्रीय बाब आहे. या क्षमता विकसित झाल्या असल्या, तर भाषा अधिक वेगाने विकसित होते. त्याचप्रमाणे सुंदर हस्ताक्षराविषयी शिक्षकांच्या जाणीवेमध्येच उणीव आहे. सुंदर हस्ताक्षरांविषयी ओढ निर्माण करण्याचे काम शिक्षकांनी करायला हवे. मात्र, बहुतांशी शिक्षकवर्ग त्याविषयी उदासीन असतो. याकडे लक्ष वेधायला पानसे विसरत नाहीत. वयाच्या पाच-साडेपाच वर्षांपूर्वी ज्या मुलांनी लिखाणाला सुरूवात केली आहे. त्यांचे हस्ताक्षर खराब असते, तसेच बिघडलेले हस्ताक्षर सुधारता येते, असे निरीक्षण पानसे यांनी नोंदविले आहे.

आंतरशाखीय भाषाशिक्षण विषयांमधे पानसे यांनी

विविध विषयांमधे वापरण्यात आलेली हिंदी, इंग्रजी भाषाशिक्षणाचे महत्त्व, शिक्षणाची पध्दत सांगितलेली आहे.त्यासाठी ग्राममंगलमधे तिसरीमधेच विविध विषयांमध्ये असणारे शब्द वापरण्यास सुरूवात केली जाते. त्यामुळे मुलांची आंतरशाखीय भाषा अधिक समृद्ध होते. त्याचा फायदा पुढील इयत्तांमधे आपसूकच होत जातो.

दोन भाषा शिकताना मुलांची नेमकी बौध्दिक स्थिती कशी असते, एक भाषा शिकताना पहिली शिकलेली भाषा तिच्या स्वत:च्या संस्कृतीला कायम ठेवूनच कशी विकसित व्हायला हवी याबाबत विस्तृत विवेचन केले आहे. क्रमिक पुस्तकांमध्ये न अडकता भाषेकडे पाहिले तर आकलन आणि भाषिक समृध्दी साध्य होते. शिक्षणाची उद्दिष्टे अधिक व्यापक करून मुलांना विस्तारित भाषानुभव देत गेलो, आणि विद्यार्थी घेत गेले, तर त्यांची शब्दसंपत्ती विविधांगी होते. व्यावहारिक होते आणि वाढतही जाते.... पानसे यांचा हा अनुभव संपूर्ण पुस्तकामधे पुन्हा पुन्हा जाणवत राहतो. भाषासमृध्दीसाठी वेगळे काही प्रयत्न करू इच्छिणाऱ्या शिक्षकांनी आणि पालकांनी हे पुस्तक जरूर वाचाचे असेच आहे.

***(महाराष्ट्र टाइम्स दि. ९-९-२०१२ वरून साभार)***

## भाषाशिक्षणाची पायाभूत सूत्रे -

* मुले आपल्या नैसर्गिकतेने, लहान वयातच, आपली पहिली भाषा आत्मसात करतात आणि यासाठी त्यांना त्यांच्या परिसरातील प्रौढांचे सहाय्य लागत असते.

* सहाव्या वयापर्यंत मुलांच्या भाषेच्या दोन क्षमता विकसीत झालेल्या असतात. एक, भाषा बोलता येणे आणि दोन, दुसयाने बोललेली भाषा समजणे. ही भाषेची तयारी घेऊनच मुले औपचारीक शालेय शिक्षणात प्रवेश करतात, याचबरोबर त्यांचा शब्दसंग्रहही मोठा झालेला असतो.

* मुलांची भाषा शिक्षणाची होणारी तयारी, त्यांच्या मेंदुमधील भाषा -केंद्राच्या विकासाशी निगडीत असते.

* मेंदुमधील भाषा शिक्षणाची नैसर्गिक प्रक्रिया आणि मुलांना मिळणारे बाह्य जगातील भाषासहाय्य यांचे सांगड घालणे हा औपचारिक भाषा शिक्षणाचा पायाभूत सिध्दांत म्हणून स्वीकारता येईल.

* औपचारिक शिक्षणात भाषा विकासासाठी, विद्यार्थ्यांना भ्विक अनुभव देणाऱ्या उपक्रमांची वयोमानानुसार मांडणी करून त्यांचा विकासपथ तयार करावा लागतो. विद्यार्थ्यांची त्यावरून पायरी-पायरीने वाटचाल व्हावी लागते.

* या विकासपथावरून वाटचाल करताना सततच भाषा विकासाची साधने व उपक्रम यांची मदत होत असते. ही सूत्रे आधाराला घेऊन जर एखाद्या शाळेत भाषा शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली तर विद्यार्थ्यांचे भाषाशिक्षण अधिक वेगाने, अधिक नेमकेपणाने आणि परिपूर्णतेने होत जाते याचा प्रत्यय घेता येईल.

**निळे आकाश-हिरवी झाडे-काळी माती...मधून**

निळे आकाश
हिरवी झाडे
काळी माती

# प्रतिक्रिया

**मिलिंद केशव उपाध्ये**

मी वय वर्षे १५ वर्षाच्या पुढच्या वयोगटातील तरूणांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याचे काम करतो. प्रशिक्षण देताना भाषाविषयक येणारी नेहमीची अडचण म्हणजे मुलांना मनाने लिहिता येत नाही. लिहिता येत नाही म्हणजे मुलांना पुस्तकातले लिहिता येते,पाठ करून लिहिता येते, पण एखादी गोष्ट, त्यांनीच केलेले प्रात्यक्षिक स्वतःच्या भाषेत लिहा म्हटले की गाडी अडते. चार वाक्ये कसेबसे लिहू शकतात. तसेच मुलांना वाचता येत नाही, म्हणजे रूढार्थाने वाचता येते. पण एखाद्या स्वतंत्र विषयावरची संकल्पना स्वयंअध्ययनाने, स्वत: वाचून समजून घेणे जड जाते. मुलांना कोणताही साधा मराठीतला अर्ज, ज्यामधे अर्ज कसा भरावा? यासंबंधी कंसात सूचना, तळटीपा वगैरे दिल्या असल्या तरी तो अर्ज भरता येत नाही. या सर्वांचे कारण काय? याचा मी शोध घेत होतो. नेमके तेव्हाच 'निळे आकाश–हिरवी झाडे–काळी माती' हे प्रा. पानसे सर यांचे पुस्तक हाती पडले.

या पुस्तकामध्ये भाषाविषयक शिक्षणाच्या मूलभूत संकल्पना प्रात्यक्षिकांसह विशद केल्या आहेत. आंतरशाखीय भाषाशिक्षण या प्रकरणात हे (पृ. क्र. ८५) हे खूपच नेमकेपणाने विशद केले आहे. विज्ञानासारख्या शास्त्रीय विषयांची असणारी तांत्रिक भाषा सहजतेने आकलन होईल अशाप्रकारे त्यांची भाषिक तयारीच झालेली नसते. याचे प्रत्यंतर शास्त्रशाखेच्या, तांत्रिक विषयाच्या बाबतीत हमखास अनुभवायला येते.

माणसाची विचारशक्ती, कल्पनाशक्ती, संभाषण इ. विकसित करणे ही जीवनासाठीची भाषाशिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. आणि त्यासाठी ग्राममंगलमध्ये तांत्रिक संज्ञा, विविध घटक, विविध आशय यांवर आवर्जून गप्पा मारल्या जातात. त्यामुळे क्रमिक पुस्तकाच्या बाहेर पडून मुले स्वतःच्या भाषेत लिहू शकतात. तिसरीतल्या प्रतिक्षाने चक्क 'नाकाची निगा' या विषयावर कोणत्याही पुस्तकात नसलेली पण महत्त्वाचा आशय असणारी पानभर (सुमारे २७ वाक्ये) स्वतंत्र माहिती लिहिली आहे. नाहीतर पदवीधारांना साधे चार ओळींचे पत्र लिहिणे जीवावर येते. शिकणे किती सोपे आहे. किती नैसर्गिक आहे. त्यात कृत्रिमता आली की सोपे शिक्षण अवघड होते. मार्क ट्वेन म्हणायचा 'मी आणि शिक्षण यात शाळा आडवी आली, नाहीतर मी खूप शिकलो असतो.'

**काही संकल्पना वाचून मलाच हलके–हलके वाटले**

* ६ वर्षापर्यत मुलांना लिहायची सक्ती करू नये.

* शिक्षण ताणविरहीत असावे.
* भाषा बाराखडीपासून न शिकविता प्रथम अक्षरे न शिकविता शब्द शिकवावे. तेही ओळखीचे शब्द, आई, बाबा, नाक, कान इत्यादी.
* स्वयंअध्ययन पध्दत आनंदी वातावरणात, हसत-खेळत नैसर्गिकरित्या शिकण्याची पध्दत, परिणामकारक आहे.
* बालकांस गोष्टी सांगतानाचे नियम हे प्रकरण गोष्टीप्रमाणेच रंजक आहे. केवळ या प्रकरणासाठी तर समस्त बालकांनी हे पुस्तक खाऊतील पैसे खर्चून त्यांच्या पालकांना सप्रेम भेट द्यावे.
* मुलांना लिहायला वाचायला न लावता त्यासाठी बौद्धिक, शारीरिक तयारी करून घेतली जावी
* मुलांना जबरदस्तीने लेखन, वाचन देणे म्हणजे जेवणाऐवजी तयार प्रोटीन देण्यासारखे आहे. भले मुले त्यामुळे गोंडस दिसत असली तरी त्यामुळे मुलांची भूक मरते.

मुख्य म्हणजे या सर्व संकल्पना राबविणे सहजशक्य आहे, नैसर्गिक आहे, बिनखर्चाचे आहे, अल्पशा साधनसामुग्रीने साध्य होण्यासारखे आहे. गरज आहे ती शिक्षकांची, पालकांची, शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची मानसिकता बदलण्याची. निदान या पुस्तकाने त्या दृष्टीने सुरूवात झाली तरी पुस्तकाची संकल्पना यशस्वी झाली असे म्हणावयास हरकत नाही. ता.क. : हे पुस्तक ए-४ आवृत्ती मध्येही उपलब्ध व्हावे व या संकल्पना इंटरनेट माध्यमातही उपलब्ध व्हाव्यात.

❑


अर्थसहाय्य इथून घ्यावे... सुखी, समृद्ध, संपन्न व्हावे !



विविध कर्ज योजना
■ जनता गृहकर्ज योजना
■ जनता वाहन कर्ज योजना
■ जनता सोने कर्ज योजना
विविध लाभदायक ठेव योजना
■ जनहित ठेव योजना ■ चिरंजीव ठेव योजना
■ स्वधन ठेव योजना
अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा
■ NEFT व RTGS सुविधा

I.S.O. 27001 आणि I.S.O. 9001 प्रमाणित डेटा सेंटर असलेली सहकारी बँक

जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे २. फोन : २४४५३२५८, २४४५३२१९ फॅक्स : ०२० - २४४५३४३०
email : jsbho@vsnl.com www.janatabankpune.com

निळे आकाश
हिरवी झाडे
काळी माती

# प्रगत भाषिक विश्वाच्या प्रांतातील प्रवेश

रमेश पानसे

आजवर आपण सातवीपर्यंतचे शालेय शिक्षण हे प्राथमिक शिक्षण म्हणून मानत आलो आहोत. नवीन कायद्यानुसार आता आठवी इयत्तेचा समावेशही प्राथमिक शिक्षणात करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार पाहिल्यास वय वर्षे सहा ते चौदा असा हा वयोगट आहे. बालकांच्या संपूर्ण नैसर्गिकरित्या होणाऱ्या विकासाच्या दृष्टीने हे वय खूप महत्त्वाचे असते आणि म्हणूनच आपण या वयातल्या प्राथमिक शिक्षणाला पायाभूत शिक्षण म्हणून माणसाच्या आयुष्यात स्थान देत असतो.

या पायाभूत शिक्षणात भाषेचे शिक्षण ही एक अनिवार्य अशी बाब आहे. याचे मुख्य कारण असे की, सहा ते चौदा हे भाषा संपन्न करण्याचे फार सुंदर असे वय आहे. या वयापूर्वी मुले आपली आपण भाषा आत्मसात करून, तयारीनिशी औपचारिक भाषा शिक्षणास सामोरी जात असतात. आपल्या नैसर्गिक क्षमतेने मुले, दुसऱ्याने बोललेली भाषा समजू लागलेली असतात आणि त्याचबरोबर दुसऱ्याला समजेल अशी भाषा बोलूही लागलेली असतात. म्हणजे, भाषेच्या नैसर्गिकरित्या विकसित होत जाणाऱ्या श्रवण व भाषण या क्षमता, पुरेशा प्रमाणात घेऊन मुले शाळेची पहिली पायरी चढतात. आता काळ सुरू होतो तो, भाषा सामाजिक अंगाने आत्मसात करण्याचा काळ. संस्कृतीच्या उत्क्रांतीमध्ये, सामाजिक व सांस्कृतिक गरजांनुसार भाषा प्रगत होत जाते, या प्रगत भाषेच्या विश्वाकडे घेऊन जाणे हे, प्राथमिक शाळांचे प्रथम कर्तव्य असते. नैसर्गिक क्षमतांकडून प्रगत भाषिक विश्वाकडे घेऊन जाणारा असा हा प्रवास असतो. समाजातील, शाळांतील प्रौढांच्या सहाय्यानेच हा प्रवास घडून येत असतो. त्या प्रवासाचे प्रस्थान ठेवण्यासाठीच मुळी औपचारिक शिक्षण देणाऱ्या शाळांचा घाट घातलेला असतो. त्यामुळे मुलांना या प्रवासात पुढे पुढे नेण्याची जबाबदारी शिक्षकांना व अन्य प्रौढांना घ्यायची असते.

प्रगत भाषिक विश्वाच्या प्रांतात प्रवेश करण्याचे साधन म्हणून वाचन व लेखन ही कौशल्ये प्रथमतः विद्यार्थी अंगिकारतात. साधन बळकट असेल तर साध्याकडचा प्रवास फारसा कठीण नसतो. साहजिकच, लेखन–वाचनाची ही भाषिक कौशल्ये परिपूर्णतेने, प्राथमिक शिक्षणाच्या सुरूवातीसच मुले कशी आत्मसात करतील यावर सर्वस्वी लक्ष केंद्रित करावे लागते. शालेय इयत्तांच्या भाषेत बोलायचे तर साधारणपणे हा पहिली–दुसरीचा टप्पा असतो.

एकदा लेखन–वाचनाचे साधन, चांगले परजून हाती आले की मग, तिसरी–चौथीच्या टप्प्यात,

मुले या साधनांचा वापर करून खऱ्या अर्थाने भाषेच्या शिक्षणाकडे वळतात. आपल्या हाती बळकटपणे आलेली शस्त्रे परजून ती तीन दिशांनी फिरवण्यासाठी मुले सज्ज होतात. एक, भाषा आणि विचार यांची सांगड घालणे, दोन, कल्पनाशक्ती व भाषा यांची सांधेजोड करणे, आणि तीन, भाषेतून संभाषण करण्याची ताकद वाढवून त्याकरवी समाजसंपर्काचे कार्य विस्तारणे. तिसरी–चौथीपासून थेट सातवी–आठवीपर्यंत मुलांचे भाषाशिक्षण हे या तीन दिशांनी त्यांची तयारी पक्की होण्यासाठी करायचे असते. विविध उपक्रम आखून शक्य तेवढे भाषानुभव मुलांना, घेऊ द्यायचे असतात. शालेय भाषाशिक्षण म्हणजे, नेमकेपणाने सांगायचे तर, या तीन दिशांनी विद्यार्थांना विकसित करण्यासाठी विविधांगी भाषानुभव देणाऱ्या उपक्रमांची मांडणी करणे होय.

हा शालेय भाषाशिक्षणाच्या व्याख्येचा पहिला पैलू आहे. येथे अर्थातच, नेमलेले क्रमिक पुस्तक अपुरे ठरते. याचे प्रमुख कारण असे की, क्रमिक पुस्तक बव्हंशी वाङ्मयाच्या अंगाने बेतलेले असते; साहजिकच भाषेच्या वापराची ती एकमेव किंवा प्रमुख दिशा नव्हे. किंबहुना असे म्हणता येईल की, विचारशक्तीचा विकास, कल्पनाशक्तीचा विकास आणि भाषेचा संपर्कसाधन म्हणून होणारा विकास याचे, लिखित वाङ्.मय हे एक साधन आहे; मात्र ते एकमेव खासच नाही. याचे कारण असे की वाङ्मय ही मनुष्यबाह्य गोष्ट आहे आणि विचार करणे, कल्पना करणे व (संभाषणकरवी) मन व्यक्त करणे या सर्व मनुष्यांतर्गत क्षमता आहेत आणि या क्षमता विकसित करण्याचे व्यापक मानससाधन भाषा हे असून त्याचे एक अंग वाङ्मय हे आहे. या शालेय वयातील शिक्षणाचे उद्दिष्ट या तीन नैसर्गिक क्षमतांच्या विकासाला हातभार लावण्याचे आहे. हा हातभार लावणे म्हणजे, त्यांच्या वापराचे–वेगवेगळ्या परिस्थितीतील वापराचे–अनुभव उभे करणे. मुलांना विचार करायला प्रवृत्त करायचे, विविध दृश्य (पुढे अदृश्य–अमूर्त) घटकांतील परस्पर संबंध शोधायला व बांधायला लावायचे, वास्तव जगाकडूनच त्याच्या पलीकडील अ–वास्तव जगाची कल्पना करण्याच्या संधी पुरवणे या मार्गाने मुलांची कल्पनाशक्ती विकसित करता येते. मुलांच्या मनात आपापत:च काही विचार येत असतात, त्यांना चित्र–विचित्र कल्पनाही सुचत असतात आणि याचबरोबर वास्तव जगाचे अनुभवही त्यांच्या मनात साठत असतात, या साऱ्यांची अभिव्यक्ती प्रामुख्याने बोलण्यातूनही होणे हे त्यांचा आत्मविश्वास जागवणारे तर असतेच पण त्यांतून समाजसंपर्कातील पहिले द्वार मैत्रीच्या रूपाने खुलेही होते. संभाषण हे जेवढे अभिव्यक्तीचे तेवढेच ते आनंदाचे साधन होत असते. याचबरोबरीने ही अभिव्यक्ती लेखनातून होण्यासाठी मुलांना संधी द्यायची असते. लेखनाभिव्यक्ती ही जेवढी आनंददायक तेवढीच ती भाषाभिवृध्दी घडवून आणणारी कृती असते. भाषा नेमकेपणाने वापरता येणे, काटेकोरपणे वापरता येणे, आशयाच्या गरजेनुसार वळवता येणे या भाषिकसमृध्दीच्या गोष्टी लेखनानुभवांतून साध्य होत असतात. थोडक्यात असे की मनात जमा होणाऱ्या अनुभवाशयाची मौखिक वा लिखित स्वरूपातील अभिव्यक्ती करणे म्हणजेच शालेय भाषाशिक्षण म्हणता येईल. हा भाषाशिक्षणाच्या व्याख्येचा दुसरा पैलू होय.

शालेय स्तरावरील भाषानुभवांच्या विविध उपक्रमांमधून आणखी एक गोष्ट प्रामुख्याने घडून येते, ती म्हणजे मुलांचा शब्द–संग्रह विस्तारित होत जातो, मोठा होतो. इथे पुन्हा क्रमिक पुस्तकाची मर्यादा लक्षात घेणे इष्ट आहे. शालेय भाषाशिक्षणात

भर सर्वस्वी क्रमिक पुस्तक शिकविण्या–शिकण्यावरच दिला तर मुलांचा शब्दसंग्रह त्या अभ्यासापुरताच मर्यादित राहतो. या उलट शिक्षणाची उद्दिष्टे बदलून, अधिक व्यापक करून मुलांना विस्तारित भाषानुभव आपण देत गेलो नि विद्यार्थी घेत गेले तर त्यांची शब्दसंपत्ती विविधांगी होते, व्यावहारिक होते, वाढत जाते. मानवी जीवनात आणि नव्याने अवतरलेल्या ज्ञानयुगात तर शब्दसंपत्ती ही भौतिक संपत्तीपेक्षाही अधिक लाभदायक ठरणारी गोष्ट आहे!

**(निळे आकाश, हिरवी झाडे, काळी माती या पुस्तकातील उपसंहार हे प्रकरण)**

---

|| *बालविश्व* ||

# चित्रातून बोलणारे विद्यार्थी

सौ. विदुला सुशील जोशी

धायरी कर्णबधीर मुलांची शाळा या सुहृद मंडळाच्या शाळेत मी शिक्षिका आहे. प्राथमिक शाळेतील कर्णबधीर मुलांना शिकवत असताना वेगवेगळे अनुभव येतात.

वर्गात मुलांना चित्र काढायला सांगितले की बहुतेक वेळा मुले फळ्यावरील किंवा इतर पुस्तकातील चित्रे बघून काढतानाच आढळत. तसेच तुम्हाला आवडेल ते चित्र काढा असे सांगितले की डोंगर, नदी, झाड, सूर्य, झोपडी अशी ठरावीक चित्रे तरी काढत.

इयत्ता तिसरी, चौथीच्या विद्यार्थांना काही शब्दांचे गट करून दिले. त्यावर तुम्ही चित्रे काढायची हे सांगितले. एक शब्दगट होता रस्ते, मोटार, सायकल, झाडे,दिवे. तर दुसरा गट, स्वत:चे घर, अंगण घरातील माणसे असा दिला. या शब्दगटांतून वेगवेगळी चित्रे समोर आली. रस्त्यावर सायकलची रेस लागलेली होती. तर एकाने मोटार–सायकलची धडक दाखवली होती. एकाने रस्त्याच्या कडेला दिवे काढून मधे मधे झाडे काढली होती. एक चित्र वेगळेच काढलेले होते. रस्त्याच्या कडेला एक पडलेला माणूस व त्याच्या शेजारी पडलेली सायकल. तेव्हा त्या मुलाला विचारले असे दोघेही पडलेले का काढलेस तेव्हा तो खुणेने म्हणाला की, 'तो माणूस दारू पिऊन पडलेला आहे.' दुसऱ्या शब्दगटातील चित्रेही छान काढलेली होती. कौलारू घर, खिडकी नसलेले घर, झोपडी, दुमजली घर, अंगणात कोंबड्या, मोठे झाड, झाडाखाली मोठा अंबाडा घातलेली आई, अशी चित्रे पाहता पाहता एकीने एका बाईच्या चित्रात ओठावर दोन गोल काढलेले होते. त्या गोलाबद्दल विचारले, असता ती खुणेने म्हणाली, 'माझ्या आईचे ते दोन दात आहेत.' असाच वर्गात घडलेली एक प्रसंग. दोघा मित्रांच्या भांडणाचे पर्यवसन एकमेकांच्या रंगावरून चिडवण्यात झाले होते. त्याच्या दुसऱ्या दिवशी विजयने एकमेकांच्या खाद्यांवर हात ठेवलेली दोन मुले काढली होती. एक मुलगा लाल खडूने तर दुसरा पांढऱ्या खडूने रंगवला होता, म्हणून विचारले अशी वेगवेगळ्या रंगात का रंगवलीस तेव्हा तो म्हणाला, 'मी काळा म्हणून लाल रंग व माझा मित्र गोरा म्हणून पांढरा रंग. मी त्याच्याशी बट्टी करणार आहे त्याला चित्र दाखवणार आहे.' असे अनुभवले चित्रातून बोलणारे कर्णबधीर विद्यार्थी. ❑



# अनुभवातून भाषाशिक्षण

डॉ. सौ. सुप्रिया अत्रे

आजवर अनेकदा शिक्षकांच्या मेळाव्यात प्रशिक्षणासाठी, अनुभव कथनासाठी जाण्याची संधी मिळाली. शालेय पातळीपासून तो अगदी महाविद्यालयीन पातळीपर्यत सर्वसाधारणपणे आलेला अनुभव एकच आणि तो म्हणजे पाठ्यपुस्तकावर आधारित वर्गशिक्षण आपल्या वर्गासाठी नेमून दिलेल्या पाठ्यपुस्तकातील धडे, कविता वाचणे, कठीण शब्दांचे अर्थ सांगणे धड्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहिणे आणि जमल्यास कविता पाठ करणे, निबंधही पाठ करून लिहिणे यासारख्या चाकोरीबध्द शिकवण्यातून आमचे शिक्षक कधी बाहेर पडताना दिसत नाहीत. पाठ्यपुस्तकातील लेख, कविता, कथा यांच्या मूळ कलाकृती पाहणे, वाचणे त्यांचे संदर्भ सांगणे, लेखक, कवी यांच्या लेखनशैलीची माहिती असणे, वाङ्मयप्रकार माहिती असणे या आणि अशा प्रकारच्या गोष्टी धडा, कविता शिकवताना महत्त्वाच्या असतात, याचा विचार कधी या शिक्षकांच्या मनात येतो की नाही असेच म्हणावेसे वाटते. मात्र हे म्हणत असताना काही अपवाद, महत्त्वपूर्ण उल्लेख करणे आवश्यक वाटते.

मराठी भाषा शिकवणे म्हणजे त्या भाषेतील रचना, विचार, कल्पना, विविध रस, विनोद अशा अनेक गोष्टी विविध अनुभव देऊन, अनेक उदाहरणे. देऊन समजावून देणे अशा विचारांतून भारत विद्यालय, शहाबाग, ता. वाई या शाळेत काही प्रयोग आम्ही केले.

आम्ही पाचवी ते आठवीसाठी दरवर्षी एक पुस्तक वाचायला सांगतो. प्रथम त्या पुस्तकाचे लेखक, पुस्तकाचा प्रकार यांची माहिती सांगून मग त्याचे वाचन केले जाते. त्यानंतर त्यावर आधारित असे काम मुले करतात. उदा. तोत्तोचान हे पुस्तक जेव्हा आम्ही एका वर्गाला वाचनासाठी ठेवले तेव्हा वाचन चालू असताना, तोत्तोचानची शाळा व आपली शाळा यांची तुलना, तोत्तोचानमधील आवडती व्यक्तिरेखा, आवडता प्रसंग, शिक्षक इ. माहिती मुलांना लिहायला सांगितली. पुस्तक वाचून संपल्यावर तोत्तोचानचे भाषांतर केलेल्या लेखिका चेतना गोसावी यांच्याशी मुलांशी गप्पा ठरविल्या. मुलांनी स्वत: प्रश्न तयार करून त्यांची अतिशय सुंदर पध्दतीने मुलाखत घेतली. त्यांनीही मुलांना एक जपानी गाणे शिकविले. तोत्तोचानच्या अभिवाचनाचाही कार्यक्रम ठेवला त्यातही मुले रंगून गेली. म्हणजे मुलांना जर वेगळा अनुभव दिला तर ती त्यात रस घेऊन त्याकडे आपल्या स्वत:च्या परीने अर्थ लावून तो भाग समजून घेतात. हे येथे स्पष्ट झाले. यासारखाच एक अनुभव म्हणजे एका वर्गासाठी बहिणाबाई चौधरी यांच्या

कविता अभ्यासासाठी ठेवल्या. प्रथम त्यांच्या दहा कविता वाचून दाखविल्या. त्यांचे अर्थ सांगितले, फळ्यावर त्यांची माहिती व फोटो लावले, जेणेकरून मुलांना त्यांच्या कवितांची, लेखनाची ओळख होईल.त्याचवेळी त्यांच्यावरील इतरांनी लिहिलेले लेखही वाचून दाखवले. बहिणाबाईंवरील सी.डी.ही उपलब्ध झाली ती दाखवली. त्यानंतर मुलांना व्यक्तिचित्र, निबंध, रसग्रहण, पत्रलेखन, कवितालेखन इ. माध्यमातून बहिणाबाई संदर्भात काही लेखन करण्यास सांगितले. मुलांनी इतक्या सुरेख पध्दतीने त्याला प्रतिसाद दिला की, प्रत्येक मुलाचे लेखन हे स्वतंत्र प्रतिकृतीच ठरले. यावरून मुलांना स्वत:च्या अभिव्यक्तीसाठी मुक्तपणा दिला तर त्याचे परिणाम किती सुंदर होतात हे कळले.

आठवीच्या वर्गासाठी यंदा आम्ही 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक वाचनासाठी ठेवले. वाचता वाचताच आपली आणि कार्व्हरची स्थिती, त्याची शाळा इ. वरील तौलनिक लेखन केल्यानंतर एक उपक्रम करण्यावे ठरविले. कार्व्हरने शेंगदाण्याच्या अमाप आलेल्या पिकावर उपाय म्हणून त्याचे ३०० पदार्थ बनविले, त्यात खूपच वेगवेगळे पदार्थ होते. मुलांना आम्ही त्यांच्या कल्पनेने, त्यांनी स्वत: बनवून, आईची मदत न घेता शेंगदाण्याचे पदार्थ बनवायला सांगितले. ही कल्पना मुलांना इतकी आवडली की मुले आणि मुले यांनी ३३ पदार्थ बनवले. त्यात दाण्याच्या सूपपासून तो केकपर्यंत इतके छान पदार्थ केले की बास! 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक आता कायमस्वरूपी त्यांच्या लक्षात राहील यात शंकाच नाही.

नवरसांची माहिती करून घेणे हे सातव्या इयत्तेला कितपत शक्य होईल असे प्रथम मनात आले. पण करून पाहणे, मुलांना जास्तीत जास्त अनुभव देणे हाच आमचा उद्देश असल्याने आम्ही हा प्रयोग करायचे ठरविले. त्यानुसार गीतरामायणातील नवरसांचा समावेश असणारी नऊ गाणी निवडली. मुलांना ती ऐकवली. गीतरामायणाच्या व्हीडीओ, सी.डी. उपलब्ध झाल्याने त्यांचा गाण्यातील रसांचा अनुभव त्यांना घेता आला. त्याचवेळी फळ्यावर गीतरामायण, ग.दि.माडगूळकर, सुधीर फडके आणि नऊ रस यांची माहिती लिहिली होती. त्यांमुळे मुलांना गाणी समजून घेणे खूप सोपे गेले. काही रसांनी परिपूर्ण असणारी इतर गाणी, कविता, लेखही वाचून दाखवले जेणेकरून त्या त्या रसाची बऱ्यापैकी माहिती होऊन त्यांना एखाद्या कवितेतला रस ओळखणे सोपे होईल. या प्रयोगाला इतका उत्तम प्रतिसाद मुलांकडून मिळाला की त्यांनी बीभत्स, भयानक इ. रसांवर स्वत: काव्यरचना केल्या.

एकंदरीतच स्वत: शिक्षक जर मनापासून मला शिकवायचय्. मला माझ्या वाचनाचा, लेखनाचा, कल्पनाशक्तीचा अनुभव मुलांना द्यायचाय, अशा प्रेरणेने उद्युक्त झालेला असेल तरच हे घडू शकते आणि मग आपोआपच त्याचे लक्ष वृत्तपत्रीय वाचन करताना, मासिके वाचताना, चित्रपट पाहताना, प्रदर्शने पाहताना त्यातले मुलांसाठी काय काय वापरता येईल याकडेच असते. त्यासाठी मग तो पुस्तके, कात्रणे, चित्रे, सी. डी., कॅसेट, कोश, यांतच गुंतून जातो. कोणत्या इयत्तेला, कोणता विषय, कोणते पुस्तक नव्याने अभ्यासायचे आहे याची माहिती अगोदरच असल्याने, त्याच्या अनुषंगाने तो शोधमोहीम राबवू शकतो. नवनवीन कल्पनाशक्ती लढवून मुलांपर्यत जास्तीतजास्त चांगल्या प्रकारे तो विषय कसा पोचवता येईल हेच तो पाहतो. शिक्षकाचे कौशल्य येथेच तर खरे पणाला लागते!

सुप्रसिध्द व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्याशी गप्पांचा कार्यक्रम एकदा असाच आम्ही आयोजित

केला होता. व्यंगचित्र  हा मुलांना तसा नवा विषय. पण त्यासाठी आमच्याकडे त्यांची चित्रांची पुस्तके होती. आम्ही आठ दिवस आधी ती वर्गातून दाखवली. काही काही कल्पना स्पष्ट करून दाखवल्या. त्यानंतर मुलांच्या प्रत्यक्ष गप्पा झाल्या. मुलांनी खूपच छान प्रश्न विचारले. तेंडुलकरांनी मुलांचीही चित्रे काढली आणि चित्रे कशी काढायची त्याचे प्रात्यकक्षिकही दाखवले. शेवटी तर एका मुलाने त्यांचेच व्यंग चित्र काढून सर्वांनाच चकीत केले. त्यांची शाबासकी मुलांना खूप काही देऊन गेली.

मी नेहमी शिक्षक हा शब्द उच्चारला की मनात एक समीकरण मांडते. शि–शिक्षित असणारा, क्ष–क्षमतांचा वापर आणि विचार करणारा क– कमतरता नसणारा, कमी नसणारा. जो शिक्षक स्वत:तील क्षमता ओळखून, मुलांसाठी मला काही करायचे आहे याचा विचार करून, प्रचंड उत्साहाने, कुठेही कमतरता न ठेवता, स्वत: नवीन शिकण्याची तयारी असणारा असतो ना तोच मुलांना अधिकाधिक जवळचा, आवडता वाटतो. खर तर भाषा शिकवणारा शिक्षक असा हुरहुन्नरी, प्रयोगशील, न कंटाळता नवनवीन गोष्टी करायची तयारी असणारा आणि विद्यार्थांप्रती आस्था व विषयाबद्दल प्रेम असणारा असेल तर मला वाटते, मराठीचा भविष्यकाळ नक्कीच उज्ज्वल आहे यात शंका नाही.

❑

---

**ही बहिणाबाई चौधरी यांची कविता वर्गात वाचून दाखवली व समजावून दिली त्यानंतर मुलांना गटशः कविता लिहायला सांगितली त्यापैकी एका गटाने केलेली ही कविता-**

**कशाला काय म्हणू नये!**

*जो राज्य करत नाही*
*त्याला राजा म्हणू नये*
*जे आपलेच नाही*
*त्याला माझा म्हणू नये*

*जे आपल्या जवळ आहे*
*त्याला दूर म्हणू नये*
*ज्याच्याकडे सर्व काही*
*त्याला सूर म्हणू नये*

*ज्याच्यात पक्षी राहत नाही*
*त्याला घरटे म्हणू नये*
*जे आपल्याला टोचत नाही*
*त्याला काटे म्हणू नये*

*ज्याच्यात नाही प्राण*
*त्याला प्राणी म्हणू नये*
*ज्याच्यात नाही तालसूर*
*त्याला गाणी म्हणू नये*

*ज्यामधे नाही मधूर संसार*
*त्याला घर म्हणू नये*
*ज्यापासून काम होत नाही*
*त्याला कर म्हणू नये*

*ज्याच्यापासून दूध मिळत नाही*
*त्याला गाय म्हणू नये*
*ज्याच्यापासून माया मिळत नाही*
*त्याला माय म्हणू नये*

शुभम,अनिता,अवधूत,श्रुती,सायली इयत्ता सातवी.

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेची वाटचाल

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे आठवे अधिवेशन नाशिक येथे २००२ साली बालशिक्षणतज्ज्ञ प्रा. रमेश पानसे यांच्या अध्यक्षतेखाली भरवण्यात आले. या कार्यक्रमाला श्री. मधुकरराव चौधरी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू आणि शिक्षणशास्त्र विज्ञाशाखेतील प्राध्यापक यांची लक्षणीय उपस्थिती या अधिवेशनाला होती. हे अधिवेशन थाटात पार पडले. श्री. चौधरी यांच्या सूचनेप्रमाणे बालहक्क आयोगाची स्थापना सरकारने केली. तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी त्याला प्रतिसाद दिला याबद्दल सरकारचे आभारही या अधिवेशनात मानण्यात आले. श्री. चौधरी यांना २००३ साली सोलापूर येथे भरवण्यात येणाऱ्या अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करण्यात आली व त्यांनीही त्यास मान्यता दिली.

याकाळातच बालशिक्षण परिषदेच्या अंतर्गत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.त्यात जिल्हा अधिवेशने भरवावीत, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अभ्यासवर्ग चालू करावा, प्रत्येक शाखेने व्यवस्थापकीय वर्ग त्यांच्या केंद्रात घ्यावा त्याला परिषदेतील तज्ज्ञ मंडळींना बोलवावे; 'बालशिक्षणाची ज्ञानगंगा' या मालिके अंतर्गत पुस्तिका संचाचे प्रकाशन करावे व नव्या शाखा स्थापन करून सभासद संख्या वाढवावी असे निर्णय घेण्यात आले व त्याची कार्यवाही करण्यात आली.

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या पुणे व ठाणे या शाखांनी मोठी बालनगरी याकाळात भरवली होती. त्याचप्रमाणे शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग, पालक प्रबोधन वर्ग आणि साधननिर्मिती कार्यशाळाही या काळात घेण्यात आला याचा एकत्रित आढावा अधिवेशनात घेतला गेला.

२००३ साली भरवलेल्या या अधिवेशनात 'बालखेळ' या विषयावरील शोधनिबंध सादर करण्यात आले. श्रीमती रजनीताई दाते, अमृता पुरोहित, प्राची हातवळणे, आदिती नातू यांनी आपले निबंध वाचले. या निबंधात महत्त्वाचे विचार मांडले. औरंगाबाद व नाशिक येथील शाळाही यात सहभागी झाल्या होत्या.

यापुढे २००४ साली नगर येथे, २००५ साली परभणीला, २००६ ला कोल्हापूर, २००७ ठाणे २००८ साली वाई (जि. सातारा) व २००९ साली औरंगाबाद येथे महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेची अधिवेशने आयोजित करण्यात आली होती या अधिवेशनांचे अध्यक्षस्थान श्री. मधुकरराव चौधरी यांनी भूषविले. या संपूर्ण काळात मुलांचे मूल्यमापन

या विषयावर ए. के. जोशी, ठाणे या शाळेतील शिक्षिका मेघना गुलगुंद, संगीता रेळेकर, वंदा मल्होभा यांनी निबंध वाचले. मुलांबरोबर काम करून त्याची केलेले विश्लेषण या निबंधात मांडण्यात आले. प्राथमिक शिक्षकांच्या अपूर्णांकाच्या संकल्पनाः एक अभ्यास–निलेश निमकर, ७५ वर्षातील शिक्षण पत्रिकांच्या माध्यमातून–विज्ञान युगातील बालपणीचा मागोवा–वासंती कुलकर्णी, चित्रकला, हस्तकला, भाषा यांचे विज्ञान शिक्षणातील महत्त्व–श्रीमती शमिन पडळकर, प्रभावी बालशिक्षण आणि प्रभावी शिक्षक–चिकित्सक अभ्यास–गीता उमेश गिल्डा, इंग्रजी शाळेतील भाषाविकास कार्यक्रम–शिक्षकांचा दृष्टिकोन–प्रीती कुलकर्णी आणि अपर्णा वरूडकर, बालशाळेतील शिक्षकांची सृजनशीलता–सुचिता पडळकर, प्राथमिक शाळाशिक्षकांची गणिताची समज–पूर्णिमा साठे, बालशिक्षणात संगीताचे स्थान–संध्या देशमुख, २१ व्या शतकातील शिक्षक–हेरंब कुलकर्णी, डॉ. वृषाली किन्हाळकर, शिक्षणपत्रिकेच्या नजरेतून शिक्षक–रोहिणी रसाळ, मतिमंदत्व व बालशिक्षण–कुबराबी बागवान, क्रीडा व बालशिक्षण, बालशिक्षणातून पर्यावरणाची जाणिव जागृती, ज्योती बेंद्रे, स्मिता भिंताडे, बालशिक्षणात पालकांचा सहभाग, बालकांच्यात वाचनाची आवड निर्माण करणे–सुलभा प्रभुणे असे विविध विषयांवर दर्जेदार शोधनिबंध सादर करण्यात आले.

२००५ साली महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने आणखी एक महत्त्वाचे कार्य केले. ते म्हणजे अत्यंत दुर्लक्षित असलेल्या बालशिक्षणाचा अभ्यासक्रमही तयार करणे. हा अत्यंत शास्त्रशुद्ध, नवीन संशोधनांवर आधारित, अनुभवांना प्राधान्य देणारा असा हा विकासात्मक शिक्षणक्रम तयार करून तो अनेक बालशाळांना वापरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला. शाळांनी तो वापरून बघावा व त्याविषयीच्या सूचना परिषदेकडे कळवाव्या, असे आवाहन सर्वांना करण्यात आले. रीतसर तज्ज्ञ मंडळीची समिती नेमून बालशाळेत (म्हणजे सुमारे अडीच ते साडेपाच या वयोगटात) नेमके काय शिक्षण द्यावे, कशा पध्दतीने द्यावे याविषयीचा विचार बालशाळेचा विकासात्मक शिक्षणक्रम तयार करण्या मागे होता. रामजोशी समितीच्या अहवालातील ढाच्याप्रमाणे त्यात बदल केले गेले. त्याचप्रमाणे मेंदू आधारित शिक्षण, अनुभवातून शिक्षण व आनंददायी शिक्षण या संकल्पनांचा पुरस्कार या शिक्षणक्रमात केला आहे. पुढे हाच शिक्षणक्रम २०१०साली सुधारित स्वरूपात उपलब्ध करून दिला गेला.

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे हे कार्य अतिशय मूलभूत व शिक्षणसमवेत भरीव कामगिरी ठरणारेच आहे.

***(क्रमशः)***

***प्रतिनिधी***

---

**शाळांमधून अभिव्यक्ती स्वातंत्र्य जोपासायचे असते. बोलण्या–लिहीण्याच्या अमाप संधी त्यासाठी द्यायच्या असतात,मुलांना हवी तेवढी बडबड करू द्यायची असते. सांगितलेलेच नव्हे तर लिहावेसे वाटेल ते ते लिहू द्यायचे असते. समृध्द भाषा हा व्यक्तीस्वातंत्र्याचा,पर्यायाने लोकशाहीतील प्रभावी कार्यशील नागरिकत्वाचा पाया आहे.**

# विश्ववृत्त



वृ त्त वि श्व

## ■ कॅनडातील शिक्षकांच्या संघटनेचे सामुदायिक आंदोलन

'ऑन्टारिओ लिबरल शासना'च्या अंतिम शिक्षणविषयक खलित्यासंदर्भात कॅनडातील शिक्षक संघटनेने नापसंती दर्शविली आहे. शिक्षक संघटना आणि शासकीय शाळा मंडळ (स्कूल बोर्ड) या आंदोलनाच्या दोन्हींमधील वाद अजून अनिर्णित आहेत. जर शिक्षक संघटना आणि शाळा मंडळ यांनी, निर्धारित नव्या प्रस्तावावर सह्या केल्या नाहीत तर त्यांचा वाढविण्यात आलेला पगार थांबविण्यात येईल असे ऑन्टारिओच्या शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. ऑन्टारिओच्या शिक्षण खात्याकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या या खलित्यात शिक्षकांच्या दोन वर्षांच्या पगाराबद्दलच्या अटी, नवीन शिक्षकांच्या पगारातील वाढ, शिक्षकांच्या रजा आणि त्यांचे वेतन इत्यादींबाबत मांडणी केली आहे. शिक्षक संघटनांची आणि शिक्षण मंडळाची या प्रस्तावावर मंजुरी मिळवून त्या खलित्यावर सह्या होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र शिक्षक संघटनेस यातील काही गोष्टी मान्य नसल्याने संघटनांनी त्याविरोधात आंदोलन पुकारले आहे.

## ■ काँगोतील लष्करी संघर्षामुळे शिक्षण धोक्यात

युनिसेफव्दारा ७ ऑगस्ट २०१२ ला प्रकाशित झालेल्या अहवालात, काँगोतील लष्करी कारवायांमुळे आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या तीव्र संघर्षामुळे तेथील मुलांच्या शैक्षणिक वातावरणावर विपरित परिणाम होत असल्याचे दाखवून दिले आहे. काँगो प्रजासत्ताकाने तेथील शैक्षणिक परिस्थितीत बदल घडवून आणण्याकरिता युनिसेफला मदतीची विचारणा केली आहे. त्यानुसार या प्रस्तावावर युनिसेफ काम करत आहे. 'युनिसेफ मानवहितसंबंधित कृती समिती–काँगो' च्या अहवालात नमूद केल्यानुसार युध्दामुळे ज्या स्त्रिया व मुले यांचे जीवन विस्कळीत झाले आहे, त्यांच्या गरजा भागविण्यास व आयुष्य स्थिरस्थावर करण्यासाठी १३.३ कोटी अमेरिकन डॉलर्स इतकी रक्कम गरजेची आहे. उत्तर किव्हू या काँगोतील भागात मुलांचे व स्त्रियांचे जीवन अत्यंत अस्थिर झाले आहे. प्रचंड हिंसा; कत्तल, बलात्कार, पिळवणूक, मुले व स्त्रिया पळवणे, कामगारांवरील तीव्र अत्याचार आणि किव्हूतील २५८ शाळांची लूट आणि जाळपोळ झाल्याचेही नमूद केले आहे. या सर्व प्रकाराने जवळजवळ ६०,००० मुलांचे शिक्षण तर धोक्यात आलेच आहे परंतु या सगळ्यामुळे साथीचे रोग आणि कुपोषणाच्या तीव्र समस्येने पुन्हा डोके वर काढले आहे. काँगोतील या लष्करी संघर्षामुळे तेथील शैक्षणिक व आरोग्यविषयक भागात तातडीने मदत देण्यासाठी युनिसेफ प्रयत्नशील आहे.

## ■ केंद्रीय क्रीडा मंत्रालयाची नवी योजना

राष्ट्राचा विकास आणि उत्तम उभारणीसाठी भावी पिढी सुदृढ असणे आवश्यक असते. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने याचे महत्त्व ओळखून एक अभिनव कार्यक्रम देशभरात राबवायचा ठरवला असून लवकरच त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. देशभरातील शालेय विद्यार्थांना आरोग्याचे महत्त्व पटवून देणारा हा कार्यक्रम आहे. या नव्या योजनेनुसार इयत्ता पाचवीपासून विद्यार्थ्यांना आरोग्याचे गुण मिळणार आहेत. अभ्यास आणि खेळाबरोबरच सशक्त पिढी निर्माण व्हावी हा यामागचा हेतू आहे.

या कार्यक्रमानुसार सर्वोत्तम आरोग्य राखणाऱ्या पहिल्या १० ते २० विद्यार्थ्यांना अतिरिक्त २.५% तर, पहिल्या २० ते ३० विद्यार्थ्यांना अतिरिक्त २% आणि ३० ते ४० विद्यार्थ्यांना १.५% व ४०ते ५५ विद्यार्थ्यांना १% असे गुण मिळतील व त्याचे नंतर श्रेणीत रूपांतर केले जाईल. ही योजना इयत्ता पाचवीच्या वर्गापासून सुरू होईल. या योजनेसाठी सक्तीपेक्षाही स्वयंप्रेरणेची अधिक गरज आहे असे क्रीडा मंत्री माकन यांनी सांगितले. यामधे हृदयाची क्षमता, स्नायूंची ताकद, क्षमता, लवचीकता, अंतर्गत ऊर्जा आणि देहबोली अशा सहा निकषांनुसार विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासली जाणार आहे. या योजनेमुळे विद्यार्थी व पालक आरोग्याबाबत; सुदृढतेबाबत अधिक सजग होतील अशी आशा केंद्रीय क्रीडामंत्रालयास वाटत आहे.

## ■ अंतरिक्ष संशोधनात विश्वविक्रम

चाळीसगावसारख्या छोट्या शहरातून उच्च शिक्षणाच्या बळावर स्वीटी पाटे या महाराष्ट्रकन्येने अवकाशास गवसणी घालणारे यश संपादित केले आहे. अमेरिकेतील एरॉनॉटिक्स व ॲस्ट्रोनॉटिक्स फाऊंडेशच्या वतीने जागतिक पातळीवर व्यावसायिक स्पेस ट्रान्स्पोर्टेशन डिझाइन स्पर्धा नुकतीच घेण्यात आली. यामध्ये जगातील ६५ विद्यापीठांमधून १०० संघांने भाग घेतला होता. त्यात भारतीय स्वीटी पाटेच्या संघानी केलेल्या डिझाइनला बक्षिस मिळाले आहे.

स्वीटी पाटेने ५० प्रवासी वाहनक्षमता असणारे 'नवक्षितिजवाहक' हे स्पेस पॅसेंजर वाहन तयार करून अंतरिक्ष संशोधनात विश्वविक्रम केला आहे.स्वीटीने चेन्नई येथील एस.आर.एम. विद्यापीठातर्फे स्वत:च्या नेतृत्वाखाली सात जणांचा संघ तयार करून हे अंतरिक्ष वाहन तयार केले व अंतरिक्ष संशोधनाच्या क्षेत्रात घवघवीत यश मिळवले. या अगोदरही इको फ्रेंडली आणि कमीत कमी धावपट्टीवर धावणाऱ्या विमानाचे संशोधन करून 'नासा'मध्ये स्वीटीने भारताचे नाव पोचवले होते.

# राज्यवृत्त

## ■ मराठी युवकभारती पुस्तकाविषयी गदारोळ

अकरावीच्या 'युवकभारती'च्या निमित्ताने महाराष्ट्रभर सध्या गदारोळ चालू आहे. आत्तापर्यंत ज्या युवकभारतीच्या पाठ्यपुस्तकात गद्य–पद्य वेचे व पूरक वाचनासाठी उतारे होते ते संपूर्ण पुस्तक या वर्षी उपयोजित मराठी या स्वरूपात आले आहे. तीन वेळा मुद्रितशोधन झाल्यानंतरही त्यात काही चुका राहून गेल्या आहेत. त्याचप्रमाणे पुस्तकाचा आकार व वाचनाला अडथळा ठरणाऱ्या लांबलचक ओळी यांविषयीही नाराजी पसरली आहे. मात्र या पुस्तकामधून विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास करायचा जो हेतू आहे, तो निश्चितच स्त्युत्य आहे. या पुस्तकातून मुलांचे अध्ययन कौशल्य निश्चितच विकसित होईल. अनुवाद विद्या प्रावीण्याचाही यातून प्रयत्न केला आहे. स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठीही या पुस्तकाचा उपयोग होऊ शकेल, प्रसारमाध्यमातून भाषेचा वापर कसा होऊ शकेल, कसा करावा याचेही मार्गदर्शन विद्यार्थांना मिळू शकेल. परंतु वर्षानुवर्षे ज्या पध्दतीने शिक्षण देत आलो त्यात अचानक व मोठ्या प्रमाणावर झालेला बदल पाहून शिक्षक संभ्रमावस्थेत आहेत. या पुस्तकातून प्रात्यक्षिकावर भर देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शिक्षकांचे काम वाढून ते अधिक कौशल्यपूर्ण होईल व त्यांची कसोटी वाढेल असे दिसते आहे. प्रश्नपत्रिका काढतानाही त्यांना अभ्यास करावा लागणार आहे, संदर्भ पुस्तक पुस्तक मिळवून त्यांआधारे शिकवावे लागणार आहे. शिक्षक वर्ग या सगळ्या बदलांकडे कसे पाहतो आहे, यावरच या प्रयोगाचे यश अवलंबून आहे.

## ■ शासनाचा संभ्रमात टाकणारा निर्णय

बारावीच्या शास्त्रशाखेविषयी एक नवे धोरण नुकतेच जाहीर झाले आहे. वैद्यकीय शाखेसाठी प्रवेश परीक्षा देणाऱ्या बारावीच्या विद्यार्थांना या वर्षापासून राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा(NEET) लागू झाली आहे. मात्र अभियांत्रिकीसाठीची प्रवेश परीक्षा ही राज्यपातळीवरची(CET) राहाणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे विद्यार्थी व पालक संभ्रमात आहेत. या दोन्ही प्रवेश परीक्षांचा अभ्यासक्रम वेगवेगळा आहे. त्यामुळे या दोनही शाखांपैकी एकाचीच निवड विद्यार्थ्यांना करावी लागणार आहे. कारण या दोन्ही परीक्षांसाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या सगळ्यांचा एकत्रित अभ्यास करावा लागणार आहे. दोन्ही शाखांसाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण येण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. हे नवे धोरण इतक्या उशिरा म्हणजे ऑगस्ट महिन्यात जाहीर झाले आहे, याविषयीही शैक्षणिक वर्तुळात नाराजी व्यक्त होत आहे. शिक्षकवर्गही याविषयी अनभिज्ञ व उदासिन असल्याचीही नाराजी या निर्णयापाठीमागे आहे.

❑

# || ग्राममंगल वार्ता ||





ग्राममंगलच्या 'अध्ययनघर' (लर्निंग होम) या प्रकल्पातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व मुलांना अभ्यासक्रमांतील प्रत्येक घटक स्वतःच्या अनुभवांतून शिकण्याचा परिपाठ नित्यनेमाने मिळत असतो. पावसाळ्याचे निसर्गाने नटलेले सौंदर्य बघणे आणि ते बघता बघता जलरूपे, भूरूपे तसेच या ऋतूमधील प्राणी, पक्षी, कीटक, व वनस्पती यांची माहिती घेणे यासाठीची क्षेत्रभेट नुकतीच ताम्हिणी घाटात झाली.

इयत्ता पाचवीच्या पुढील मुलांनी सभोवतालच्या जंगलात रपेट केली. त्यांच्यासोबत त्याचा जीवशास्त्र व पर्यावरणशास्त्र यांचा अभ्यास घेणारा विक्रमकाकाही होता. इथे फेरफटका मारताना मुलांनी त्या भागातील वनस्पतीचे प्रकार, प्राणी, पक्षी, कीटक यांचे निरीक्षण केले, त्याबद्दल माहिती जाणून घेतली; अन्नसाखळी म्हणजे काय ? निसर्गात ती सातत्याने कशी चालू असते; त्याच्या विस्कळीत होण्याने पर्यावरणाचा समतोल कसा ढळतो. 'इको-सिस्टीम' म्हणजे काय? याबद्दलही जाणून घेतले.

इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांना घाट, डोंगर, टेकडी, पर्वत, मैदान, अशी भूरूपे दाखवण्यात आली. तसेच झरा, ओढा, ओहळ व नदी अशी जलरूपेही दाखवली. इयत्ता चौथीच्या मुलांचा महाराष्ट्राचा प्राकृतिक नकाशाचा अभ्यास त्यापूर्वी घेण्यात आलेला होता. त्यामुळे पुणे जिल्ह्यातून सह्याद्रीच्या रांगेत प्रवेश करताना कोणत्या घाटातून आपण जात आहोत. ताम्हिणी घाट ओलांडून गेल्यानंतर आपण महाराष्ट्राच्या कोणत्या प्राकृतिक



भागात प्रवेश करतो, कोणत्या प्राकृतिक भागातील, कोणत्या जिल्ह्यात जातो यांबाबत मुलांचा अभ्यास झालेला होता. घाटात गाडी थांबवून मुलाना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे दादा-ताई देत होती.

या सहलीवरून परतताना मुलांनी पिरंगुटच्या Cyber matic technology या कंपनीला भेट दिली. तिथे या कंपनीत १५० कामे करणारा 'रोबो' हे मुलांसाठी मुख्य आकर्षण ठरेल. त्याचप्रमाणे कंपनीच्या मुख्य द्वारापासून शेवटच्या टोकापर्यत सामान वाहून नेणारी रिमोटवरची गाडी याचीही मजा इथे मुलांनी घेतली. पण कंपनी म्हणजे काय? तिचे काम काय असते? उत्पादन म्हणजे काय अशा अनेक बाबींची माहिती मुलांनी समजून घेतली.

मिक्सर युनिट, पेटींग, कटींग, वेल्डींग या प्रक्रिया जवळून पाहिल्या. पाणबुडीला लावण्यात येणारे एक volt चे मशिन बनवण्याचे काम याठिकाणी चालू होते, ते पाहतानासुध्दा मुलांचे औत्सुक्य शिगेला पोहोचले होते.

गौरी-गणपतीच्या निमित्ताने सणाचा आनंद घेण्यासाठी, शोभा वाढविण्यासाठी प्रत्येक घरात, हाऊसिंग सोसायटीमध्ये सार्वजनिक गणपतीला विद्युत रोषणाई केली जाते. अशा ठिकाणी अपघात घडून आग लागण्याचे प्रकार घडतात. हे प्रकार टाळण्यासाठी किंवा असा अपघात घडला तर तत्परतेने काय काय कृती करावी याची शास्त्रशुध्द माहिती लर्निंग होममधील मुलांना देण्यासाठी पुण्यातील अग्निशामक दलाची प्रात्यक्षिके दाखवली गेली. आग कोणकोणत्या निष्काळजीपणामुळे लागू शकते, आग लागू नये म्हणून काय काळजी घ्यावी, आग लागलीच तर ती कोणकोणत्या प्रकारे विझवता येते, अग्निशामक दल ही आग विझवण्यासाठी कोणकोणती साधने वापरते, पाण्याचा उपयोग करताना आगीच्या प्रकारानुसार तो कसा बदलतो, आगीत उडी मारताना पाण्याचे रिंगण कसे बनवावे, टोपीपासून पायापर्यंत ते कोणत्या प्रकाराचे कपडे घालतात यांबद्दलची माहिती त्यांनी मुलांना दिली. मुलांनीही या काकांना अनेक प्रश्न विचारले, काकांनी प्रत्येक प्रश्नांची अतिशय संयमाने, त्यांना समजेल अशा भाषेत उत्तरे दिली.

या महिन्यात झालेल्या या तीनही वेगवेगळ्या क्षेत्रांतील माहितीमुळे मुले खुश झाली. या संपूर्ण प्रक्रियेत आपला भूगोल, पर्यावरण, विज्ञान आणि आपत्कालीन परिस्थितीत घेण्याची काळजी याचा अभ्यास कसा झाला हे मुलांना कळलेदेखील नाही. हीच आहे ग्राममंगलची अभ्यास पध्दती.

❑

शिक्षणवेधमधून सद्यकालीन शिक्षण प्रक्रियेबद्दल आपण वैचारिक चर्चा घडवून आणतच आहोत. परंतु प्राचीन काळात ज्यावेळी औपचारिक शिक्षण पद्धतीचा आरंभ झाला. त्यावेळची शिक्षणपद्धती कशी होती हे सांगणारी, मनोरंजक पण बोधप्रद अशी ही लेखमाला...

# इजिप्तमधील प्राचीन शिक्षणपध्दती

**सुनित पोतनीस**

प्राचीन काळातील गेल्या चार हजार वर्षांपासूनच्या इजिप्तमधील शिक्षणव्यवस्थेची माहिती उपलब्ध आहे. त्या काळात, इतर देशांप्रमाणेच इजिप्तमध्ये, मुले चार वर्षांची होईपर्यंत आईच्या देखरेखीखाली असत. मुलगा चार वर्षाचा झाल्यावर गावातल्या शाळेत त्याला दाखल केले जाई.मुलींना शिक्षण देण्याची पध्दत नव्हती. इजिप्तमध्ये धार्मिक विधी आणि रीतीरिवाजांचे फार महत्त्व असल्यामुळे धर्ममंडळाचे विशेष स्थान होते. शाळेत दोन प्रकारचे अभ्यासक्रम असत. एक म्हणजे, धार्मिक शिक्षण घेऊन पुढे पुजारी किंवा धर्मगुरू होऊन तोच व्यवसाय करणाऱ्यांसाठी धार्मिक अभ्यासक्रम तर दुसरा अभ्यास, पुढे लेखनिकांचा व्यवसाय करणाऱ्यांसाठी असे. इजिप्तमधे प्राचीन काळात साक्षरता अगदी कमी म्हणजे एक ते पाच टक्के होती. सरकार दरबारी लेखनिकांची आवश्यकता भासत असे. इजिप्तमधे सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी म्हणजे इ.स.पूर्व ३000मध्ये चित्रलिपीत लिहिण्यास सुरूवात झाली. चित्रलिपीच्या चित्राकृती मुळाक्षरांना हायरोग्लिपस म्हणत. हायरोग्लिपस ही जगातील ऐतिहासिक नोंद असलेली पहिली लिपी मानली जाते. या लिपीत सहाशे मूळाक्षरे होती. हायरोग्लिपसच्या अधिक सोप्या पध्दतीने लिहिण्याजोगा दोन लिप्या होत्या. त्यांना हेरॅटीक व डेमोटीक असे म्हणत. इजिप्तच्या प्राचीन भाषेला कोप्टीक असे नाव होते. हायरोग्लिपस लिपी इ.स. ४०० पर्यंत वापरात होती. त्यानंतर कोप्टीक भाषा ग्रीसच्या सुटसुटीत सोप्या लिपीत लिहावयास सुरूवात झाली. साधारणत: सहाव्या सातव्या शतकापासून कोप्टीक भाषा व ग्रीक लिपीचा वापर थांबून अरेबिक भाषा व अरेबिक लिपीचा वापर सुरू झाला. तो आजतागायत चालू आहे.

इजिप्तमधे पाणथळ जागेत वाढणारी वनस्पती पपायरस पासून कागद बनविण्याची कला इजिप्तिशियन लोकांना प्राचीन काळापासून अवगत

होती. पपायरसपासून बनविलेल्या कागदावर गवती ब्रश आणि ॲस्ट्रॉकाच्या मदतीने लिहिले जाई. पपायरस हा जगात तयार झालेला पहिला कागद. इजिप्तमधे प्राचीन काळी लेखनिक व शिल्पकारांना बरेच महत्त्व होते. त्याकाळी अमून आणि देवतांच्या व राजांच्या मंदिरांच्या भिंतीवर, थडग्यांवर, ओबेलीस्क (शिलालेख) व पुतळ्यांच्या चबुतऱ्यांवर लिहिण्याचे वा खोदण्याचे काम नियमित चालत असे. राजाच्या दरबारात असे अनेक लेखनिक नोकरीला असत.

मुलगा साधारणतः चार वर्षांचा झाल्यावर त्याला प्राथमिक शाळेत दाखल करीत. पाच ते अकरा वर्षे वयामध्ये त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होई. त्यात पाठांतरावर भर असे. प्राथमिक शिक्षणात अक्षर ओळख व लिहिणे, वाचणे आल्यावर पाठांतर करायला शिकवीत. त्यानंतर अंकगणित व खगोलशास्त्र हे विषय अभ्यासले जात. आपल्याकडे जशा इसापनीती कथा आणि बिरबलाच्या शहाणपणाच्या गोष्टी होत्या तशी इजिप्तमध्ये पपायरस कागदावर लिहिलेली अनेक पुस्तके होती. या पुस्तकांना पाश्चिमात्यांनी 'विस्डम बुक्स' किवा 'बुक ऑफ इन्स्ट्रक्शनस्' असे नाव ठेवले आहे. यातील काही पुस्तके शाळांमधे पाठ्यपुस्तके म्हणून वापरली जात असत. या पुस्तकांमधे प्रामुख्याने चांगल्या जीवनासाठी व्यक्तिने पाळावयाची सामाजिक बंधने, न्यायप्रियता, स्वच्छ आणि सत्य व्यवहारांचा व्यक्तिगत जीवनात होणारा उपयोग, नितीमत्ता यांविषयी सोप्या भाषेत शिकवण असे. बऱ्याच पिढ्यांपासून वडिलांनी आपल्या मुलांसाठी अशी पुस्तके लिहिण्याचा प्रघात होता. याशिवाय अशा पुस्तकांमधे गणित, भूगोल वगैरे विषयही असत. अशी पुस्तके सामान्यतः लेखनिकांकडून लिहून घेतली जात. लेखनिक, शिल्पकार आणि वैद्यकशास्त्र या विषयांवरील तांत्रिक माहितीची पुस्तकेही उपलब्ध होती. इजिप्तच्या लोकांनी वैद्यकशास्त्र व रसायनशास्त्र यांत बरीच प्रगती केली होती. केमिस्ट्री हा शब्द इजिप्तमधील अलकेमी या शब्दावरून आलेला आहे. लेखनिकांना भाषा, लिपी व साहित्यावरील सखोल अभ्यास करावा लागे. हायरोग्लिपस लिपीच्या माहितीचे केमटी (पूर्णत्व) हे पुस्तक लेखनिकांच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक होते.

पपायरस कागदावरील बुक ऑफ इन्स्ट्रक्शनस् पैकी सात पूर्ण व पाच अर्धवट जीर्णावस्थेतील पुस्तके अजूनही उपलब्ध आहेत. ती अलेक्झांड्रिया येथील म्युझियममधे आहेत. एका पुस्तकात पुढीलप्रमाणे उतारा आहे, ''विचार करून उच्चारलेला शब्द हा हिरेमाणकांहून अधिक मौल्यवान आहे. लोकप्रतिनिधी, उमराव, सल्लागार मंडळातील सदस्य यांचे वक्तृत्व स्वच्छ असायला हवे. बोलण्यासाठी तोंड उघडताना पूर्ण माहिती असलेल्या विषयावरच बोलावे.'' दुसऱ्या एका पुस्तकात पुढीलप्रमाणे शिकवण आहे. ''स्वतःच्या शेताच्या बांधावरील सरहद्दीचा दगड हलवू नका, फसवून, शेजारच्या जमिनीतील भाग बळकावू नका, गरीब कर्जदाराच्या कर्जाचे तीन सारखे भाग करून त्यातील दोन हिस्से त्याला माफ करा. हे केलेत तर रात्री शांतपणे झोप येईल.''

धार्मिक शिक्षण आणि पौरोहित्य शिकवण्यासाठी फेरोंच्या शासनव्यवस्थेत खास विभाग होता. ते शिक्षण बहुधा निरनिराळ्या मंदिरांत दिले जाई. क्वचित ठिकाणी मुली गायन व नृत्य शिकत असत. त्यापुढे मंदिरामध्ये गायिका आणि नर्तिका म्हणून नोकरी करीत.

❑

## || कलाशिक्षणाची तोंडओळख ||

'कले'ला जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी प्रक्रिया आहे. जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन कलेमुळे प्राप्त होतो. प्रत्येक मानव हा वैशिष्ट्यपूर्ण असून त्याच्या ठिकाणी सर्जनशीलता आहे, हाच सर्व कलांचा मूलभूत सिद्धांत आहे. नवनिर्मिती व सौंदर्योपासना यामुळे व्यक्तीजीवनाला दिव्यत्व प्राप्त होते. कलेच्या वैशिष्ट्यांसह कलाशिक्षणाचे महत्त्व सांगणारे कलाशिक्षणाची तोंडओळख करून देणारे सदर.

# औपचारिक कलाशिक्षण

**ऐश्वर्या सोमण**

अगदी लहानपणापासूनच चित्रकलेच्या आपण जवळ असतो. म्हणजे थोड्या कळत्या वयापासूनच मुलांचा कॅनव्हास किंवा पेपर हा घरातली भिंत असते. प्रत्येक घरात मुलांनी रंगवलेल्या भिंती दिसतातच जेव्हा मूल शाळेत जाते. तेव्हा त्याला शिकवण्याचे प्रभावशाली माध्यम ही चित्रकलाच आणि त्यातली उठावदार रंगसंगतीच असते. सुरूवातीला जेव्हा मुले चित्र काढतात तेव्हा त्यांचा आकार, पोत, रंग हे त्यांना समजत नसते. पण हळूहळू त्याच्या निरीक्षण करण्याच्या पध्दतीने ते ज्याचे चित्र काढायचे आहे त्याच्या बऱ्यापैकी जवळ जातात. शिवाय शाळेत चित्रकला हा विषय असतोच.

शाळेमधे साधारणतः सातवी, आठवी, नववी, दहावी या वयात एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट अशा ग्रेड परीक्षा देऊ शकतो. अथवा तशीही त्याला वयाची अट नसते. त्यामुळे नंतरसुध्दा त्या परीक्षा देता येतात.

कलाशिक्षणाला उत्तेजन मिळावे व त्याचा विकास व्हावा या उद्देशाने या परीक्षांना सुरवात झाली. नंतर त्यातील अभ्यासक्रमांत वेळोवेळी तत्कालीन गरजांनुसार बदलही करण्यात आले. आज ह्या परीक्षा महाराष्ट्र, गोवा, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या राज्यातही घेता येतात.

इंटरमिजीएट ग्रेड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच, कमर्शिअल आर्ट, फाईन आर्ट, टेक्सटाईल डिझाइनिंग, फॅशन डिझाइनिंग, आर्किटेक्ट इत्यादी उच्च अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळतो. तसेच आजकाल आर्किक्टेक्चर बरोबर इतर संबंधित तांत्रिक शाखेतही प्रवेश मिळवण्यासाठी ग्रेड परीक्षांची गरज आहे. १२वीच्या परीक्षेनंतर शासकीय कला महाविद्यालयातील प्रवेशासाठी ह्या परीक्षा अनिर्वाय आहेत. ह्या परीक्षेत A ग्रेड व B ग्रेड मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणांमध्येही वाढ होते.

एलिमेंटरी व इंटरमिजिएट या परीक्षा साधारणतः सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होतात. एलिमेंटरी दोन दिवस तर इंटरमिजिएट तीन दिवस असा ह्या परीक्षांचा कालावधी आहे. साधारणतः जुलैपासून याच्या अभ्यासाक्रमाला सुरूवात करावी. या परीक्षेचा अभ्यासक्रम आणि त्याच्या अनुषंगाने ठरवलेले त्यांचे विषय अतिशय योग्य व मूलभूत

    

आहेत. यांमध्ये– ✻ **स्थिरचित्र (Still life)** - हा एक ग्रेडपरीक्षेला महत्त्वाचा विषय आहे कारण, समोर मांडलेल्या वस्तूंची सौंदर्यपूर्ण अशी चित्रण करण्याची क्षमता यात कळते यात काही मानवनिर्मित वस्तूंची (उदा. बादली, मग, टोपली, डिश) आणि काही निसर्गनिर्मित वस्तूंची उदा. (केळी, भाज्या, नारळ, शंख) मांडणी केलेली असते. आणि छायाभेद (छाया प्रकाशाचा) वापर करून योग्य अशा रंगात हे रंगवायचे असते.

✻ **निसर्गचित्र (Nature Drawing)** - यामध्ये एखादया नैसर्गिक वस्तुरूपाचे निरीक्षण करून त्याचे हुबेहूब चित्रण करण्याच्या क्षमतेचा विकास करणे, हे उद्दिष्ट आहे. यामध्ये ॲस्टर, जास्वंद, सदाफुली या फुलांचा चित्र काढण्यासाठी वापर केला जातो.

✻ **स्मरणचित्र (Memorya Drawing)** - हा विषय म्हणजे परीक्षेपैकी बहुतेकांना आवडणारा विषय आहे. प्रत्येक गोष्टींमधील निरीक्षण, प्रसंगांचे स्मरण करून त्याचे जलद रेखाटन (Rapid Sketching) गरजेचे असते. ह्यात मानवाच्या भिन्न हालचाली, प्राणी, वाहने, यांचा समावेश असून, प्रमाणबध्दता, आणि त्याला अनुरूप रंगसंगतीचा वापर करावा लागतो.

✻ **संकल्पचित्र –(Design)** - यात तुमची कल्पकता आणि तुमच्या कलागुणांचा नावीन्यपूर्ण असा उपयोग केला जातो. नवीन रूप, नवीन आकार, नवे रंग, नवी रंगसंगती आणि तंत्रे याचा वापर करून जसे बनते आहे. संकल्पचित्र (Design). यामध्ये नेमून दिलेल्या बाहयाकारात सुंदर अशी पानाफुलांची, भौमितिक आकाराची. रचना तसेच फुलपाखरू, मासे, यांचे अलंकरण; सरळ रेषा, वक्राकार रेषांची रचना करायची व सुयोग्य रंगसंगतीत हे रंगवायचे. यामध्ये एक प्रकारच्या अमूर्त (Abstract) आकारातील सौंदर्यपूर्ण कलाकृती आपण दाखवू शकतो, आणि वेगवेगळे पोत घेऊन त्यातील सौंदर्य आपण अधिक वाढवू शकतो.

✻ **मुक्तहस्तचित्र – (Freehand Drawing)** - तोल, प्रमाण आणि लय. यांची समज भौमितिक किंवा यांत्रिक साधनांचा वापर न करता हात आणि डोळा यांना वळण लावणे. नमूद केलेल्या आकाराची प्रमाणबध्द अशी प्रतिकृती निर्माण करण्याच्या क्षमतेचा ह्यात अभ्यास केला जातो. येथे दिलेला आकार एकाच रंगाने रंगवयाचा असतो.

✻ **भूमिती – (Plan practicala Geometry)** यामधे ०ग्य सोडवल्यास तुम्हाला वरची ग्रेड मिळतेच मिळते.

असे हे सर्व विषय (अभ्यासक्रम) एलिमेंटरी व त्याचबरोबर इंटरमिजिएटसाठी असतात. पण इंटरमिजिएटसाठी भूमितीमधेच घनभूमिती आणि प्रमाणपट्टी आरेखन इ. अक्षरलेखन हे दोन विषय जास्त असतात. आजकाल असे पाहण्यात येते की प्रत्येक पालकाला वाटते आपल्या पाल्याने सर्व परीक्षा देणे गरजेचे आहे. पण यामधे त्या पाल्याची आवड निवड किंवा त्याची विशिष्ट बाबतीतली क्षमता पहिलीच जात नाही. तुम्ही दुप्पट फी घ्या पण माझ्या मुलाला शिकवा अशी त्यांची मागणी असते. या परीक्षा देताना चित्रकलेची आवड आणि जिद्द व चिकाटी या दोन्ही गोष्टींची आवश्यकता असते. ❑

## || उपक्रमशील शाळा ||

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बहिरवाडी, ता. अकोले

**भाऊसाहेब चासकर**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बहिरवाडी, ता. अकोले. या शाळेत ९३ मुले व ७२ मुली असे एकूण १६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यातील जवळपास ४० टक्के विद्यार्थी आदिवासी ठाकर समाजातील आहेत. ५ टक्के विद्यार्थी भटक्या समाजातील आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांना शाळेत आणणे व टिकविणे हे एक दिव्य होते. मात्र त्यांच्याशी त्यांच्या भाषेत संवाद साधत, त्यांच्या भावविश्वाशी नाते सांगणारे उपक्रम राबवत शिक्षकांनी या मुलांना शाळेत आणले.

डिजीटल स्कूल : बदलत्या काळाबरोबर शिक्षणाचे संदर्भही बदलताहेत. बहिरवाडीची शाळाही बदलते आहे. शाळेतील मुले आता क, ख, ग, घ,...बरोबरच संगणक शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. डॉ. विजय भटकर यांच्या 'इथ' या संस्थेच्या मदतीने आदिवासी, दुर्गम भागातील ही शाळा आता 'डिजीटल स्कूल' झाली आहे. आधुनिकतेची आव्हाने पेलणारे विद्यार्थी घडविण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, कला, क्रीडा, संस्कृती या सर्वच विषयांचे धडे देण्याचा प्रामाणिक प्रयत्न येथे चाल आहे. शिक्षकांच्या धडपडीला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे. गावकऱ्यांची साथ आहे.

माहिती तंत्रज्ञानाने शिक्षणाची परिभाषा बदलली आहे. जगाची परिभाषा बदलून टाकणारे हे नवे तंत्रज्ञान ग्रामीण आदिवासी भागातील मुलांच्या हातात दिले तर ग्रामीण भागाचे चित्र बदलून जाईल, असा विश्वास शिक्षकांना वाटत होता. या मनोभूमिकेतूनच धडपडणारी शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बहिरवाडी शाळेने संगणक शिक्षण सुरू करण्याचा संकल्प केला. गावकऱ्यांनी वर्गणी गोळा करून शाळेला संगणक संच भेट दिला. मोलमजुरी करणाऱ्या आदिवासींनीदेखील खारीचा वाटा उचलत संगणकासाठी हातभार लावला. समाजातील दानशूर व्यक्तींकडून शिक्षक व गावकऱ्यांनी आणखी तीन संगणक मिळविले. संगणकाची केवळ ओळख आणि संगणक हाताळणी यापुरतेच संगणक शिक्षण मर्यादित न ठेवता दैनंदिन अध्यापनासाठी याचा कसा वापर करता येईल, असा शिक्षकांचा प्रयत्न होता.

शिक्षण विभागाकडून शिक्षकांनी डॉ. विजय भटकर यांच्या 'एज्युकेशन टू होम' (इथ) या संस्थेची माहिती मिळविली. संस्थेशी संपर्क साधला. राज्याच्या ग्रामीण भागातील एक आदिवासी वाडीवरील शाळा मुलांना संगणक शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करते आहे हे पाहून, संस्थेला आवश्यक ते सहकार्य करण्याच्या सूचना डॉ. भटकर यांनी दिल्या. त्यानुसार संस्थेने बहिरवाडी शाळेला डिजीटल स्कूलची संगणक प्रणाली उपलब्ध करून दिली. सर्व संगणक 'लोकल

एरिया नेटवर्क' (लॅन) या प्रणालीने जोडले आहेत. 'इथ' ने बनविलेल्या प्रणालीतून पहिली ते पाचवीचा अभ्यासक्रम आनंददायी पद्धतीने शिकविला जातो. पाठ्यपुस्तकातील धडे व आशय शिक्षकांकडून समजून घेऊन ॲनिमेशनच्या तंत्रामुळे प्रत्यक्ष दृक्‌श्राव्य अनुभव विद्यार्थ्यांना मिळतात. ॲनिमिटेड फिल्म, मनोरंजक खेळ, चाचण्या, स्वाध्याय यांच्या मदतीने मुले शिकत आहेत. स्वयंअध्ययनासाठी हे सॉफ्टवेअर अत्यंत उपयुक्त आहे. इंग्रजीबद्दलचा पारंपरिक न्यूनगंड गळून गेला आहे. या विषयाची त्यांना चांगली गोडी लागली आहे. जी गोष्ट इंग्रजीची तीच गणिताची. गणित खेळांनी या विषयाची स्वाभाविक भीती कुठल्या कुठे पळून गेली आहे. केवळ अध्यापनच नाही, तर व्यवस्थापनही संगणक प्रणालीच्या मदतीने केले जाते. दैनंदिन उपस्थिती, शाळा प्रवेश, रजिस्ट्रर नंबर १, शालेय पोषण आहार, शाळा सोडल्याचा दाखला, निकालपत्रक, शिक्षक माहिती आदि सर्व बाबींसाठी ही प्रणाली वापरली जाते. त्यामुळे वेळेची बचत होते. हा वेळ वर्गाध्यापनासाठी वापरता येतो. विद्यार्थी संगणक आत्मविश्वासाने हाताळतात. संगणकामुळे इंग्रजी सुधारले आहे. माहितीचे महाजाल असलेल्या इंटरनेटवरून निरनिराळे संदर्भ ते शोधू लागले आहेत. अध्यापनात इंटरनेटचा अत्यंत प्रभावी वापर केला जातो. भूगोलाच्या पुस्तकातून सह्याद्री पर्वताची माहिती घेतल्यानंतर विद्यार्थी इंटरनेटवरून संबंधित व्हिडिओ, फोटो पाहतात. टिपणे काढतात, माहिती घेतात. विविध संकेत स्थळांना भेटी देतात. संगणकाच्या मदतीने शिकण्याची विद्यार्थ्यांना आता चांगलीच गोडी लागली आहे. इंटनेटच्या मदतीने विविध स्थळांना दिलेल्या भेटी, केलेली काल्पनिक सहल विद्यार्थ्यांना नवा अनुभव देऊन जाते. इंटनेटच्या बीलाचा खर्च पालकांच्या तसेच समाजातील देणगीदारांच्या मदतीतून भागविला जातो.

.......... या वेबसाईटच्या माध्यमातून शाळेने खऱ्या अर्थाने माहितीच्या महाजालात प्रवेश केला आहे. शाळेची वेबसाईटदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. या साईटवर शाळेचे उपक्रम, फोटो, व्हिडीओ, शाळा, शिक्षक विद्यार्थ्यांना मिळालेले विविध सन्मान. पारितोषिक यांची माहिती आहे. विशेष बाब म्हणजे गंमत जम्मत या टॅबवर क्लिक केल्यानंतर विविध प्रकारचे न्युरॉलॉजिकल खेळ खेळता येतात. त्यातून मुलांच्या मेंदूचा विकास होतो.

आदिवासी, ग्रामीण भागातील विद्यार्थी मुळातच काहीसे लाजरेबुजरे असतात. कमी बोलतात, लिहिताना कसेबसे लिहितात. त्यांचे घरचे विश्व आणि शाळेतील जग यांचा परस्परांशी काहीएक संबंध नसतो. पाठ्यपुस्तकातील भाषा, प्रमाण भाषा असते तर मुलांची घरची भाषा निराळी असते. त्यामुळे एकूणच शिक्षण प्रक्रियेविषयी मुलांच्या मनांमध्ये दुराव्याची भावना निर्माण होते. ते शिक्षणापासून तुटतात. यावर मात करायची तर मग आदिवासी ग्रामीण मुलांच्या भावविश्वात शिरले पाहिजे. त्यांच्या अनुभवविश्वाशी नाते सांगणारे काही केले पाहिजे. शिक्षण त्यांच्या जीवनाशी जोडले तर त्यांच्यातील न्यूनगंड निघून जाईल. त्यांना शिक्षणात गोडी वाटेल. मुले शाळेत येतील. रमतील. आनंदाने शिकतील. पुढे जातील. या उद्देशाने शाळेतील शिक्षकांनी निरनिराळे प्रयोग केले, त्यातील एक प्रयोग म्हणजे शाळेने 'आमची बाराखडी' या वार्षिक हस्तलिखिताचा उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांना लिहिण्याची संधी दिली. लेखनाकरवी त्यांना व्यक्त होता यावे, यासाठी त्यांना स्वातंत्र्य दिले. याला आश्चर्यकारक प्रतिसाद मिळाला. एरवी एखाद्या विषयावर निबंध लिहिताना पाच सात तोडकी मोडकी वाक्ये लिहून थांबणाऱ्या, अडखळणाऱ्या मुलांनी येथे मात्र पान/दोन पाने असे भरभरून लिहिले.

वेगवेगळ्या विषयांवर मुले कसा विचार करतात याचे प्रतिबिंब हस्तलिखितांच्या पानावर उमटले. वर्गात देखील मुलांच्या भाषेतील लेखी व तोंडी उत्तरे स्वीकारली जातात. शिक्षकही मुलांशी त्यांच्या भाषेत संवाद साधतात. मुलांच्या भाषेला प्राधान्य देत त्यांना लिहिते करण्याच्या या उपक्रमाचे शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले.

विद्यार्थी दरवर्षी बिया साठवितात. त्यांचे रोपण करतात. झाडेही लावतात. त्यांचे जतन,संवर्धन करतात. दरवर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी शाळेतील विद्यार्थी गाव व परिसरातील झाडांना राख्या बांधतात. त्यांच्या मनात प्रेम, जिव्हाळा, आपुलकीची भावना निर्माण झाली आहे. याशिवाय एक अतुट असा भावबंध निर्माण झाला आहे. काही विद्यार्थी वाढदिवसाच्या दिवशी शालेय परिसरात झाडें लावतात. शाळेत विविध भाषांतील आशयसंपन्न चित्रपट दाखविले जातात. आरोग्यविषयक जाणीव जागृतीचा एक भाग म्हणून काही उपक्रम शाळेत राबविले जातात. उन्हाळ्यात चोकोबार, गारीगार, पेप्सी असे पदार्थ न खाण्याची शपथ घेतली आहे. सर्व विद्यार्थी फटाकेमुक्त (पर्यावरण स्नेही) दिवाळी साजरी करतात. वर्षभरात सर्व दिनविशेष साजरे केले जातात. वाचन संस्कार व्हावे, यासाठी शाळेत विशेष प्रयत्न केले जातात. साप्ताहिक आरोग्य तपासणी केली जाते. विविध विषयांवरील कात्रणसंग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे. शाळेसमोरील एका पडक्या वाड्याच्या भिंतीवर एक हजार शब्दांची बाग फुलवली आहे. त्याच्या मदतीने २५ प्रकारचे भाषिक खेळ खेळतात. जंगल वाचन, छंदवर्ग, भेटकार्ड बनवा, प्रश्नमंजूषा, शेतीची अवजारे, नीम डे, निसर्ग व अभ्यास सहली असे उपक्रम राबविले जातात.

शाळेत मुलांना बसायला बाके आहेत. विद्यार्थ्यांचे शिकणे आनंददायी व्हावे, यासाठी शिक्षक प्रयत्नशील असतात. व्याख्यान पद्धतीने न शिकविता प्रत्यक्ष कृतीतून व अनुभवातून शिकविण्याचा प्रयत्न असतो. मुळातच आपल्या व्यवस्थेत मुलांची दोन जगांत विभागणी केलेली असते. पहिले त्यांचे घर आणि परिसराचे एक जग असते. दुसरे शाळेतले. या दोन्ही जगांचा सांधा जोडायचा प्रयत्न शिक्षकांनी केला पाहिजे. शिक्षण मुलांच्या जीवनाशी जोडले तर तसा सेतू बांधला जाईल. असा प्रयत्न बहिरवाडी शाळेत जोमदारपणे होताना दिसतो. नदीमाय कविता शिकविताना शिक्षक मुलांना नदीवर घेऊन जातात. जंगलसंपत्तीविषयी माहिती देताना मुलांना जगाची सफर घडविली जाते. याशिवाय न्यायालय, पोलिस स्टेशन, तहसील कचेरी, विटभट्टी, पिठाची गिरणी, बँक, पंचायत समिती, शेती, शेतकरी, ऐतिहासिक ठिकाणे, धरणे अशा स्थळांना आवर्जून भेटी दिल्या जातात. या परिसर भेटी, अभ्यास सहली यांच्यातून मुलांची अनुभव कक्षा रुंदावत जाते. त्यांचे भावविश्व अधिकाधिक समृद्ध होत जाते. अध्यापन प्रक्रियेचे लोकशाहीकरण केले आहे. शिक्षक कमी बोलतात. विद्यार्थ्यांना अधिक बोलण्याची संधी दिली जाते. विद्यार्थ्यांनी विचार कसा करावा, याचे धडे दिले जातात. गावातील भजनी मंडळ, कलावंत, माता-पालक संघ व पालक संघातील महिला व पुरुष आपापले कौशल्य मुलांशी शेअर करतात.

काही व्यक्तींच्या व संस्थांच्या दातृत्वातून शाळेत निरनिराळ्या भौतिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. संगणक संच मिळविले आहेत. वाचनालयासाठी पुस्तके मिळविली. सर्व विद्यार्थ्यांना पारंपरिक गणवेशापेक्षा वेगळा गणवेश आहे. शालेय साहित्य व शालेय दप्तर हे स्वयंसेवी संस्थांमार्फत मिळविले आहे. पालकांनी विद्यार्थ्यांना बसायला लोक वर्गणी करून बाके दिली आहेत. इमारत बांधायला जागा दिली आहे. शिक्षकांची धडपड,त्याला मिळणारा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहून

गावकरी शाळेच्या विकासासाठी प्रयत्नशीलपणे पुढे आले. दानशूर व्यक्तींमुळे येथील शिक्षण गतिमान झाले. परस्परांचा विश्वास व सुसंवाद हेच शाळेच्या यशाचे गमक आहे.

विविध परिसर भेटी प्रत्यक्ष अनुभव व जीवनाचे शिक्षण देणारे उपक्रम यांतून विद्यार्थी घडताहेत. याशिवाय शाळेतील अभ्यासविषयक प्रगतीतही विद्यार्थी मागे नाहीत. शाळेत एकही अप्रगत विद्यार्थी नाही. गणित, विज्ञान प्रदर्शनात सलग दोन वर्षे शाळेच्या उपक्रमाची जिल्हास्तरावर निवड झाली. हस्ताक्षर, पाठांतर आणि वक्तृत्त्व, लांब उडी, धावणे या व अन्य स्पर्धांतही शाळेने उल्लेखनीय यश मिळविले आहे. प्रज्ञा शोध गुणवत्ता यादीतही शाळेचे विद्यार्थी हमखास असतात.

सोमनाथ घोरपडे, भाऊसाहेब चासकर, भाऊसाहेब कासार, अशोक जाधव हे शाळेतील शिक्षक अविरत धडपड करणारे आणि वेगळं काही करू पाहणारे आहेत. सर्वांना वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळे बरेवाईट अनुभव आले. पण ते सकारात्मक विचार करत गेले. शिक्षकांच्या कामाच्या प्रेरणा विधायक होत्या. त्यामुळे खाचखळग्यांतील धक्के सहन करण्याची शक्ती त्यांना मिळत गेली. ओळखपाळख नसलेले हात मदतीसाठी पुढे आले. त्यामुळे शिक्षकांचा उत्साह वाढत गेला त्यांना ऊर्जा मिळाली. सिनेसृष्टीमध्ये काम करणारे कलावंत मुंबई येथील मुस्कान या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने बहिरवाडीच्या मुलांसाठी वेगवेगळ्या गोष्टी करताहेत. शिक्षकांत हेवेदावे नाहीत. 'एकीचे बळ मिळते फळ' या उक्तीप्रमाणे काम करत राहिले तर काय होते, याचा बहिरवाडी शाळा हा एक वस्तुपाठ आहे.

सन २००८-०९ या वर्षाचा जिल्हा परिषद, अहमदनगरचा आदर्श शाळा पुरस्कार, सन २००९-१० या वर्षाचा जिल्हा परिषद, अहमदनगरचा आदर्श शाळा पुरस्कार, लोकरंजन प्रतिष्ठान अकोलेचा २०११ चा आदर्श शाळा विशेष पुरस्कार. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा प्रयोगशाळेतील पुरस्कार २००८, या सन्मानांनी शाळेच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली आहे. त्यातून शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळत आहे. अहमदनगर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने शाळेच्या डिजीटल स्कूल व वेबसाईट या उपक्रमांची दखल घेऊन अभिनंदनाचा विशेष ठराव संमत केला.

शिक्षकांना भविष्यातील आव्हाने समर्थपणे पेलणारे विद्यार्थी घडवायचे आहेत. त्यासाठी स्मार्ट लर्निंग, माहिती तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या सुविधांचा वापर टी. व्ही., मोबाईल यांचा शिक्षणामध्ये प्रभावी वापर, गाव सर्वेक्षण, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, कार्यानुभव कक्ष निर्मिती, स्थानिक इतिहास व भूगोल विषयांची माहिती करून घेऊन पुस्तिका लेखन, स्थानिक साहित्यिकांचा अध्यापनात सहभाग, स्थानिक कलावंतांचा अध्यापनात सहभाग, विविध संशोधने करून प्रकल्प तयार करणे, अशा शैक्षणिक उपक्रमांचा त्यात समावेश आहे. अर्थात याला मोठा खर्च येणार आहे. यासाठी समाजाचे मोठे सहकार्य व योगदान मिळाले आहे. यापुढेही मिळेल असा आशावाद. मदत करणाऱ्या हातांचे स्वागत आहे.

उज्वल उद्यासाठी
संपादक : विठ्ठल म. शेवाळे, मधून साभार

## || पुस्तक परीक्षण ||




### बालकेंद्री शिक्षणाच्या कथांचे चित्रण

# कवाडे उघडताच

अपर्णा कुलकर्णी

मुलांच्या शिक्षणाच्या कार्यात केवळ त्यांना पाठ्यपुस्तक शिकवून विषयांशी परिचित करणे एवढेच अपेक्षित नसते. शिक्षण आणि रोजचे जगणे यांचा सांधा जुळला तर शालेय शिक्षणाला अर्थपूर्णता येते. मुलांना शाळेत मिळणारे वेगवेगळे अनुभव, त्यांनी केलेले उपक्रम या सगळ्यातून कळत नकळत भावी काळातील उत्तम व्यक्तिमत्व आकारास येते. यासाठी शाळा, घर आणि परिसर या सर्वांचा त्यात मोलाचा सहभाग असतो. मुलांच्या शिक्षणाचा विचार करताना त्यांचे घर, कुटुंब, त्यांचा सभोवताल यांचा विचार करावा लागतो. अन्यथा शिक्षण व्यवस्थितपणे पूर्णच होऊ शकत नाही. प्रतिभा भराडे यांनी लिहिलेल्या 'कवाडे उघडताच' या पुस्तकाचे वाचन करताना हे वारंवार जाणवते. चार भिंतीतील सक्तीच्या, रूक्ष शिक्षणापेक्षा शाळेबाहेरील सहज आणि नेमके शिक्षण किती महत्त्वाची भूमिका बजावते ते पुस्तक वाचताना वारंवार जाणवते.

'कवाडे उघडताच' हे पुस्तक म्हणजे जणू छोट्या कथांचे पुस्तक वाटते. प्रत्येक मुलाच्या बाबतीतले अनुभव, शाळेच्या परिसरात घडणाऱ्या गोष्टी, मुलांच्या कुटुंबाच्या गोष्टी,शिक्षकाच्या कार्यकुशलतेच्या कथा या सगळ्यातून एक सुरेख अनुभवमालिका तयार झाली आहे. शाळेतील विद्यार्थांचा किती वेगवेगळ्या पैलूंनी विचार करावा लागतो. ते यातून समजते. शाळेत येणाऱ्या, शाळेत न येणाऱ्या, शाळेची नावड असलेल्या पण नंतर शाळेच्या प्रयत्नांनी शाळेची गोडी लागलेल्या अशा वेगवेगळ्या मुलांचे अनुभव या पुस्तकात लेखिकेने शब्दबध्द केले आहेत. मुलांना समजून घेऊन, त्यांच्या कलाने त्यांना शिकण्यासाठी प्रेरित करणाऱ्या शाळा या पुस्तकातून भेटतात. कधी शाळेची धोरण फसतात, कधी शिक्षकाचे शिकवणे चुकते, त्यांचे अंदाज चुकतात. पण तरीही त्यातून सुधारणेचा मार्ग सापडला की, सगळे सुरळीत करून मुलांना उत्तम तेच देण्याची त्यांची धडपड मात्र अविरत असते. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या या शाळांचे कार्य प्रतिभा भराडे यांनी एक शासकीय अधिकारी म्हणूनच नव्हे तर एक सजग, डोळस नागरिक या नात्यानेसुध्दा आपल्यासमोर प्रामाणिकपणाने मांडले आहे. त्यामुळे त्या जिल्ह्यातील शिक्षणाची

स्थिती तर समजतेच पण त्याचबरोबर शाळा कशी असायला हवी, उत्साहाने काम कसे चालू ठेवायला हवे, समस्या येणारच पण डगमगता त्यातून मार्ग कसा शोधायचा, मुलांच्या सामाजिक, कौटुंबिक, भावनिक अडचणी दूर कशा करायच्या आणि त्यांना शाळेत नियमित येण्यास प्रवृत्त कसे करायचे याची उत्तरेही सापडतात.

मुलांच्या शिक्षणातील बहुसंख्य गोष्टी ज्या प्रत्यक्षात आणण्यासाठी वेगवेगळ्या योजना, धोरणे राबविली जातात त्या सर्व गोष्टी या शाळातील शिक्षक खुबीने व्यवहारात उतरवताना दिसतात. सोनवडीतील शाळेत अप्रगत मुलांचा प्रश्न कुशलतेने हाताळणारे मुख्याध्यापक भेटतात. तर जकातवाडी शाळेतील मुलांच्या गैरहजर राहण्याचा, त्यांच्या बेशिस्तीचा प्रश्न पाहून अस्वस्थ होणारे पवार गुरूजी भेटतात. बालगुन्हेगारीच्या वाटेकडे वळणाऱ्या या पावलांना पवार गुरूजी आणि मानसोपचार तज्ज्ञ मल्लिका पाटणकर यांनी योग्य मार्गावर आणले. त्यांच्या भावनिक व कौटुंबिक अडचणी समजून घेतल्या. मुलांना पवार गुरूजींनी मायेने जवळ घेतले, त्यांच्या आवडीनिवडी जपल्या. शाळा त्यांना आपलीशी वाटू लागली, मुलांची पावले आपसूकच शाळेकडे वळू लागली.

'शाळाच नको' म्हणणाऱ्या बिट्टूचा प्रश्न मराठी माध्यमाच्या शाळेत घातल्यावर पूर्णपणे सुटला. इंग्रजी माध्यमाच्या शाळेने मतिमंद ठरवलेला बिट्टू पाढे तयार करू शकला, प्रश्न स्वत:च तयार करू शकला, नवेनवे प्रयोग करू शकला. निसर्गाची उपजत जोपासणारी शाळा मिळाली आणि तो शाळेत रममाण झाला. बिट्टूला शाळेने अभ्यासाची गोडी लावली. 'त्याला परीक्षेत गुण भले कमी पडतील, पण जे असतील ते त्याने समजून केलेल्या अभ्यासाचे असतील' हे लेखिकेचे वाक्य लक्षात राहते.

पुस्तकातून अशा विविध मुलांच्या अनुभवविश्वाशी आपला परिचय होत जातो. ताशा वाजवणारा, सगळ्यांचा लाडका अशक्त उदय, 'शाळेला जातो' सांगून उन्हातान्हात भटकणारा आणि शाळेत मल्लखांब लावल्यावर नियमित येणारा गणेश, मतिमंद ओंकार व शुभम, उत्तम निवेदन करणारा, आत्मविश्वासाने बालसभेत बोलणारा पण परीक्षेला अतिशय घाबरणारा महेश, सुलभा, आदित्य इत्यादी मुले त्यांच्या कथांसह समोर येतात. त्याचप्रमाणे मुलांच्या मनाचा विचार संवेदनशीलतेने करणारी, मुलांवर अपार माया करणारी, मुलांनी शाळेत यावे; शिकते व्हावे यासाठी तळमळ असणारी शिक्षकमंडळी, मुख्याध्यापक भेटतात. शाळांसाठी आस्थेने काम करणारे डॉ. शैला दाभोलकर, मल्लिका पाटणकर, प्रशांत दुधाडे, देसाई इस्पितळाचे पंड्या सर, डॉ. उमेश करंबेळकर, जामदार व पवार सर असे शिक्षक या मुलांना लाभले आहे. शिक्षणातील समाजकार्याचे व्रत ते मनापासून जोपासत आहेत. पुस्तकाच्या लेखिका प्रतिभा भराडे यासुध्दा त्यांच्यातीलच एक आहेत. या सर्वांच्या एकोप्याने, कामाच्या ध्यासाने विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा यासंबंधीचे ठोस आणि आदर्श काम उभे राहत आहे की जे शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण म्हणावे असे आहे.

आकर्षक भाषाशैली आणि गोष्टीरूप मांडणी यामुळे पुस्तक हातात घेतल्यावर पूर्ण वाचून झाल्याशिवाय खाली ठेववत नाही. चित्रकार गिरीश सहस्त्रबुध्दे यांच्या सुबक मांडणीची जोड मिळाल्याने ते अधिकच आकर्षक व नेटके झाले आहे. केवळ शिक्षक–पालकांनीच नव्हे तर कोणीही; सजग वाचकाने वाचलेच पाहिजे असे हे पुस्तक आहे.

❑

# पालकत्वाचा विकास

आसावरी गुपचूप

गेल्या लेखात आपण पाहिले की, आपण पालक म्हणून जरी वावरत असलो, तरी आपल्यामध्ये एक छोटे मूल आहे. आपल्या स्वत:च्या बाल्याला आपण स्वत:च्या पाल्यामधे नकळत पाहत असतो. आणि आपले मूल ही आपली संपूर्ण प्रतिकृती नसते. त्याचे प्रश्न वेगळे, वेगळी आव्हाने असतात. आपण जोवर आपले स्वत:चे बाल्य स्वीकारत नाही, तोवर आपल्या मुलाचे बाल्यही जसेच्या तसे स्वीकारू शकत नाही.

स्वत:चे बाल्य किंवा स्वत:ला स्वीकारणे ही निकोप पालकत्वाची पहिली पायरी आहे. स्वत:ला स्वीकारणे ही इतकी घासून गुळगुळीत झालेली संकल्पना आहे आणि म्हणूनच आपण त्या शब्दात न अडकता आत डोकावू.

स्वत:ला स्वीकारणे सुरू होते, अगदी आपल्या दिसण्यापासून. आरशात डोकावून पाहिले, की मी स्वत:ला कशी दिसते/कसा दिसतो? काही विशेषणे गोळा करू या? आनंदी, प्रेमळ, उत्साही, बोअर, गंभीर, जाड, बुटकी/बुटका, स्मार्ट, बावळट..... जेव्हा मी शरीर–मन संबंधावर कार्यशाळा घेते, तेव्हा प्रथम स्वत:च्या शरीर प्रतिमेचे चित्र काढायला सांगते. आणि इतकी बोलकी चित्रे बघायला मिळतात. एकीने स्वत:चे शरीर दुधी भोपळा म्हणून काढले होते. कारण तिला तिचे आयुष्य, तिचे दिसणे दुधी भोपळ्याप्रमाणे बेचव, काहीही वळणे नसलेले वाटत होते.

सुरुवातीला यावर ती स्वत:शीच खूप हसली आणि काही वेळानी अचानक हमसून रडू लागली. स्वत:चे असणे, स्वत:चे दिसणे, याचा खूप खोलवर तिरस्कार, राग तिच्या मनात होता. बोलती झाल्यावर तिलाच उमगले की दुसरी मुलगी असल्याने अगदी लहानपणापासून मी काय साधीच आहे. माझ्यात काहीच वेगळे नाही हा विचार घेऊनच ती मोठी झाली. आणि असे आपल्या मुलीचे होऊ नये म्हणून ती कायम दक्ष राहिली. चुकूनही तिच्या मुलीच्या अंगाला जुना कपडा लागू दिला नाही. आणि आता या आईची तक्रार अशी की मुलीला कशाचीही किंमत नाही.

वरवर पाहता आईनी स्वत:ला जे भोगावे लागले, ते मुलीला लागू नये, याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता. कृती बघता मुलाला नवीन कपडा आणून देणे यात फार गैर काही नाही. ही गोष्ट अनेक पालक करत असतील. कमी–अधिक प्रमाणात अनेक पालकांचीही अशी तक्रार असू शकेल. मात्र या आईला ही तक्रार एवढी गंभीर का वाटली?

अभ्यास हा सर्व पालकांचा अतिशय लाडका




विषय असतो. मुलगा/मुलगी अभ्यास करत नाही ही तक्रारही अतिशय लाडकी असते. मात्र या तक्रारीच्या मागे जाऊन तिचा विचार फार कमी झालेला दिसतो, अभ्यास कर असे सांगणे ह्या कृतीमधे काय गैर आहे?

कोणतीही कृती हा कोणत्यातरी विचाराचा परिणाम असतो. कोणत्यातरी प्रेरणेमधून ती कृती होत असते. आणि प्रत्येक विचारामागे भीती किंवा प्रेम या दोन भावना असतात. तो विचार हे केले नाही, तर या भावनेतून नकारात्मक भावनेतून येतो. नाहीतर हे केले, की मला छान वाटेल या भावनेतून सकारात्मक भावनेतून येतो.

आता आपण वरील दोन्ही उदाहरणांमागची भावना तपासून पाहू या. पहिल्या उदाहरणामधील आई आपल्या मुलीला नवीन कपडे देत होती, त्यामागे आईचा स्वत:चा इतिहास होता. त्या वेदनेपासून मुलीला ती वाचवण्याचा प्रयत्न करत होती. जेव्हा आपण आपल्या पाल्याला वाचवण्याचा प्रयत्न करत असतो, त्याचाच अर्थ आपल्याला मनातून असे वाटत असते, की आपला पाल्य असुरक्षित आहे. ती असुरक्षितता आपल्या मनात जास्त असते

जेव्हा आपण मुलाला अभ्यास कर असे म्हणतो, तेव्हा त्यामागे काय असते? अभ्यास केला नाहीस, तर गुण मिळणार नाही, तर चांगली नोकरी नाही. नोकरी नाही तर पैसा नाही...... त्यामुळे आपल्यासारख्या मध्यमवर्गीयांना अभ्यासावाचून पर्याय नाही.

या सगळ्याच्या मागे काय आहे? अर्थातच भीती, असुरक्षितता. आणि त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही भीती आणि सुरक्षितता ही पाल्याची नसून पालकांची आहे. जर पाल्याच्या नजरेतून विचार केला, तर कदाचित त्याला/तिला नवीन कपड्यांचे महत्त्व तेवढे नसेलही. कदाचित वाईट गुण हा त्याच्या/तिच्या चिंतेचा विषयच नसेल. जी भीती/नकारात्मक भावना त्यांच्या ठिकाणी अस्तित्वातच नाहीये. तिच्यापोटी काहीतरी काम करणे मुलाला असंबध्द वाटते.

मग नवीन कपडे द्यायचेय नाहीत का? अभ्यास कर म्हणायचेच नाही का? तर असे मुळीच नाही. मुळात आपण कृतीवर आक्षेप घेतच नाही आहोत. (तसे पाहिले, तर विचारावरही आक्षेप नाही आहे. फक्त विचाराबद्दल सजग असणे, एवढेच आपण करत आहोत.)

आता याच कृतीमागच्या सकारात्मक प्रेरणा बघू:

माझ्याकडे आत्ता पैसे आलेत, म्हणून मी तुला नवे कपडे आणले. मला तू छान कपडे दिसले, म्हणून मी आज तुला नवे कपडे आणले. यामागे मला मिळाले नव्हते म्हणून ही भावना नाही. अभ्यास कर, कारण त्यामुळे तुला काहीतरी नवीन करायला मिळेल. तुला गंमत येईल. तुझी वाढ नीट होईल.

अशा प्रत्येक विचाराकडे बघायला लागले, की बरेचदा लक्षात येते की, आपण काहीतरी होऊ नये, या भीतीमधून बऱ्याच सूचना देत असतो. आणि शाब्दिक सूचना दिल्या नाही, तरी जे आपल्या

आत असते, ते आपोआपच मुलापर्यंत पोहोचतच असते. ज्या आया दिवसभर मुलाबरोबर एकट्या असतात, त्या अनेकदा मुलाच्या पडण्या–झडण्याला बिचकून असतात. भले त्या हे शब्दांतून व्यक्त करतही नसतील. पण त्यांच्या अस्तित्वाचा तो भाग असतो. आणि त्यामुळे मुलांपर्यत ते जसेच्या तसे पोहोचते.

अर्थातच प्रत्येक विचारावर काबू मिळवायला आणि संपूर्ण सकारार्मक बनायला आपण काही संत नाही. मात्र या प्रक्रियेची सुरूवात आपण नक्कीच करू शकतो. प्रत्येक निदान जास्तीत जास्त कृती,विचार आपण सजगपणे बघू शकतो. आणि त्यापैकी पाल्याचा विचार आणि माझा स्वत:चा अनुभवामुळे पूर्वग्रहदूषित विचार कोणता हे आपण पारखून घेऊ शकतो. आणि एखादी कृती अशा पूर्वग्रहदूषित विचारामधून होत असेल, तर त्या कृतीला, त्या विचारालाही स्वत:मध्ये स्वीकारू शकतो.

जेव्हा आपण स्वत:चा स्वीकार अशा प्रकारे करतो, तेव्हा येणारे परिणामही आपण स्वीकारतो. मग ते परिणाम आपल्या मुलामधे दिसले, तर तेही स्वीकारण्याची आपल्यात हिंमत येते.

❑

## ॥ वाचकसंवाद ॥

**सप्रेम नमस्कार**

हल्लीच कोलकता शहरास काही कामानिमित्त भेट देण्याचा योग आला. माझा मुक्काम ‘महाराष्ट्र निवास’ हाजिरा रोड येथे होता. तिथे लायब्ररीमधे काही वृत्तपत्रे वाचत असताना आपल्या ‘शिक्षणवेध’ मासिकाचा जून महिन्याचा अंक वाचनात आला. त्यांत प्रसिध्द झालेले लेख अतिशय आवडले. तुमच्याकडे ‘शिक्षणवेध’ मासिकाचे २०११ सालचे जुने अंक शिल्लक असल्यास कोणत्याही ६ महिन्याचे अंक पाठवून मला उपकृत करावे. कळावे.

**सुभाष नाईक**
**गोवा.**